ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ अंक ५ पाने ५६ डिसेंबर २०१४ मूल्य १० रु.

# विदेशी प्रत्यक्ष गुंणतवणूक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार

**भारतीय राज्यांमधील थेट परकीय गुंतवणुकीचा प्रादेशिक असमतोल**
डॉ. एस.आर.केशवा

**भारतीय कंपन्या विदेशात का जातात?**
व्ही.एन. बालसुब्रमण्यंम

**परकीय थेट गुंतवणूक : राज्यनिहाय बदल आणि धोरणातील परिवर्तन**
सोजिन शिन

**भारतीय बांधकाम उद्योग - विदेशी गुंतवणुकदारांसाठी आकर्षण केंद्र**
भावना गोखले

***विशेष लेख***
कालबाह्य कायदे - अनिवासी भारतीयांपुढील पेच
अनिल मल्होत्रा

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

// योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक ५ ❖ ❖ डिसेंबर २०१४ ❖ ❖ मूल्य १० रु. ❖

मुख्य संपादक
**राजेशकुमार झा**

संपादक
**भावना गोखले**

उपसंपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

'योजना' हे नियोजन आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | |
|---|---|
| **वार्षिक** | : रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ७३० |


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **भारतीय कंपन्या विदेशात का जातात?** | - व्ही.एन. बालसुब्रमण्यंम | ५ |
| **परकीय थेट गुंतवणूक : राज्यनिहाय बदल आणि धोरणातील परिवर्तन** | - सोजिन शिन | १३ |
| **भारतीय राज्यांमधील थेट परकीय गुंतवणुकीचा प्रादेशिक असमतोल** | - डॉ. एस.आर.केशवा | १८ |
| **कालबाह्य कायदे - अनिवासी भारतीयांपुढील पेच (विशेष लेख)** | - अनिल मल्होत्रा | २७ |
| **भारतीय बांधकाम उद्योग - विदेशी गुंतवणुकदारांसाठी आकर्षण केंद्र** | - भावना गोखले | ३३ |
| **भारताचे राज्यांच्या वाढत्या सहभागासह जागतिक पातळीवरील आर्थिक संबंध** | - त्रिदेव सिंग मैनी | ३७ |
| **भारतातील परदेशी गुंतवणूक - विचारा तर खरं ?** | - | ४२ |
| **भारताच्या परकीय व्यापारातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे विवेचन** | -डॉ. नितिन ज्ञा. चौधरी | ४६ |
| **भारतातील एफडीआयचे स्वरुप** | - डॉ.उमेश भा. घोडेस्वार | ५० |



योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'सी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

## विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे आर्थिक राजकरण

सहा दशकांपुर्वी भारताने लांब पल्ल्याच्या आर्थिक विकासाकडे झेप घेतली. गंगे पर्यंतच मर्यादित न राहता, मिसिसिपी, यांग्टिस्, डॅन्युन, नील आणि ॲमेझोन या नदयांवरुनही बरेच पाणी वाहून गेले आहे. जगाच्या ख-या अर्थव्यवस्थेमध्ये कमालीचा बदल असून जागतिक राष्ट्रीयकरण करण्याच्या दृष्टिकोनाला सबळ पाठिंबा मिळत आहे जो की, २०व्या शतकाच्या मध्यामध्ये आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांनी वसाहत वादा विरुद्ध ऐतिहासिक लढा देतांना घालविला होता. त्यांचे दैदिप्यमान लोप पावले होते. आजचे जग हे मोठया प्रमाणावर एकमेकांशी जोडले गेले असून विविध देशांच्या नाळ या जवळपास अर्ध्या शतकापूर्वी एकमेकांमध्ये गुंतल्या गेल्या आहेत. प्रसिद्ध ऐतिहासिक लेखक ईरिक हॉन्स बॉम यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये म्हटले आहे की, राजेशाही युगात क्रांती युगाचा जन्म झाला आणि क्रांतीयुगाने भांडवलशाहीला जन्म दिला. जेव्हा की, आपण जागतिक पातळीवर २१ व्या शतकात पदार्पण केले आहे, तेव्हा आपल्या निरीक्षणातुन ही बाब सुटायला नको की, जागतिक आर्थिक पद्धतीद्वारे भांडवल स्त्रोत हा जगाच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे मोठया प्रमाणावर स्थलांतरित होताना दिसतो. अंतर्समन्वयक जगाचे अधिकार आणि अनेक महत्वाचे निर्णय हे आपल्यावर थोपविण्यात येतात. एक प्रकारे या सर्व बाबींचे खोलवर परिक्षण आणि गुंतागुंतीच्या समतोल वित्तीय नेटवर्क पद्धतींना समजणे आवश्यक आहे, ज्या मोठया प्रमाणावरील जागतिक अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहेत.

भारताबाबत सांगायाचे झाल्यास ''औद्योगिकीकरण पुरक आयात मॉडेलचा'' अंगीकार भारताने फार पुर्वी केला असून जिथे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा संबंध आहे तिथे याची छाप भारताच्या सध्याच्या आर्थिक धोरणावर दिसून येते.

निरिक्षणाअंती असे लक्षात आले की, भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा स्त्रोत हा मुख्यत: १९६९ ते १९७५ मध्ये होता. यानंतर विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक विरोध कालावधी १९७५ ते १९९१, तर निवडक क्षेत्रांद्वारे थेट प्रत्यक्ष गुंतवणुक ते अंतिमत: १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणाद्वारे थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीचे पूर्व वातवरण तयार होण्याचा कालावधी या मध्ये विभागला आहे. आर्थिक धोरणाचे हे टप्पे भारताच्या राजकारणात सुद्धा विविध पातळीवर टप्प्या टप्याने जाणवतात. या सर्व बाबींचा विचार केल्यास सामाजिक, राजकीय स्थित्यंतरांमध्ये आर्थिक धोरण बदल महत्त्वाचा आहे, जो या क्षेत्रांमध्ये प्रखरतेने आणि खरेपणाने जाणवतो. हे ही खरे आहे की, स्वातंत्र्योत्तर काळा नंतर भारताच्या काही दशकांमध्ये आर्थिक विकासाच्या मॉडेलवर वाद उत्पन्न झाला, परंतु इथे हे लक्षात घ्यायला हवे की, भारताने जागतिक पातळीवरील आव्हानांना तोंड देण्यासाठी सुदृढ आणि शाश्वत आर्थिक पायाभुत सेवा तसेच संस्थात्मक प्रभावी यंत्रणांना वाव दिला.

'' संस्थात्मक सुधार '' ही यशाची किल्ली असून जी देशामध्ये थेट प्रत्यक्ष गुंतवुकीला आकर्षित करते. सरकारने देशामध्ये एफ.डी. आय. ला आकर्षित करण्यासाठी विविध मार्ग अवलंबिले असून आतापर्यंत संरक्षण उत्पादन, बांधणी, किरकोळ व्यापार, वीमा, इत्यादी क्षेत्रासाठी एफ.डी.आय ची दालने खुली झाली आहेत. सरकारने 'मेक इन इंडिया" द्वारा स्वदेशी निर्मितीला चालना दिली असून यामुळे बहुतांश विदेशी कंपन्यांना भारतामध्ये गुंतवणुक करण्यासाठी आमंत्रित केले आहे. भारतामधील थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीचा निव्वळ स्त्रोत हा १९९२ पासन वाढला जो १९९२ मध्ये ०.१ टक्के होता त्याने वर्ष २०११ मध्ये १.७ टक्क्यांपर्यंत मजल मारली आहे आणि भविष्यात हा आलेख वाढीव रहाणार आहे, हे निश्चित.

थेट प्रत्यक्ष गुंतवणुक हा ढोबळ भांडवल उभारणीचा महत्वाचा घटक असुन भारतामध्ये एफ.डी.आय. ने वर्ष २०११ मध्ये ६.४ टक्के ची पातळी गाठली आहे.

तथापि आजचा महत्वाचा मुद्दा हा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीचा उपयोग देशांना कसा करून घेता येईल हा आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, सामाजिक, पर्यावरणीय आणि राजकीय प्रभाव, राजकीय वर्चस्व नसेल तर थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीला यशस्विता प्राप्त होऊ शकेल. समाजातील मुख्यत: असा सीमांत वर्ग आणि असा वर्ग जो जीवनमान सुधारण्याकडे आणि पर्यावरणीय प्रक्रिया समतोल ठेवण्याचा कल राखतो. विदेशी भांडवलाला आकर्षित करण्यासाठी आर्थिक पुढाकार घेताना विचार करावयास हवा. अशा वर्गाकंडे जर आपण दुर्लक्ष केल्यास फार पुर्वी जसे '' इस्ट इंडिया कंपनी '' ने आपले वर्चस्व प्रस्थापित करुन दोन दशकांपुर्वी व्यापार आणि गुंतवणुकीचे संपुर्ण अधिकार स्वत:कडे ठेवून अर्थकरण केले, अशी परिस्थिती निर्माण झाल्यास आपल्याला थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीसारख्या कामधेनूला मुकावे लागेल.

# भारतीय कंपन्या विदेशात का जातात ?

**- व्ही.एन. बालसुब्रमण्यंम**




**१९९० च्या मध्यापासुन पुर्वापार चालत आलेले नियम आणि कायदे मोडीत काढुन तरुण उद्योजकांनी 'ॲनिमल स्पिरीट दाखवून विदेशात फार मोठया प्रमाणावर गुंतवणुक आणि जागतिक अर्थव्यवस्थेत नव्या उमेदीने सहभाग घेतला यात प्रामुख्याने कामगारांची उच्च उत्पादकता, संशोधन, विकास खर्च व्यवस्थापकिय कौशल्य, निर्यात आणि १९९१ नंतरचे भारताने अवलंबिलेले उद्योग उदारीकरण धोरण आहे.**

**I. परिचय:**

गेल्या काही वर्षात भारत आणि चीन यांनी केवळ थेट विदेशी गुंतवणुकीबाबत उदारीकरणाचे धोरण अवलंबिले नाही तर विदेशातील गुंतवणूकदार म्हणूनही हे दोन्ही देश उदयास आले आहेत. भारताच्या गुंतवणुकीचे प्रमाण चीनपेक्षा कमी असून भारताच्या थेट परकीय गुंतवणुकीची रचना जी उत्पादक आणि सेवा यांच्या भोवती केंद्रीत आहे, त्यांची विकसनशील देशांमध्ये असलेली उपस्थिती, अधिग्रहणावर आधारलेली परकीय बाजारात प्रवेश करण्याची पद्धत मुख्यत्वे अमेरीका आणि युनायटेड किंग्डम या गोष्टी इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपासून भारताला वेगळ्या करतात. भारताच्या गुंतवणुकीच्या या वैशिष्ट्यांचे विश्लेषण होण गरजेचे आहे. हा लेख असे म्हणतो की, भारतीय कंपन्या करत असलेल्या गुंतवणुकी मागे त्यांच्याकडे असलेली विशेष व्यवस्थापकीय क्षमता कारणीभूत आहे.

**II. भारताच्या विदेशातील गुंतवणुकीचे स्वरुप आणि आकारमान :**

भारताच्या थेट परदेशी गुंतवणुकीचे आकारमान जे १९९० मध्ये $१२४ दशलक्ष होते ते २०११ मध्ये वाढून $१११,२५७ दशलक्ष इतके झाले आहे जे विकसित देशांमधील एकूण थेट विदेशी गुंतवणुकीतील ३% हिस्सा आहे (तक्ता १). पहा पान क्र. ६

तिसरी गोष्ट म्हणजे भारताची ५०% थेट विदेशी गुंतवणूक ही विकसीत देशांमध्ये झालेली आहे तर चीनची ७५% गुंतवणूक ही विकसनशील देशांमध्ये झालेली आहे.

२००८ च्या शेवटी भारत हा युके मधील अमेरीकेनंतरचा दुसरा सर्वात मोठा गुंतवणूकदार होता. (पहा आकृती १ पान क्र. ६)

चौथी गोष्ट म्हणजे भारताच्या थेट विदेशी गुंतवणुकीची वाढ ही मुख्यत्वे अधिग्रहणावर आधारीत असुन (तक्ता ३) ऑगस्ट २०१० मध्ये संपलेल्या वर्षाच्या शेवटी भारत दहा अधिग्रहण करणाऱ्या देशांच्या यादीत विकसनशील देशांमधून सीमे पलीकडील विलिनीकरण-अधिग्रहणाच्या २४ दशलक्ष व्यवहारांसहीत दुसऱ्या स्थानावर होता (वॅगस्टील,२०१०). २००८ ते २००९ या वर्षां दरम्यान भारतीय कंपन्या १३४७ विलिनीकरण आणि अधिग्रहणां मध्ये सहभागी होत्या ज्याचे मूल्या ७२ अब्ज एवढे होते (तक्ता ३ पान क्र. ७).

टेटली टी, जॅग्युआर आणि लॅंड रोव्हर, कोरस स्टील (सर्वांचे अधिग्रहण टाटाने केले आहे), व्हाइट आणि मॅकॅ या स्कॉटीश मद्य कंपनीचा ताबा भारतीय उद्योगपती माल्या यांनी घेतला आहे आणि

**तक्ता १: चीन आणि भारताच्या थेट परकीय गुंतवणुकीचे आकारमान ($ दशलक्ष)**


| देश | १९८१ | १९८५ | १९९० | १९९५ | २००० | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००९ | २०१० | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चीन | ३९ | ९०० | ४,४५५ | १७,७६८ | २७,७६८ | ५७,२०६ | ७३,३३० | ९५,७९९ | १४७,९४९ | २२९,६०० | २९७,६०० | ३६५,९८१ |
| भारत | ९३ | ९३ | १२४ | ४९५ | १,७३३ | ९,७४१ | २७,०३६ | ४४,०८० | ६२,४५१ | ७७,२०७ | ९२४०७ | १११,२५७ |

**तक्ता २: चीन आणि भारत यांची थेट विदेशी गुंतवणुक**

| | भारत | | | | चीन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०००/०१ ते २००६/०७ | % एकुण वाटा | २००८/०९ ते २०११/१२ | % एकुण वाटा | २००४ ते २००७ | % एकुण वाटा | २००८ ते २०१० | % एकुण वाटा |
| | (अब्ज $) | | (अब्ज $) | | (अब्ज $) | | (अब्ज $) | |
| प्राथमिक क्षेत्र | १.०६ | ०.६४ | ४.९४ | ८.५३ | १६.९३ | २६.० | २५.९३ | १४.३० |
| दुय्यम क्षेत्र | १०.९८ | ४३.४६ | २५.९६ | ४५.०० | ६.०६ | ९.० | १४.१८ | ७.८३ |
| वितरण क्षेत्र | १३.२२ | ५२.०० | २६.९३ | ४६.५४ | ४२.३४ | ६५.० | १४१.१४ | ७७.८७ |
| एकूण | २५.२६ | | ५७.८६ | | ६५.४३ | | १८१.२४ | |


स्त्रोत:संयुक्त राष्ट्रे व्यापार आणि विकास परिषद (www.unctad.org/fdistatistics)

**Chinese 2009 ODI by Region - Stock**
(US $ million, percent share)





आाकृती १

**Distribution of FDI inflow to the UK (%)**




आाकृती २ (स्त्रौत : इकॉनॉमिस्ट)

**आलेख ३ भारत आणि चीन यांनी केलेले अधिग्रहण**




स्त्रोत: देब्युले आणि दुआन्मु

**तक्ता ३ : भारतीय कंपन्यांच्या सीमे पलिकडील विलिनीकरण आणि अधिग्रहण खरेदी यांचे भौगोलिक वितरण २०००-२००७**

| देश | २००० | २००१ | २००२ | २००३ | २००४ | २००५ | २००६ | २००७ | २००८ | २००९ | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अमेरीका | २२ | १२ | ९ | १७ | २० | ३५ | ४३ | ६२ | ७६ | २७ | ३२३ |
| युके | ५ | २ | ८ | ११ | ७ | १६ | २६ | २० | ३६ | १२ | १४३ |
| अमेरीकाद्दयुके | २७ | १४ | १७ | २८ | २७ | ५१ | ६९ | ८२ | ११२ | ३९ | ४६६ |
| कॅनडा | ० | ० | ० | ० | ० | २ | ५ | ९ | ७ | ९ | ३२ |
| इतर | ३४ | २९ | ३४ | ५२ | ४७ | ९१ | १११ | ११२ | १९८ | १४१ | ८४९ |
| एकुण | ६१ | ४३ | ५१ | ८० | ७४ | १४४ | १८५ | २०३ | ३१७ | १८९ | १,३४७ |

स्त्रोत: थॉम्सन्स वन बँकर (२०१०)

सोफ्टवेअर क्षेत्रातील एकूण गुंतवणुकीची दखल माध्यमांनी घेतली आहे.

### III परंपरागत स्पष्टीकरण

परंपरागत कंपन्याना जेव्हा बाजारातील वैशिष्टतेचा अभाव आणि संस्थात्मक घटक हे उत्पादन निर्यात करण्यापासुन रोखतात किंवा त्यांच्या कडे असलेल्या लाभाचा विदेशातील कंपन्यांना परवाना देण्यापासून त्यांना वंचित ठेवले जाते. अशा वेळी स्पर्धेला तोंड देण्यासाठी विदेशी कंपन्यांच्या मक्तेदारीला संपुष्टात आणण्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणुक करतात. हायमर (१९७६) यांच्या विचार सरणीबाबतची चर्चा विस्तारीत केली आहे, ज्यात विदेशातील गुंतवणुकीची ठिकाणे(एल) आणि प्रतिस्पर्ध्यांपासून मक्तेदारी असलेल्या लाभांचा बचाव करण्याच्या मार्गांचा आणि साधनांचाही समावेश आहे. थेट विदेशी गुंतवणुकीचे हे तीन पैलु ओएलआय रुपलोक वा थेट विदेशी गुंतवणुकीचा लवचिक सिद्धांत असे एकत्रित केले आहेत. (डमिंग १९९३)

अलिकडील थेट विदेशी गुंतवणुकीच्या सिद्धांताच्या चाचण्या ह्या भारत आणि चीन यांच्या थेट विदेशी गुंतवणुकीशी संबंधित आहेत (प्रधान २०११, बक्ले एट.एल, २००७;कुमार, २००७ आणि नुन्नेनकंप एट.एल, २०१०). भारताच्या बाबतीत सुरवातीचे अभ्यास हे जयप्रकाश प्रधान (२००८,२०११,२००४) यांनी केले आहेत. परिश्रमपूर्वक विविध स्त्रोतांपासून एकत्रीत केलेली माहिती ज्यात माध्यम आणि अप्रकाशीत सरकारी माहितीचाही समावेश आहे.

प्रधान यांच्या विश्लेषणात, भारतीय उत्पादक कंपन्यांच्या विदेशात जाण्यामागे कामगारांच्या उच्च उत्पादकता, संशोधन आणि विकासाचा खर्च, व्यवस्थापकीय कौशल्य, निर्यात आणि १९९१ च्या नंतरचे उदारीकरणाचे धोरण असे घटक कारणीभूत असल्याचे म्हंटले आहे. ओएलआय सिद्धांतांच्या पुष्टीकरणा द्वारे प्रकाशझोत टाकतो त्याप्रमाणे मालकी हक्काचा फायदा हा विदेशात जाण्याचे धाडस करणाऱ्या भारतीय कंपन्याकडे असतो ह्या गोष्टीला हे निकाल मान्यता देतात की नाही हा वादाचा मुद्दा आहे. भारतीय कंपन्याची उच्च कामगार उत्पादकता ही त्यांच्या उत्पादन प्रक्रियेतील प्रचंड प्रमाणात असलेल्या भांडवली घनतेत आणि खासकरून भांडवल केंद्रीत असलेल्या उद्योगांमध्ये असलेल्या त्याच्या मोठ्या प्रमाणावरील उपस्थितीत आहे. भारतीय उत्पादनाची ही दोन वैशिष्टये ही उदारीकरणा आधीच्या आयात पर्यटन औद्यगिकरणाच्या धोरणाच्या काळाचा परीणाम आहेत ज्याची विस्तृत नोंद साहित्यात(भगवती आणि देसाई, १९७०, पंगारीया, २००८) आहे. खरेतर, भारतीय उत्पादन क्षेत्रातील अनेक उप-समूह हे चीन मधील कंपनी समूहांशी तुलना केल्यास जास्त भांडवल केंद्रीत आहेत (बालसुब्रमण्यंम आणि सॅप्सफर्ड, २००७)

प्रधान यांच्या भारतीय कंपन्यांच्या थेट विदेशी गुंतवणुकीच्या विश्लेषणातील चल घटकांमध्ये व्यवस्थापन कौशल्य हा घटक सर्वात महत्वाचा आहे. खरच, भारतीय कंपन्यांचे व्यवस्थापन कौशल्य हे मालकी हक्काच्या लाभात असल्याने हा घटक उद्योग कंपन्याना विदेशात

जायला प्रभावीत करतो. व्यवस्थापन कौशल्यांचे वैशिष्टये सहज मोजता येत नाहीत. प्रधान ती कंपन्याच्या वयानुसार एकूण मालमतेच्या प्रत्येक घटका बरोबर असलेला नफा, आकार, संशोधन आणि विकास, आयात केलेल्या ज्ञानाचे मानधन, विक्री खर्च आणि उद्योग आणि उद्योगांची मालकी आणि प्रकार यांच्या कल्पित चलांच्या संचामध्ये त्याचे गणन करतात. व्यवस्थापन कौशल्याचा परतावा काढण्यासाठी अंदाजीत पातळीवरील नफा प्रत्यक्ष नफ्यातुन वजा केला जातो. ही व्यवस्थापन कौशल्य मोजण्याची भारतीय पद्धत असून ती व्यवस्थापकांमध्ये स्वाभाविक असते ज्यात संस्थेची वैशिष्ट्ये असणाऱ्या घटकां बाबतच्या उपक्रमात्मक कौशल्याचा समावेश होतो. या गणनात कदाचीत एक समस्या असु शकते ती म्हणजे ही पद्धत फक्त केवळ भांडवलावरील एकूण परतावा दाखवू शकेल जसे पगाराचे मुल्यावर्धीत. निव्वळ जर पगार कमी असेल वा रोजगार कमी असेल तर मुल्यावर्धीतातून पगार वजा केल्यावर राहणारी बाकी जास्त असेल. वेगळ्या प्रकारे जास्त नफा सांगायचा झाला तर तो व्यवस्थापकीय कल्पकतेचा उच्च परतावा नसून तो निव्वळ न कमावलेल्या उत्पनाच्या मार्क्स च्या तत्वाप्रमाणे मालकी भांडवलावरील एकूण परतावा आहे.

संस्थात्मक कौशल्य व्यवस्थापकीय प्रतिभेसहीत कोब्ब-डग्लस उत्पादन कार्य प्रकारातील 'ए' व्याख्येत (एकूण घटक उत्पादनता दर्शवणाऱ्या) दर्शवलेली असून ज्या स्थिर अनुमाप प्रत्ययाधीन असतील. उपलब्ध अंदाज हे दर्शवतात की, उदारीकरणानंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण घटक उत्पादनतेची वाढ फार जास्त झालेली नाही (देव कुसुम एत.एल.२०१०;गोल्डार आणि कुमारी,२००२, सेन,२००७). गोल्डर आणि कुमार यांचा अभ्यास भारतीय उत्पादन क्षेत्राच्या एकूण वार्षिक घटक उत्पादनाची उदारीकरणाचा पूर्व आणि नंतरच्या काळाशी तुलना केल्यावर घट दर्शवतो. साधारणपणे भारतीय कंपन्यांच्या क्षमतेचा कमी वापर यासाठी कारणीभूत आहे. आणखी एक अभ्यास (मुखर्जी आणि मुजुमदार, २००७) जो संघटीत भारतीय उत्पादन उद्योगांमध्ये १९८० ते २००० या काळात आलेल्या तांत्रिक बदलांचे विस्तृत विश्लेषण करतो तो ही अशाच निष्कर्षाप्रत येतो.

बऱ्याच उत्पादन कंपन्यांच्या बाबतीत असलेल्या तांत्रिक कार्यक्षमतेचा अभाव ही सबब घटकांचे उत्पादन वाढवण्यासाठी आवश्यक व्यवस्थापकीय प्रतिभेचा अभाव समजण्यात येऊ नये. किचकट कामगार कायदे आणि संधी हिरावून घेण्याचे नोकरशाहीचे इरादे यामुळे व्यवस्थापक कदाचीत भांडवल केंद्रीत तंत्रज्ञानाचा अवलंब करुन नफा जास्तीतजास्त कमावण्याचा प्रयत्न करु शकतात.

आधि संदर्भ दिलेली आकडेवारी असे दर्शवीते की, ज्या कंपन्यांचा नफा जास्त आहे त्यांचा कल विदेशात जाण्याकडे असतो. पण सगळ्याच अशा जास्त नफा असलेल्या कंपन्या विदेशात जाऊ शकतील असे नाही. खरतर विदेशात गुंतवणूक करणाऱ्या अनेक कंपन्यांनी गुंतवणुकीचा निधी कदाचीत आंततरराष्ट्रीय भांडवली बाजारतून उभा केलेला असतो. अशा भारतीय कंपन्या ज्यांनी विदेशात प्रवेश केला आहे त्यांना मालकी हक्काचा एक अनोखा लाभ होतो ज्याला आपण व्यवस्थापकीय कार्यक्षमता, धोका पत्करणे, अंदाज वर्तवणे आणि नव्या बाजारांचा शोध घेणे असे गुणधर्म असलेली उपक्रमशीलता म्हणू शकतो. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये या बाबतीत भारतीय कंपन्या कदाचीत विशेष असू शकतील. हे विशेष गुणधर्म भारतीय व्यवस्थापकांमध्ये कसे आणि कोठून येतात?

भारतीय कंपन्यांनी केलेल्या अधिग्रहणा बाबतीतील अहवाल असे दर्शवितो की, विदेशी गुंतवणूकदार भारतीय कंपन्यांमध्ये समभाग मिळवण्या ऐवजी रोखी मध्ये गुंतवणूक करायला पंसती देतात.

## VI विदेशात जाणाऱ्या भारतीय कंपन्यांचे विशेष गुणधर्म

कंपन्यांना विदेशात जाण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचे सामन्यपणे विधान करणे अशक्य आहे (राममुर्ती २००८, अथ्रेये आणि सायीद २०१३, अथुकोराला, २००९). उदयोन्मुख बाजारपेठांमधील बहुतेक कंपन्या ज्या विदेशात गुंतवणूक करतात त्यामागे अस्तित्वात असलेल्या कंपन्यांमधील तांत्रिक क्षमता मिळवणे हा हेतु असतो ज्याला मालमत्ता मिळवण्याचा हेतु असे म्हटले जाते. अस्तित्वात असलेल्या कंपन्यांच्या अधिग्रहणासाठी

व्यवस्थापनात्मक कार्यक्षमता लागते पण ती आकडेवारी दर्शवते त्याप्रकारची नाही. त्यांचा क्रम वेगळा आहे आणि त्यात त्यांचे स्वरुप ओळखण्याचा समावेश होतो आणि असे लक्ष्य असलेल्या कंपन्याकडे असणाऱ्या मालमत्तेची उत्पादनशीलता, त्यांची बाजारपेठेमधील उपयुक्तता, विदेशात कार्यरत असताना असणारी जोखीम आणि याहूनही महत्वाचे म्हणजे विदेशात कार्य सांभाळण्याचे असलेले कौशल्य यांचा समावेश होतो.

याहून अधिक, अधिग्रहीत कंपन्यांचे कदाचीत पुनरुत्जीवन करावे लागेल कारण त्या कदाचित त्यांच्या बाजारपेठा शोधून आणि विकसीत करण्याच्या क्षमतेच्या अभावामुळे आजारी असू शकतात जरी त्यांच्याकडे उत्पादनासाठी आवश्यक लाभ असले तरीही. विदेशात गुंतवणूक करणाऱ्या भारतीय व्यवस्थापकांमध्ये असे कौशल्य दिसून आले आहे वा किन्सने म्हंटल्या प्रमाणे ''उद्योजक आणि प्राण्यासारखी जिद्द (ॲनिमल स्पिरीट ऑफ आंत्रप्रेन्युअर) दिसून आली आहे. या अशा उपक्रमात्मक प्रतिभेमुळे अनेक भारतीय कंपन्या खासकरुन टाटांनी विदेशात गुंतवणुकीला लागणारे भांडवल अंतरराष्ट्रीय भांडवली बाजारातून उभे केले असावे. नॅथॅनेल लेफ्फ (१९७९) यांच्या शब्दांमध्ये, ''उपक्रमशीलता कदाचीत सरस माहिती खासकरुन कल्पनाशक्ती, जोखीम आणि नविन संधीतील अनिश्चितता वैयक्तीक स्तरावर कमी करु शकतो ज्याकडे गुंतवणूकदारांकडून दुर्लक्ष केले जाते आणि नाकारले जाते.''

उद्योजगतेच्या केलेल्या अभ्यासात उद्योजगतेची 'निकडीची उद्योजकता' आणि 'संधी उद्योजकता' (कोस्टर आणि राज,२००८) असे दोन विस्तृत गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. आधिची उद्योजकता जेंव्हा रोजगाराच्या संधी घटवतात आणि रोजगार शोधणाऱ्यांना उत्पादनाच्या सुविधा स्वत:लाच स्थापित कराव्या लागतात तेंव्हा संधीवर आधारीत उद्योजगता नविन बाजारपेठा या उद्योग मिळवण्याचा मार्ग आणि साधन आहेत. उदारीकरणाच्या नंतरच्या काळात विदेशाकडे धाव घेणाऱ्या भारतीय कंपन्यांचा समावेश कदाचित संधीवर आधारीत उद्योगजगतेत वा शुंपेटेरीयन उद्योगजगतेत होईल.

भारतीय उद्योगजगतेची प्रेरणा आणि कौशल्याचा शोध भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनेक खास वैशिट्यांमध्ये आहे ज्यात इतिहासातुन मिळालेल्या वैशीष्ट्यांचा समावेश होतो. भारताला जात आणि समाजाभिमुख उद्योजगतेचा जुना इतिहास आहे. यात बनिया आणि मारवाडी या समूहांचा समावेश होतो जे प्रामुख्याने व्यापारी आणि सावकार होते ज्यांनी ब्रिटीश काळात भारताच्या विदेशातील व्यापाराला वित्तपुरवठा करण्यात महत्वाची भुमिका बजावली. पारशी ज्यांचा हिंदु वा मुस्लिम समाज यांपैकी एकाही समूहाशी संबंध नव्हता त्यांचा दर्जा स्वत:चा असा खास होता. त्यांनी ब्रिटीश आणि भारतीय उद्योग समूहांमध्ये दुवा म्हणुन काम केले.

भारतीय उद्योजक वर्गाच्या अभ्यासामध्ये हरीश दामोदरन (२००८) यांनी ब्रिटीश आणि पारसी यांच्यातील विशेष नात्यांला पुढील प्रमाणे टिपले आहे; ''हिंदु वा मुस्लिम या मुख्य प्रवाहापासून दूर असल्यामुळे, राजकीय महत्वाकांक्षा नसल्यामुळे आणि सुरत, दमण आणि भरुच बंदराशी असलेल्या जवळीकतेमुळे त्यांचा व्यावसायीक प्रभावाशी संबंध आला. त्यामुळे पारशी स्थानिक दलाल, प्रतिनिधी आणि जहाजावरुन माल पाठवणारे म्हणुन योग्य ठरले(दामोदरन,२००८,पा.१४). त्यांचे ब्रिटीश इस्ट इंडीया कंपनी बरोबरचे व्यापारी संबंध हे खूप खोल होते ज्याचा संदर्भ १९व्या शतकातील चीन मधील आकर्षक मादक पदार्थांच्या व्यापाराशी आहे.

ई वेंकीज (कुक्कुटपालन व्यवसायातील भारतीय कंपनी) ने ''ब्लॅकबर्न रोव्हर्स'' या उत्तर इंग्लंड मधील फुटबॉल क्लब विकत घेणे हे केवळ त्यांच्या खेळाचे ज्ञान म्हणून नव्हे तर व्यवस्थापकांमधिल ॲनिमल स्पिरीट म्हणून बघावे लागेल.

पारसी आणि बनिया यांचे व्यापारी स्वारस्य कापूस, चहा, रेशीम आणि इतर कच्चा माल यांच्या जागतिक बाजारपेठेत असावे. भारतीय उद्योग उपक्रमांचे एक वैशिष्टये म्हणजे युरोपीयन आणि भारतीय संस्कृतीमध्ये सहज वावरण्याची त्यांची क्षमता हे होते. जसे तिर्थंकर रॉय (२०११) लिहितात औपचारीक समाजाच्या नियामांच्या विश्वात आणि औपचारीक वाणिज्य कायद्याच्या विश्वात भारतीय युरोपीयन लोकांपेक्षा सहज वावरले. ते दोन्ही विश्वात सहज यशस्वीपणे बसले आणि

युरोपीयन व्यापारांना मागे टाकून त्यांनी यासगळ्याचा फायद्यासाठी चांगल्या प्रकारे वापर केला.

भारतीय कंपन्यांमधे उद्योगजगतेच्या प्रतिभेचा विकास होण्यामागे दुसरे कारण म्हणजे उद्योग समूहांचे आधिपासून असलेले अस्तित्व, खासकरुन पारिवारीक प्रवृतीच. २००० ते २००८ या काळात करण्यात आलेल्या १३४७ विदेशी अधिग्रहणांमध्ये एक तृतीयांश हिस्सा हा उद्योग समूहांशी संलग्न कंपन्यांचा आहे, एकल कंपन्यांचा नव्हे. ही गोष्ट उद्योग समूहांना एकल कंपन्यापेक्षा असलेला सरस लाभ दर्शवते जी बाजारातील बाह्य घटकांचा वापर करणे शक्य करते. (प्रधान, २०१०, खन्ना आणि पेलेपु, १९९७, खन्ना आणि येतेह,२००७). उद्योग समूह आधारीत कंपन्या या भारतातच आहेत असे नाही तर इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्येही आहेत पण परिवार प्रवृत्ती हे कदाचीत भारतीय समुहांचे वैशिष्ठ्य असेल. उद्योग समुहांना तयार करणारे घटक विवीध उत्पादने आणि सेवा यांची निर्मिती करतात पण ते सर्व जोखिम पत्करतात ज्या वित्त पुरवठा, व्यवस्थापन आणि कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठीची गुंतवणूक यांवर अवलंबून असतात. उद्योग समूह विकसीत भांडवली बाजार आणि संस्थांची कमतरता विकसीत देशांमध्ये गुंतवणुकीची जोखीम आणि नियोजन करुन भरुन काढतात.

तिसरी गोष्ट म्हणजे ऐतिहासीक काळापासुन आजतागयत चालत आलेली भारतातील शिक्षण व्यवस्था जी अनोखी आहे. जसे तिर्थंकर रॉय (२०११) यांच्या मते, वसाहतीच्या काळात भारतातील शिक्षण व्यवस्था जातीवर आधारीत होती- "इतिहास काळातील शिक्षण पद्धतीची गरज ही सर्व पातळीवर जी काही जाती आणि समाज यांचा साक्षर सेवांशी असलेल्या संबंधामुळे त्यांच्या बाजूने झुकलेली होती. वसाहतींच्या आधीच्या काळात ज्या समुहांचा संबंध धर्मशास्त्राशी निगडीत धंद्यांशी, औषधे, शिक्षण आणि पौरोहीत्य अशा धंद्यांशी होता त्यांनी वसाहतीच्या काळात शिक्षण, औषधे आणि लोक प्रशासन या क्षेत्रात प्रवेश केला. या वर्गांनी आणि जातींनी शाळा आणि महाविद्यालये यांचा उत्साहाने फायदा घेतला. साक्षर सेवा आणि परिवाराच्या इतिहासाशी असलेला परस्पर संबंध, सेवा व्यवसायांना असलेले प्रधान्य आणि तशाच शिक्षणाला असलेले प्रधान्य यांचे केंद्रीकरण मुख्यत्वे मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या बंदर शहरामध्ये होते. शिक्षण व्यवस्था ही जातीवर आधारीत होती आणि ती ज्यांना व्यवसायात प्रवेश करायचा आहे अशांच्या वर्चस्वाखाली होती. त्यामुळे उच्च जाती समूहांनी प्राथमिक ते उच्च शिक्षणा पर्यंत मजल मारली आणि व्यवस्थेने त्यांच्या गरजांची काळजी घेताना सामान्य लोकांच्या प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. ही जाती आधारीत शिक्षण व्यवस्था मुख्यत्वे नागरी सेवा आणि व्यवसायोन्मुख होती ज्यामुळे सेवा गटात सेवा आधारीत अर्थव्यवस्था आणि सॉफ्टवेअरचा विकास झाला जे भारताचे विदेशातील प्रमुख गुंतवणूकदार आहेत.

भारतीय उद्योग समुहांमंध्ये व्यवस्थापनात नैपुण्य विकसीत होण्यामागे ब्रिटन आणि अमेरीकेत प्रवासी भारतीय समूहांची असलेली उपस्थिती महत्वाची आहे. गेल्या दशकातील उपलब्ध माहिती असे सांगते की, युके मध्ये १.६ दशलक्ष भारतीय असून जे तेथील १.८% लोकसंख्येसाठी तर अमेरीकेत २.८ दशलक्ष भारतीय असून ते तेथील ०.९% लोकसंख्येसाठी मार्गदर्शक ठरतात. युके आणि अमेरीकेतील हे व्यावसायिक भारतीय आणि विदेशी कंपन्यांमध्ये मध्यस्थ म्हणुन काम करतात ज्याला देवेश कुमार (२०१०) प्रतिष्ठित मध्यस्थ असे म्हणतात. जगदिश भगवती (१९७४) अशा अनेक प्रवासी भारतीय समुहांना ''टू एँड फ्रो'' म्हणतात कारण ते आपल्या रहिवासी देश आणि भारता दरम्यान वरचेवर प्रवास करतात आणि त्यांचे दोन्ही देशात व्यावसायीक संबंध असतात. तसेच ते दोन्ही देशांचे वित्तीय कायदे, बाजारपेठ कल, इत्यादिंबाबत विशेष रुची आणि अद्यावयत माहिती ठेवतात.

भारताच्या विदेशातील गुंतवणुकीच्या वाढीमागे आणखी दोन स्पष्टीकरणे असु शकतात. देशांतर्गत वातावरणापेक्षा विदेशी व्यावसायीक वातावरणात काम करणे हे कदाचीत जास्त सोपे असेल. अलीकडच्या काळात माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमधून भारतीय उद्योगपतींमधील संथ काम करणाऱ्या सरकारी नियंत्रण यंत्रणेबाबतची नाराजी समोर आली असून त्यात 'बॉलीगार्क' ज्यांनी नोकरशाही बरोबर कार्यत्मक नाते निर्माण केले आहे त्यांचाही समावेश होतो

(क्रॅबत्री).

दुसरी गोष्ट म्हणजे बऱ्यापैकी आकर्षण असलेल्या घरगुती बाजारा बरोबर विदेशी बाजाराच्या आकर्षणामागे भारत ब्रिटीशांचा १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील अनुभव प्रतिध्वनित करतो. १८७० ते १९१४ या काळात ब्रिटीशांनी रोखीतले भांडवल भरीव प्रमाणात वसाहतींमध्ये निर्यात केले. १९१४ मध्ये ब्रिटीशांचे विदेशातील भांडवल हे अंदाजे $२० अब्ज होते. ही भांडवलाची निर्यात होत असतांना स्वदेशात मोठ्याप्रमाणावरील बेरोजगारी आणि व्यापार संतुलनाची तुट होती. ब्रिटीशांची विदेशातील गुंतवणूक वसाहतींना मिळाली तर त्यांनी कर्जाची परतफेड निर्यातीच्या मिळकतीतून केली आणि विदेशातील गुंतवणुकीतून मिळालेल्या परताव्यावर ब्रिटीशांनी वसाहतीतुन कच्च्या मालाच्या आयातीची किंमत अदा केली. हा प्रकार १९८० मध्ये खासकरुन पुन्हा दिसून आला. ब्रिटीशांच्या भांडवलाच्या निर्यातीवरील परताव्यात असलेला फरक आणि देशीय समन्याय, ब्रिटीश विदेशी रोखे यात असलेली जोखीम यांचा संबंध लावणार्या मध्ये(टेमिन, १९८७) आणि ज्यांनी घरगुती बाजारपेठेत असलेल्या अपुरेपणाला (पोलार्ड, १९८५ ; बालसुब्रमण्यम, १९८९) यासाठी जबाबदार धरले त्यांच्यात वाद सुरु झाला. भांडवलाच्या निर्यातीला ब्रिटीशांच्या देशीय बाजारपेठमध्ये अपुरेपणा होता त्यात रचनात्मक ताठरता,कामगार संघटनांची ताकद आणि व्यवसाय पटकन न बदलण्याची तयारी या गोष्टी कारणीभूत होत्या. या सगळ्या कमतरता आणि ताठरता या गोष्टी आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेत स्पष्टपणे दिसतात आणि त्या कदाचीत भारतीय कंपन्यांच्या विदेशातील थेट परकीय गुंतवणुकीला कारणीभूत असू शकतात.

थोडक्यात, ज्याप्रकारच्या कुशलता भारतीय उद्योजकांकडे आहेत त्यांना विदेशात, स्थानीक बाजारपेठेत गुंतवणुकीमध्ये मदत करतात त्या त्यांना देशाच्या इतिहासातुन मिळाल्या आहेत त्यात उपक्रमशीलता आणि व्यावसायिक कौशल्य हे वसाहतीच्या काळातील तर अभीयांत्रिकी, मानवसंसाधन कौशल्य ही स्वातंत्र्योत्तर काळातील आहेत. ही कौशल्य तीन दशकांपेक्षाही जास्त चाललेल्या अगदी १९९१ पर्यंत चाललेल्या लायसन्स राजच्या काळात अडकून पडली होती. आर्थिक उदारीकरणामुळे जीन आपल्या बाटलीतुन बाहेर येऊ शकला म्हणजेच व्यावसायीक, कंटाळवाण्या आणि निराशादायक कायदे आणि नियमांबरोबर जुळवून घेण्याच्या कचाट्यातुन मुक्त झाला आणि जागतिकीकरण झालेल्या जगातील स्पर्धात्मक बाजारपेठेला सामोरे जाण्यास आणि तेथे जोखीम पत्करायला तयार झाला.

### तात्पर्य:

भारतातुन बाहेर जाणारी गुंतवणूकीची ऐतिहासिक कारणे ही गेल्या काही वर्षात भारतीय आर्थीक धोरणांमुळे आणि इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपेक्षा वेगळी आहे. हा लेख असे म्हणतो की, भारताच्या थेट विदेशी गुंतवणुकीमागील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे भारताला लाभलेला उपजत उद्योजकांचा वर्ग. हा लेख उद्योजक वर्गाच्या मुळांची तसेच इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांकडे नसलेल्या क्षमतां ज्या सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे निर्माण झाल्या आहेत. यांची चर्चा करतो १९९० मध्ये असलेले नियम आणि प्रतिरोध रद्दबातल ठरवण्यात आल्यामुळे उद्योजकांमधील 'ॲनिमल स्पिरीट' जागृत झाला आहे आणि ते जागातिक अर्थव्यवस्थेत व्यापार आणि गुंतवणुकीद्वारे सहभागी होत आहेत. संस्थात्मक, गुंतवणुकीच्या आणि बाजारपेठेच्या संधी हेरणे आणि उद्योजगतेची प्रतिभा या गोष्टीमध्ये असलेला भारतीय कंपन्यांचा मालकी हक्काचा लाभ त्यांना जागतिक बाजारपेठेत कार्य करणे शक्य करतो.

### संदर्भ:


अथ्रेये, एस. आणि सईद, ए. (२००३), फॉयनांशियल रिफॉर्म्स ॲंड इट्स इफेक्ट ऑन डोमेस्टीक ॲंड फॉरेन इंव्हेसमेंट इन चायना अँड इंडियाठ, पॅरॅलल ३जी इंस्टीट्युशन्स प्रेझेंटेशन्स(खाली उपलब्ध आहे)

[https://www.conftool.pro/aibuki2013/index.php?page=browseSessions&path=adminSessions&form_session=37&print=yes].

प्रेमचंद्र,ए. (२००९), "आऊटवर्ड फॉरेन डायरेक्ट इंव्हेसमेंट फरोम इंडिया'', एशियन डेवलपमेंट रिव्ह्यु, वॉल.२६, नं.२

बालसुब्रमंण्यम, व्ही.एन. (१९८९), ''कॅपिटल एक्सपोर्ट्स,

१८७०-१९१४'', इकॉनॉमिक हिस्टरी रिव्ह्यु, सेकंड एडिशन

बालसुब्रमंण्यम' व्ही.एन. अँड सॅप्सफोर्ड, डी(२००७) ''डझ इंडीया नीड लॉट मोअर एफडिआय? इकॉनॉमिकल अँड पॉलिटिकल वीक्ली, वॉल्युम ४२ नंबर 17pp1549-1555

भगवथी, जे. अँड देसाई पी. (१९७०),"इंडीया; प्लॅनिंग फॉर इंडस्ट्रीयलायझेशन अँड ट्रेड पॉलिसिज सिन्स १९५१'',ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

भगवथी, जे; रायटींग्ज ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यु दिल्ली-२००४ इन डिफेन्स ऑफ ग्लॉबलायझेशन, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस

बुक्ले, पी., क्लेग, जे., क्रॉस्स, ए., लियु, एक्स., व्होस, एच. & झेंग, पी. (२००७), "द डिटर्मीनंट्स ऑफ चायनाज आऊटवर्ड फॉरेन डायरेक्ट इंव्हेसमेंट्र, जर्नल ऑफ इंटरनॅशनल बिझनेस स्टडीज, Vol.38, P499-518.

क्रॅबेत्री, जे.(२०१२), इंडीया: बॉलिगार्क्स अॅट बे, फायनांशियल टाईम्स (खालील प्रमाणे उपलब्ध आहे) [http://www.ft.com/cms/s/0/aa6814e4-aee9-11e1-a8a7-00144feabdc0.html#axzz2S8aCdfKu].

दामोदरन, एच.(२००८ ''इंडियाज न्यु कॅपिटलिस्ट्स'', पेर्मनेंट ब्लॅक इन आणि न्यु इंडीया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने

कुसुम दास, डी, अजिज, इ., सुरेश, ए. आणि वाधवा, डी. (२०१०), "टोटल फॅक्टर प्रॉडक्टीविटी ग्रोथ इन इंडिया इन रिफॉर्म पिरेड, अ डिसग्रेगेटेड सेक्टोरिअळ ॲनालिसीस, अँड पेपर प्रेझेंटेड अॅथ द केलइएम कॉंफरस हॉवर्ड युनिवर्सिटी

डि ब्युले, फिलीप आणि दुआमु, जींग-लीन (२०१२) "लोकेशनल डिटर्मिनंट्स ऑफ इंटरनॅशनलायझेशन: अ फर्म लेव्हल ॲनालिसीस ऑफ चायनीज अँड इंडियन ॲक्वीझीशन्स'', युरोपीयन मॅनेजमेंट जर्नल, Vol.30, No.3, P264-277.

डुन्नींग, जे.(१९९३), (मल्टीनॅशनल एंटरप्रायजेस अँड ग्लॉबल इकॉनॉमी'', अॅड्डीसन-वेसले

गोल्डार, बी.एन अँड कुमारी, "इंपोर्ट लिबरायझेशन अँड प्रॉडक्टीव्हीटी ग्रोथ इन इंडियन मॅन्युफॅक्चरींग इंडस्ट्रीज इन इंडिया इन द १९९०,'' वर्कींग पेपर नं. E/219, इंस्टीट्युट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ, दिल्ली

गोल्डेस्टीन, ए. (२००८), ''इर्मजिंग इकॉनॉमिझ ट्रांसनॅशनल्स; द कसे ऑफ टाटाज'', ट्रांसनॅसनल कॉर्पोरेशन्स, Vol.17, No.3.

हायमर एस. "द इंटरनॅशनल ऑपरेशन्स ऑफ नॅशनल फर्मस: अ स्टडी ऑफ डायरेक्ट फॉरेन इंव्हेसमेंट'', केंब्रीज, एमए:एमअयटी प्रेस (१९६०,पीएचडी थिसीस).

( **प्राध्यापक व्ही. एन. बालसुब्रमण्यंम** हे लॅनकास्टर विद्यापिठ येथे लॅनकास्टर विद्यापिठ व्यवस्थापन शाळेत अर्थव्यवस्था विकास (एम्‌रिटस्) विषयाचे प्राध्यापक असून भारतीय अर्थव्यवस्थेवर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे एफडीआय सॉप्टवेअर इंडस्ट्री आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे विविध दृष्टीकोन यावरिल लेख राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय जर्नलसमधून प्रकाशित झाले आहेत. संपर्कासाठी इमेल - V.balasubramaniam@lancaster.ac.uk)

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. **व्हर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी)**
₹ ९०/-

२. **तिलक का मुकदमा (हिंदी)**
₹ ३३५/-

३. **राजभाषा (हिंदी)**
₹ १००/-

१. **एक देश एक हृदय (हिंदी)**

२. **उपभोक्ता संरक्षण (हिंदी)**

३. **पर्यावरण संरक्षण : चुनौतिया और समाधान**

# परकीय थेट गुंतवणूक : राज्यनिहाय बदल आणि धोरणातील परिवर्तन.

सोजिन शिन




**राज्यांमधिल 'संभाव्य दुरी' एफडीआयला आकर्षित करतांनांचं विविध राज्यांची कार्यक्षमता, गुंतवणुक प्रशासकीय व्यवस्था यावर प्रकाश टाकते. जरी सर्व राज्यांचे मुख्यमंत्री एफडीआय ला आकर्षित करण्यासाठी विविध उपाय उपयोजित असले तरी एफडीआयच्या अंत:स्त्रोत प्रक्रियेविरुद्ध असणाऱ्या सामाजिक घटकांवरही ही दूरी प्रकाश टाकते आहे. अशा वैविध्यपुर्ण आणि असमान राज्यांची कामगिरी त्यांच्या राज्यासाठी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक स्त्रोत वाढविण्यावर भर देत आहे तसेच विविध राज्यांची वेगवेगळी सामाजिक, राजकीय प्रणाली आत्मसात करण्याच्या प्रयत्नात आहे.**

देशाच्या सीमेपलिकडे अर्थात दुसऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये वास्तव्य करणाऱ्या गुंतवणुकदारांनी आपल्या देशातील उद्योग व्यवसायामध्ये लाभाच्या हेतूने केलेली गुंतवणूक म्हणजे 'परकीय थेट गुंतवणूक' अशी या संज्ञेची व्याख्या (ओईसीडी,२०१३) करण्यात आली आहे. आता हेच थोडे वेगळ्या शब्दात लिहायचे झाल्यास '' अनिवासी उद्योजकाने किंवा गैरभारतीय कंपनीने भारतातील उद्योग व्यवसाय अथवा कंपनीमध्ये भांडवली गुंतवणूक करायची''(जीओआय, २०१४:७). गुंतवणूक करतांना यामध्ये फक्त मालमत्तेची मालकी प्रस्थापित करायची इतकाच अर्थ मर्यादित नाही तर परकीय गुंतवणूदार उद्योगाच्या व्यवस्थापनाविषयीचे निर्णयही घेऊ शकणार आहेत. व्यवसायाच्या निर्णयाचे अधिकार परकीय गुंतवणुकदारांना असणार आहेत. म्हणजे आपल्या देशातील उद्योगांविषयीचे निर्णय परकीय भांडवलदार घेणार. आपल्या देशात येण्यासाठी आणि दीर्घ काळासाठी गुंतवणूक करण्यासाठी हीच सर्वात महत्वाची अट उद्योग व्यवसायांची असणार आहे. अर्थात या अटींचा नेमका फायदा किती प्रमाणात आणि कुणाला होणार याविषयी अद्याप संदिग्धता आहे. याविषयी केलेल्या अभ्यासात परस्परविरोधी मते समोर आली आहेत. परकीय गुंतवणुकीमुळे आर्थिक वृध्दीदर वाढेल आणि त्याचा लाभ अर्थातच अर्थव्यवस्थेला होईल, असे सांगण्यात येत आहे.(मॉरन,१९९८).

गेल्या दोन दशकांचा विचार केला तर भारत, चीन सारख्या देशांमध्ये परकीय गुंतवणुकीचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याने या दोन्ही देशांच्या बाजारपेठांची आणि त्याचबरोबर अर्थव्यवस्थांची स्थिती बऱ्यापैकी सुधारली आहे.( पहा-यूएनसीटीएडी अर्थात अंकटाड, २०१०). परकीय भांडवली गुंतवणूक करण्यास चीन आधीच अधीर झाला आहे. भारतामध्ये येवून उद्योग व्यवसाय सुरू करण्यास चीनची तयारी आहेच. केवळ एका संधीची वाट चीन पहात आहे. आपले उद्योग बाहेर नेण्याची तयारी करण्यामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतोय. ( अंकटाड,२०१३:१४). हे उभय देश परकीय भांडवली गुंतवणुकीचा फायदा कसा घेता येईल याचाच विचार करत आहेत. अर्थव्यवस्थेमध्ये पैसा येत राहिला तर रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर इतर सेवा व्यवसायही मोठ्या प्रमाणावर सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. उत्पादनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर करता येणार आहे. गुंतवणूकदार कंपन्यांना आपल्या कारभारात पारदर्शकता ठेवण्यावर भर

द्यावा लागणार आहे. व्यवस्थापनात अधिक गतिमानता आणता येणार आहे. यजमान देशाला आपल्या स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देणे शक्य होणार आहे. अगदी अशाच प्रकारे विकास दक्षिण कोरिया, हाँगकाँग आणि सिंगापूर या अशियाई देशांनी केला आहे. परकीय गुंतवणुकीच्या मदतीने आर्थिक विकास, तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती किती उत्तम प्रकारे साधता येते, याचे हे देश म्हणजे आदर्श उदाहरणे मानली पाहिजेत. परकीय गुंतवणूक सातत्याने होत राहिली तर देशाची अर्थव्यवस्था खूप झपाट्याने सुधारते, हे या छोट्या छोट्या देशांनी दाखवून दिले आहे.

**भारतातील परकीय गुंतवणूक आणि धोरणातील बदल-**

भारताने आपल्या अर्थविषयक धोरणात महत्वपूर्ण बदल केले आणि परकीय गुंतवणूकदार भारतात आले तर भारताच्या बाजारपेठेचे रुपांतर वैश्विक बाजारपेठेत होईल. वास्तविक गेल्या काही दशकापासून आपली बाजारपेठ जागतिक होऊ लागली आहेच, आता यापुढे ती जास्त-मोठ्या प्रमाणावर वैश्विक होईल.(मुखर्जी, २०१४ए).परकीय गुंतवणुकीबाबत धोरणांमध्ये कसकसे बदल होत गेले आणि त्यामध्ये कशी सुधारणा होत गेली याचे तीन वेगवेगळे टप्पे करता येतील.

१- परकीय गुंतवणुकीला तीव्र विरोध (१९६९-७५).

२- निवडक क्षेत्रात परकीय गुंतवणूक (१९७५-९१).

३- परकीय गुंतवणुकीची पाठराखण (१९९१नंतर). (शिन, २०१४).

परकीय गुंतवणुकीला ज्यावेळी सर्व थरातून तीव्र विरोध होत होता त्याचवेळी म्हणजे १९६९ मध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न ऐरणीवर होता. त्यावेळी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून तो प्रश्न सुटलाही. याचबरोबर 'फेरा' म्हणजे परकीय चलन नियामक कायदाही अस्तित्वात आला. यामुळे परकीय चलनाच्या व्यवहारावर सरकारला नियंत्रण ठेवणे शक्य झाले. 'फेरा'मुळे कोणतेही राज्य सरकार परकीय चलनाविषयीचा व्यवहार करू शकत नाही. यासंबंधीचे सर्व निर्णय रिझर्व्ह बँकेमार्फत अधिकृतपणे घेतले जाऊ लागले. यानंतर मात्र परिस्थितीमध्ये थोडाफार बदल होत गेला. काही क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला अंशत: मान्यता दिली जात असल्याने भारतीय उद्योगव्यवसायात परकीय गंगाजळी येऊ लागली. याबाबतीत १९७६ या वर्षात एक वेगळे वळण घेतले गेले असे म्हणता येईल. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हे वर्ष महत्वाचे मानले पाहिजे. फ्रँक (१९७८)यांनी याविषयी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे:

''परकीय भांडवलाचा मोठ्या प्रमाणावर आणि अधिक परिणामकारक वापर केला जाण्यासाठी राजकीय पातळीवरही आता प्राधान्याने अधिक विचार केला जाऊ लागला आहे. (पृ.४७३).''

राजीव गांधी सरकारने परकीय भांडवली गुंतवणुकीला स्पष्टपणे पाठिंबा दिल्यानंतर या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगलाच बदलला. १९८०च्या दशकाच्या प्रारंभी इंधन तेलाच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढल्या. सगळीकडेच आर्थिक मंदीचे सावट पसरले. संपूर्ण जगाला मंदीचे दुष्परिणाम जाणवत होते. अशावेळी बाहेरून कर्ज घेण्यापेक्षा परकीय गुंतवणुकीला परवानगी देणे चांगले आहे, असा विचार राजीव गांधी यांचा होता. त्यांनी नमूद केले की:

''परकीय गुंतवणुकीविषयी आमचे धोरण स्पष्ट आहे. हे काही मुक्तव्दार धोरण नाही. आमच्या अटींवर परकीय गुंतवणूकदारांना परवाना देण्यात येईल. काही विशिष्ट टक्क्यांपर्यंतच परकीय हिस्सा असेल. मात्र उच्च तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये थोड्या जास्त प्रमाणात गुंतवणुकीला परवानगी देण्यात येईल. या गुंतवणुकीमुळे निर्यातीस विशेष चालना मिळेल........गेल्या काही वर्षात आपल्या गरजा वाढत आहेत, त्याचा परिणाम म्हणजे परकीय कर्जाचा बोजा प्रचंड वाढत आहे. परंतु त्या तुलनेमध्ये थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाण खूपच कमी आहे. जर हे प्रमाण वाढले तर त्याचा फायदा कर्जांवर होऊ शकतो. कोणत्याही गुंतवणुकीमुळे जर उत्पादनात वृद्धी होत असेल तर कर्ज चुकविण्यास त्याची मदत होते. गुंतवणुकीचा लाभ उत्पादन वाढविण्यासाठी करणे आवश्यक आहे. ...... आपल्या अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर परकीय गुंतवणूक होऊ शकते. आपण अशी गुंतवणूक सामावून घेऊ शकतो. यासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया जलदतेने केली पाहिजे. या प्रक्रियेतील वेळखाऊ, अनावश्यक बाबी टाळण्याची गरज आहे. (गांधी,१९८८).

अखेर १९९०च्या दशकाच्या प्रारंभीच परकीय गुंतवणुकीविषयी नवीन आर्थिक धोरणाची निश्चिती करण्यात आली. या धोरणाचा आराखडा माँटेकसिंग अहलुवालिया यांनी तयार केला होता. १९९१ पासून या आरखड्याप्रमाणे आर्थिक सुधारणांना प्रारंभ करण्यात आला. या नवीन धोरणानुसार परकीय गुंतवणुकीची मर्यादा ४०टक्क्यांवरून ५१ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली होती. यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील देशांतर्गत कंपन्यांमध्ये परकीय गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर आपले भांडवल गुंतवू लागले. परंतु या धोरणामुळे पैसे देण्यासंबंधी काही प्रश्न निर्माण होऊ लागले. त्याचा परिणाम गुंतवणुकीवर होऊ लागला. (मुखर्जी,२०१४ब).

परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जात असतानांच्या काळात या धोरणात एक मोठा महत्वाचा बदल करण्यात आला. १९९९मध्ये परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) करण्यात आला. याआधी १९७३पासून 'फेरा' अर्थात परकीय चलन नियामक कायदा अस्तित्वात होता. 'फेमा'मुळे सेबीसारख्या संस्था रिझर्व्ह बँकेप्रमाणेच परकीय चलनाचे व्यवहार करू लागल्या. परकीय व्यवसायिक गुंतवणूकदार आणि थेट परकीय गुंतवणूक हा विषय आता सेबी आणि रिझर्व्ह बँक या दोघांच्याही काळजीचा विषय बनला. बाहेरच्या उद्योगसंस्था गुंतवणूक करत होत्याच, त्याचबरोबर आता समभाग बाजारातही परकीय गुंतवणूक आपोआपच होऊ लागली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय तसेच परकीय गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ (एफआयपीबी) यांच्यामार्फतही अनेक उद्योग भारतामध्ये गुंतवणूक करायला लागले. या काळात एफआयपीबीची भूमिका अतिशय महत्वाची बनली. कोणता प्रस्ताव स्वीकारायचा किंवा नाही, याचा निर्णय 'एफआयपीबी'मार्फत होऊ लागला. अर्थात 'फेमा'चा यामध्ये सहभाग आहेच. 'एफआयपीबी'मुळे लालफितीचा कारभार जवळपास संपुष्टात आला. एक खिडकी योजनेप्रमाणे परकीय उद्योगाला आवश्यक असणारे सर्व परवाने तातडीने दिले जाऊ लागले; आणि नंतर ते प्रस्ताव वेगवेगळ्या राज्यांकडे पाठवले जाऊ लागले. म्हणजे एखाद्या राज्यात परदेशी प्रकल्प उभा राहणार असेल तर त्याला केंद्राकडून लागणारे परवाने आधीच दिले जाऊ लागले. याआधी वित्त मंत्रालय अशा प्रकारचे प्रस्ताव तपासत असे. आता मात्र कागदी घोडे नाचवणे कमी करण्यासाठी वित्त मंत्रालयाला या प्रक्रियेतून वगळण्यात आले आहे. आपल्या वर्तमान पंतप्रधानांनी प्रभावी प्रशासकीय कारभारावर भर दिला आहे. प्रशासनातील दिरंगाई टाळण्यासाठी कामाच्या प्रक्रियेचे सुलभीकरण केले आहे. भारत म्हणजे परकीय गुंतवणूकदारांसाठी मोठा आणि महत्वाचा देश वाटला पाहिजे, यासाठी त्यांनी 'या....आणि भारत घडवा' अशी घोषणा केली आहे. 'एफडीआय' ही संज्ञा त्यांनी 'फर्स्ट डेव्हलप इंडिया' अशी वापरली आहे. सर्वप्रथम भारताचा विकास! अशी घोषणा पंतप्रधानांची आहे. ''चांगल्या प्रशासनाचे तीन महत्वाचे स्तंभ आहेत- एक म्हणजे सुशासन, दुसरे म्हणजे परवाना राज्य बंद करणे आणि नियम-अटींमध्ये शिथिलता आणणे. तिसरा स्तंभ म्हणजे उद्योग व्यवसायांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे. औद्योगिक सोपान तयार करणे, सुरक्षा, बांधकाम आणि रेल्वे या क्षेत्रात परकीय गुंतवणूक होणे गरजेचे आहे.'' उत्पादन तसेच पायाभूत क्षेत्रांबरोबरच सरकारने आणखी काही क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणुकीला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये हवाई वाहतूक, जैवतंत्रज्ञान, रसायने, बांधकाम, खनीज व्यवसाय, तेल आणि वायू, औषधे, नूतनीकरण होऊ शकणारे ऊर्जा उद्योग यामध्ये परकीय थेट गुंतवणूक केली जाऊ शकणार आहे.

**राज्यांमध्ये होणाऱ्या थेट परकीय गुंतवणुकीचा स्तरः**

वास्तविक, २०११मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३टक्के थेट परकीय गुंतवणूक झाली असल्याचा अहवाल आहे(अंकटाड, २०१३). साधारणपणे ३२ अब्ज अमेरिकन डॉलर गुंतवणूक झाली. सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सुधारणांचा कार्यक्रम राबविणे सुरू ठेवल्यामुळे परकीय गुंतवणुकदारांचा ओघ सातत्याने वाढत राहिला. परकीय गुंतवणुकीला सरकारने चांगल्या पद्धतीने पाठिंबा देऊनसुद्धा काही राज्यांमध्ये मात्र या गुंतवणुकीकडे तितके गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही. हे स्पष्ट करणारी आकडेवारी खाली देण्यात आली आहे. पहिल्या क्रमांकाच्या चौकटीमध्ये एप्रिल २००० ते जून २०१४ मध्ये वेगवेगळ्या राज्यांमध्ये परकीय थेट गुंतवणूक किती झाली, हे स्पष्ट करण्यात आले आहे. दिल्ली आणि महाराष्ट्रामध्ये

चांगली गुंतवणूक होऊ शकली. त्याखालोखाल तमिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये गुंतवणूक झाली. तर पश्चिम बंगाल, ओडिशा या राज्यांमध्ये अतिशय कमी प्रमाणात परकीय गुंतवणूक होऊ शकली.

**परकीय गुंतवणुकीतून रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयांना मिळालेल्या निधीचा तपशील. (एप्रिल २००० ते जून २०१४).**

| रिझर्व्ह बँकेचे विभागीय कार्यालय | राज्यांची नावे | आलेली गंतवणूक आकडे कोटी रू.मध्ये | गुंतवणुकीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| मुंबई | महाराष्ट्र | ३२०,२८१ | ३० |
| नवी दिल्ली | दिल्ली | २१४,८२० | २० |
| चेन्नई | तामिळनाडू | ६९,१६१ | ६ |
| बंगळूरू | कर्नाटक | ६२,४३१ | ६ |
| अहमदाबाद | गुजरात | ४५,२९२ | ४ |
| हैद्राबाद | आंध्रप्रदेश | ४३,८१७ | ४ |
| कोलकाता | पश्चिम बंगाल | १३,५३२ | १ |
| भुवनेश्वर | ओडिशा | १,९६२ | ०.२ |

स्त्रोत : भारत सरकारच्या औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाच्यावतीने परकीय थेट गुंतवणुकीविषयी ही वस्तुस्थिती दर्शविणारी माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रस्तुतमाहिती- http://dipp.nic.in/English/Publications/FDI_Statistics/2014/india_FDI_June2014.pdf (accessed on 10 November 2014)- या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ही आकडेवारी पाहिल्यानंतर एक महत्वपूर्ण समीक्षात्मक प्रश्न उपस्थित होतो. परकीय गुंतवणूक आपल्या राज्यात यावी म्हणून काही ठराविक राज्येच तसे वातावरण तयार करतात? आणि बाकीची राज्ये याविषयी इतकी उदासिन का आहेत?

विशेष म्हणजे ओडिशासारख्या राज्यात विकासाला इतक्या संधी असतानाही तिथे परकीय थेट गुंतवणुकीला सातत्याने विरोध होत आहे. उदाहरणार्थ- दक्षिण कोरियाच्या पोहांग स्टील कंपनीने ओडिशातील जगतसिंहपूर या परिसरात मोठा प्रकल्प उभा करण्याचा निर्णय घेतला. परंतु स्थानिक रहिवाशांनी केलेल्या प्रचंड विरोधामुळे त्याभागात कंपनीला जमीन मिळणे कठीण झाले. विशेष म्हणजे केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयानेही या स्टील प्रकल्पाला परवानगी दिली आहे. पर्यावरणाची कोणतीही हानी होणार नाही, याची काळजी घेवून प्रकल्प उभा करण्याची तयारी पोहांग कंपनीने दाखवली, तरीही स्थानिक रहिवाशांचे मन वळविण्यास ओडिशा सरकारला अपयश आले. हा प्रकल्प व्हावा अशी त्यापरिसरातील काही नागरिकांची इच्छा नाही. त्यामुळे जमीन ताब्यात घेण्यापूर्वी जनतेचे एकमत होऊ शकलेले नाही. प्रकल्पाला होणाऱ्या विरोधाची धार इतकी तीव्र होत गेली की, जगतसिंहपूर भागातील कायदा-सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली. अखेर प्रकरण न्यायालयात गेले. (पिंगळे, पांडे आणि सुरेश, २०१०:३-५). आता मद्रास उच्च न्यायालयात याची सुनावणी सुरू आहे. पोहांग कंपनी, राज्य सरकार आणि प्रकल्पाला विरोध करणारे ग्रामस्थ यांच्या चौकशा सुरू आहेत. अगदी याचप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये सिंगूर इथे टाटा कंपनीला नॅनो गाडीचा कारखाना काढताना प्रचंड विरोध सहन करावा लागला. अखेर कंटाळून नाईलाजाने टाटा कंपनीने कारखान्याचे स्थानच बदलले. वास्तविक टाटा काही परकीय कंपनी नव्हती, देशातीलच होती तरीही स्थानिक जनतेने विरोध केलाच. कोणत्याही प्रकल्पाला जमीन मिळण्यात अडचण येते ती दोन कारणांमुळे! पहिले म्हणजे

जमिनीचे केले जाणारे मूल्यमापन किंवा किंमत निश्चिती आणि त्याबदल्यात दिला जाणारा मोबदला. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे प्रकल्पामुळे होणाऱ्या विस्थापितांचे पुनर्वसन करण्यास लागणारा विलंब. या दोन्ही प्रश्नांच्या सोडवणुकीचे कोणतेही ठोस धोरण पश्चिम बंगाल सरकारकडे नव्हते, त्यामुळे सिंगूरच्या नागरिकांनी नॅनोच्या प्रकल्पाला विरोध केला. (पहा चंद्रा, २००८). थोडक्यात काय परकीय गुंतवणुकीला आपल्या राज्यात आकर्षित करून घेण्यासाठी त्या राज्य सरकारची कसोटी पणाला लागते. एखादा प्रकल्प राज्यात आणायचा ठरवले तर त्याला स्थानिक लोकांचा विरोध होणार नाही ना? आणि अशी परिस्थिती निर्माण झालीच तर प्रशासकीय आणि सामाजिक पातळीवरून हा विरोध कसा संपुष्टात आणायचा हे राज्य सरकारला जमले पाहिजे. एकूण काय तर परकीय थेट गुंतवणुकीचा विचार करताना सामाजिक-राजकीय पार्श्वभूमीचा विचारही तितकाच महत्वपूर्ण ठरतो.

**संदर्भ** -


चंद्रा, निर्मल कुमार (२००८).''टाटा मोटर्स इन सिंगूर : ए स्टेप टुवर्डस् इंडस्ट्रीलायलझेशन ऑर पौपेरिसेशन?''इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल वीकली. व्हॉल्यूम. ४३, नं.५० : ३६-५१.

फ्रँक, आंद्र गुंडेर(१९७७). ''इंमर्जन्सी ऑफ पर्मनंट इंमर्जन्सी इंन इंडिया'' इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल वीकली. व्हॉल्यूम.१२, नं.११:४६३-७५.

गांधी, राजीव (१९८८). ''इनॉग्रल ऍड्रेस बाय द प्राईम मिनिस्टर ऑफ इंडिया''. पेपर प्रेझेंटेशन एॅट द नॅशनल कॉन्फरन्स ऑफ ट्रान्सफॉर्मेशन ऑफ इंडियन इंजीनिअरिंग इडस्ट्री, एप्रिल १९.

गव्हर्नमेंट ऑफ इंडिया (२०१४).''कन्सॉलिडेटेड एफडीआय पॉलिसी'', डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रीयल पॉलिसी अँड प्रमोशन, मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री. http://dipp.nic.in/English/Policies/FDI_Circular_2014.pdf (accessed on 7 November 2014).

क्रुएजर, ऍनै ओ. अँड ताकातोशी आयटो (२०००). द रोल ऑफ फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट इन इस्ट एशियन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट. शिकागो: युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस.

मॉरन डिओडोर एच. (१९९८). फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट अँड डेव्हलपमेंट: द न्यू पॉलिसी एजेंडा फॉर डेव्हलपिंग कंट्रीज् अँड इकॉनॉमिक्स इन ट्रान्सिशन. वॉशिंग्टन, डीसी: इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स.

मुखर्जी, राहुल (२०१४ बी). ऑक्सफर्ड इंडिया शॉर्ट इंट्रोडक्शन: पॉलिटिकल इकॉनॉमी ऑफ रिफॉर्म्स इन इंडिया. न्यू दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

ओईसीडी (२०१३). ''ओईसीडी फॅक्टबुक २०१३: इकॉनॉमिक, एनव्हार्यनमेंटल अँड सोशल स्टॅटिस्टीक्स.''

पिंगळे, उर्मिला, देवेंद्र पांडे, अँड व्ही. सुरेश(२०१०). ''मेजॉरिटी रिपोटर्स ऑफ द पॉस्को एन्क्वायरी कमिटी, एक्झिक्युटिव्ह समरी.'' दिल्ली. २ फेब्रुवारी,२०१२.

शिन, सोजिन (२०१४). ''एफडीआय इन इंडिया : आयडियाज्, इंट्रेस्टस् अँड इन्स्टिट्युशनल चेंजस.'' इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल वीकली. व्हॉल्यूम.४९, नं.३: ६६-७१.

अंकडाट (२०१०). ''रिजनल ट्रेंड्स् : साऊथ, ईस्ट, अँड साऊथ-ईस्ट अशिया.'' जिनेव्हा: अंकटाड.

अंकटाड (२०१३). ''वर्ल्डस् इन्व्हेस्टमेंट रिपोर्ट २०१३: ग्लोबल व्हॅल्यू चेन्स, इन्व्हेस्टमेंट अँड ट्रेड फॉर डेव्हलपमेंट.'' इन डब्ल्युआयआर. न्यू यॉर्क अँड जिनेव्हा: अमेरिका.



*(**सोजिन शिन** :- सिंगापूर येथिल राष्ट्रीय सिंगापूर विद्यापीठात दक्षिण आशियाई स्टडीज विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत. त्यांचा आवडीचा विषय ''भारताची राजकीय अर्थव्यवस्था आणि राज्यांचे राजकारण हा आहे.*

**संपर्कासाठी इमेल:**
sajin@nus.edu.sg)

# भारतीय राज्यांमधील थेट परकीय गुंतवणुकीचा प्रादेशिक असमतोल.

डॉ. एस.आर.केशवा



**सत्तर टक्के थेट परदेशी गुंतवणूक एकवटलेल्या सहा राज्यात प्रादेशिक असमानता वाढली आहे. या अभ्यासात असे दिसून येते की, लोकसंख्येच्या घनतेचा थेट परदेशी गुंतवणूकीशी नगण्य संबंध असतो. कौशल्याधारित कामगार, आर्थिक वाढ, चांगल्या पायाभूत सुविधा, वीज क्षमता यांचा थेट परकीय गुंतवणुकीवर सकारात्मक परिणाम होतो पण आर्थिक स्वातंत्र्याशी थेट परकीय गुंतवणुकीचा मध्यम संबंध असतो. राज्य सरकारांनी परदेशी गुंतवणूकदारांना सवलती देण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जर मध्यम गुंतवणूक असलेल्या व कमी गुंतवणूक असलेल्या राज्यांनी प्रशासन सुधारले त्यात पारदर्शकता आणली, भ्रष्टाचार नष्ट केला, शिवाय पायाभूत सुविधा दिल्या तसेच राज्ये अधिक गतीशील व संवेदनक्षम बनवले तर त्यांच्याकडेही थेट परकीय गुंतवणूक वाढू शकेल.**

थेट परकीय गुंतवणूक ही इतर कुठल्याही भांडवली ओघापेक्षा जगात जास्त पसंत केली जाते. कारण ते बिन कर्जाचे आर्थिक भांडवल असते. थेट परकीय गुंतवणुकीमुळे यजमान देशाच्या अर्थव्यवस्थेत परकीय भांडवलाची भर पडते व त्याचे आणखी चांगले परिणाम मिळत जाऊन रोजगार, उत्पन्न व बचत वाढते. त्यामुळे देशात आधुनिक यंत्रे, आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास होतो, कौशल्य प्राप्त होते, व्यवस्थापकीय ज्ञान येते व उत्पादित वस्तूंच्या निर्यातीलाही उत्तेजन मिळते, त्याचबरोबर यजमान देशातील सेवा क्षेत्रासही उत्तेजन मिळते. त्यामुळे कंपन्यांमध्ये वस्तूंच्या गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धा होऊन ग्राहकांना विविध पर्याय मिळतात. स्पर्धेमुळे देशांतर्गत मक्तेदारी संपुष्टात येते व वस्तूंच्या किंमती कमी होतात. थेट परकीय गुंतवणुकीने कंपनी कराचा महसूल यजमान देशात वाढत जातो.

यातील सकारात्मक परिणाम म्हणजे सैद्धांतिक पातळीवर परकीय गुंतवणूक योग्य वाटते पण जेव्हा आपण वास्तवाचा विचार करू लागतो तेव्हा तेव्हा ते अर्धसत्य आहे हे लक्षात येते काही वेळा थेट परदेशी गुंतवणुकीने कुठलेच आधुनिक तंत्रज्ञान देशात येत नाही व रोजगारही वाढत नाही. तथापि अनेक अर्थव्यवस्था थेट परकीय गुंतवणुकीत वाहवत गेल्या आहेत. विविध प्रादेशिक सरकारे या परदेशी गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना अनेक सवलती व प्रोत्साहने देत सुटली आहेत, त्यासाठी त्यांच्यात स्पर्धाच लागली आहे. ही सरकारे केवळ जमीन, पाणी व सार्वजनिक सुविधा एवढ्याच सुविधा देतात असे नाही तर करसवलत जाहीर करतात, अवितरित नफ्यावर सूट देतात. अतिरक्त घसारा भत्त्यांवर सूट देतात, थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी त्यांना एवढा द्राविडी प्राणायाम करावा लागतो.

एवढ्या सोयी, सवलती व प्रोत्साहने देऊनही सर्वच देशात थेट परकीय गुंतवणूक एक समान पातळीवर जात नाही. काही अर्थव्यवस्थांमध्येच थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढतो त्यामुळे जगात प्रादेशिक पातळीवर थेट परकीय गुंतवणुकीची असमानता असते. काही देशात ही गुंतवणूक कमी तर काही देशात जास्त असते. भारतातील राज्यांनाही हाच नियम लागू पडतो, काही राज्यात परकीय गुंतवणूक अधिक तर काही राज्यात ती जास्त आहे.

## अनुकूल घटक

काही राज्यात थेट परकीय गुंतवणूक वाढण्याचे कारण म्हणजे गुंतवणूकदारांवर प्रभाव टाकण्याची क्षमता कमी पडते. गुंतवणुकदारांना निर्णय घेता येईल अशी अनुकूल स्थिती नसते. आंतरराष्ट्रीय अर्थ आयोगाने वर्ष २००१ मध्ये हे दाखवून दिले होते की, बाजारपेठेचा आकार किती आहे व वाढीची क्षमता किती आहे, आर्थिक स्थिरता. बाजारपेठ निकटता किती आहे. प्रशिक्षित मनुष्यबळ किती आहे व वेतन रचना कशी आहे, परकीय गुंतवणुकीस आवश्यक असलेल्या औद्योगिक व संस्थात्मक पायाभूत सुविधा कशा आहेत

१९९३ मध्ये झालेल्या एका अभ्यासात ड्युनिंग यांनी असे दाखवून दिले आहे की, बाजारपेठेचा आकार, कामगारांचे मूल्य, नैसर्गिक स्त्रोतांची उपलब्धता, मानवी व यांत्रिक पायाभूत सुविधा यावर थेट परकीय गुंतवणूक येणार की नाही हे अवलंबून असते.

भारतीय परकीय व्यापार संस्थेने १९९४ मध्ये असे दाखवून दिले हे की, १. साधारण कायदा व सुव्यवस्था २. पायाभूत सुविधा. ३. सौहर्दाचे औद्योगिक संबंध ४. प्रशिक्षित व उत्पादनक्षम मनुष्यबळ ५. सामाजिक पायाभूत सुविधा ६. गुंतवणूकदार स्नेही पर्यावरण ७. राजकीय स्थिरता, ८. वेळेवर परकीय गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी ९. कमीत कमी नोकरशाही १०. प्रोत्साहने व सवलती यावर थेट परकीय गुंतवणूक अवलंबून असते.

## थेट परकी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आंतरराज्यीय स्पर्धा

बहुतांश भारतीय राज्यांना असे वाटते की, थेट परकी गुंतवणुकीमुळे व त्याला प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक वाढीची प्रक्रिया जलद होईल. बँकांकडून व्याजदरातील सवलती, अबकारी करात सूट , कर लांबणीवर टाकण्याच्या योजना तसेच कमी केलेले वीज दर व इतर सेवांचे दर, विशिष्ट काळात मालमत्ता करातील, सुट असे फायदे थेट परकीय गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना दिले जातात.

राज्ये नेहमी विशिष्ट उद्योग थेट परकीय गुंतवणुकीसाठी हेरून ठेवतात. त्यासाठी औद्योगिक , कृषी प्रक्रिया व आयटी पार्क यांना महत्व दिले जाते. राज्ये जमिनीच्या नोंदणीपासून एक खिडकी योजना सुरू करतात. अनेक प्रक्रिया या कंपन्यांसाठी सुलभ केल्या जातात, अर्थात त्यामुळे भ्रष्टाचार कमी होऊन पारदर्शकता येते

## भारतीय राज्यांमध्ये थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ

अनेक सवलती व उपायोजना यांचा वापर करूनही भारतातील राज्यात थेट परकीय गुंतवणुकीत असमानता दिसते. यात लेखकाने जास्त परकीय गुंतवणुकीचा ओघ असलेली राज्ये, गुंतवणुकीचा मध्यम ओघ असलेली राज्ये व गुंतवणुकीचा कमी ओघ असलेली राज्ये अशी वर्गवारी केली आहे. एप्रिल २००० ते एप्रिल २०१३ (तक्ता१ बघा) या काळातील गुंतवणुकीवर ही वर्गवारी केली आहे.

थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ भारतात सहा राज्यात आहे त्यात महाराष्ट्र, नवी दिल्ली, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश यांचा समावेश आहे. त्यांनी ६९३६४१ कोटी रूपयांची आवर्ती थेट परकीय गुंतवणूक मिळवली आहे, हा आकडा एप्रिल २००० ते जून २०१४ या काळातील आहे. भारतातील थेट परकीय गुंतवणुकीच्या ७० टक्के गुंतवणूक या राज्यात आहे. महाराष्ट्रात एप्रिल २००० ते जून २०१४ या काळात ३० टक्के म्हणजे (३२०२८१ कोटी रूपये) परकीय गुंतवणूक आहे. मुंबई या महाराष्ट्राच्या राजधानीत सर्वात अधिक थेट परकीय गुंतवणूक झालेली आहे. मुंबई ही व्यापारी राजधानीच नाही तर भारताची थेट परदेशी गुंतवणुकीचीही राजधानी आहे.

महाराष्ट्राच्या खालोखाल नवी दिल्ली रू. २१४८२० कोटी (२० टक्के), तामिळनाडू रू. ६९१६१ कोटी (६ टक्के), कर्नाटक रू. ६२४३१ कोटी ( ६ टक्के), गुजरात रू. ४५२९२ कोटी ( ४ टक्के), तेलंगणा व आंध्र प्रदेश रू. ४३८१३ कोटी (४ टक्के) याप्रमाणे थेट परकीय गुंतवणूक आहे.

तक्ता क्रमांक १

| आरबीआयचे अधिकृत कार्यालय | अंतर्गत राज्ये | २०१३-१४ (एप्रिल ते मार्च) | आवर्ती गुंतवणूक आवक (एप्रिल २००० ते जून २०१४) | एकूण गुंतवणुकीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **जास्त परकीय गुंतवणूक असलेली राज्ये** | | | | |
| **मुंबई** | महाराष्ट्र<br><br>दादरा नगर हवेली, दमण व दीव | २०,५९५ | ३२०,२८१ | ३० |
| **नवी दिल्ली** | दिल्ली , उत्तर प्रदेशचा भाग व हरियाणा | ३८,१९० | २१४,८२० | २० |
| **चेन्नई** | तामिळनाडू व पाँडिचेरी | १२,५९५ | ६९,१६१ | ६ |
| **बंगळुरू** | कर्नाटक | ११,४२२ | ६२,४३१ | ६ |
| **अहमदाबाद** | गुजरात | ५,२८२ | ४५,२९२ | ४ |
| **हैदराबाद** | आंध्र प्रदेश | ४,०२४ | ४३,८१७ | ४ |
| **परकीय गुंतवणुकीचा मध्यम ओघ असलेली राज्ये** | | | | |
| **कोलकाता** | पश्चिम बंगाल, सिक्कीम, अंदमान व निकोबार<br><br>बेटे | २,६५९ | १३,५३२ | १ |
| **जयपूर** | राजस्थान | २३३ | ६,३६० | ०.६ |
| **चंदीगढ** | चंदीगढ, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश | ५६२ | ६,१४८ | ०.६ |
| **भोपाळ** | मध्य प्रदेश व छत्तीसगड | ७०८ | ५,५९५ | ०.५ |
| **कोची** | केरळ व लक्षद्वीप | ४११ | ४,८७५ | ०.४ |
| **थेट परकीय गुंतवणुकीचा कमी ओघ असलेली राज्ये** | | | | |
| **पणजी** | गोवा | १०३ | ३,६६० | ०.४ |
| **भुवनेश्वर** | ओरिसा | २८८ | १,९२६ | ०.२ |
| **कानपूर** | उत्तर प्रदेश उत्तरांचल | १५० | १,९६२ | ०.२ |
| **गुवाहाटी** | आसाम, अरूणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय,<br><br>मिझोराम, नागालँड व त्रिपुरा | ४ | ३५२ | ० |
| **पाटणा** | बिहार, झारखंड | ९ | २२८ | ० |
| **न दाखवलेले प्रदेश** | | ५०२८३ | २८६६०४ | २६ |
| **एकूण** | | १४७,५१८ | १,०७६,०९३ | १००% |
| माहिती एसइए संकेतस्थळावरून घेतली आहे. | | | | |

ज्या राज्यांनी एप्रिल २००० ते जून २०१४ या काळात ४५०० कोटी रूपये ते ४०००० कोटी रूपये थेट परकीय गुंतवणूक मिळवली आहे त्यांचा समावेश मध्यम गुंतवणूक मिळवणाऱ्या राज्यात करता येईल त्यात पश्चिम बंगाल, सिक्कीम, राजस्थान, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगड व केरळ या राज्यांचा त्यात समावेश होतो.

ज्या राज्यांना एप्रिल २००० ते जून २०१४ या काळात ४५०० कोटी रूपयांपेक्षा कमी थेट परकीय गुंतवणूक मिळाली आहे ते कमी गुंतवणूक मिळालेल्या राज्यात मोडतात. या राज्यांमध्ये गोवा, ओडिशा, आसाम, अरूणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा व बिहार-झारखंड या राज्यांचा समावेश होतो.

विशेष करून राज्यांच्या राजधान्यांनी जास्त थेट परकीय गुंतवणूक मिळवलेली दिसते. करसवलती व इतर आर्थिक सवलती असतांनाही प्रत्येक राज्यात सारखीच थेट परकीय गुंतवणूक झालेली दिसत नाही. ती काही राज्यातच एकवटलेली दिसते तसेच राज्यांमधील काही शहरांमध्येच ही गुंतवणूक आहे. अशी असमानता का याची कारणे शोधण्यासाठी स्थूल आर्थिक निर्देशकांचा वापर करावा लागतो व राज्यांच्या दृष्टीने त्याचे विश्लेषण करावे लागते.

**थेट परकीय गुंतवणुकीतील प्रादेशिक असमतोलाची कारणे**

थेट परकीय गुंतवणुकीतील प्रादेशिक असमानतेची अनेक कारणे सांगता येतील मोठ्या बाजारपेठा, कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची उपलब्धता, आर्थिक वाढ, चांगल्या पायाभूत सुविधा, जास्त आर्थिक स्वांतत्र्य व उद्योगास अनुकूल वातावरण ही त्याची महत्वाची कारणे आहेत लोकसंख्येची घनता, साक्षरता , उच्चशिक्षणातील विद्यार्थ्यांची जास्त संख्या व थेट परकीय गुंतवणूक.

थेट परकीय गुंतवणूक ही जास्त लोकसंख्या असलेल्या बाजारपेठेमुळे येते, शिवाय कौशल्य. असलेले मनुष्यबळ, साक्षरता, उच्च शिक्षणाचे वाढते प्रमाण, विद्यापीठे व महाविद्यालयांची संबंधित राज्यातील संख्या (तक्ता २ पाहा) यावर बरेच काही अवलंबून असते. अनेक विद्यार्थी परराज्यात, परदेशात शिक्षणासाठी जातात तसेत जास्त विद्यार्थी हे त्या राज्यातच शिक्षण घेत असतात

देशाची लोकसंख्या किती आहे यावरही थेट परकीय गुंतवणूक अवलंबून असते. भारतीय राज्यांच्या बाबतीत अनेक राज्ये जास्त लोकसंख्येची आहेत. उत्तर प्रदेशात १६.४९ टक्के लोक राहतात पण तेथे थेट परकीय गुंतवणूक कमी आहे. बिहारमध्ये ८.५८ टक्के लोक राहतात व राजस्थानात ६.६९ टक्के लोक राहतात तेथील थेट परकीय गुंतवणूक कमी आहे.

पण लोकसंख्येचाच निकष लावायचा तर ९.२९ टक्के लोक राहणाऱ्या महाराष्ट्रात (लोकसंख्येत देशात दुसरे राज्य) देशातील सर्वाधिक परकीय गुंतवणूक आहे. तामिळनाडूत ५.९६ टक्के लोक राहतात . कर्नाटकात ५.०५ टक्के लोक राहतात व गुजरातेत ४.९९ टक्के लोक राहतात तेथे लोकसंख्या मध्यम असूनही थेट परकीय गुंतवणूक जास्त आहे. त्यात दिल्ली ( १.३८ टक्के लोक) व पाँडिचेरी (०.१० टक्के लोक) यांचा समावेश मात्र करता येत नाही

एका राज्यातील सेवा व वस्तू या दुसऱ्या राज्यात सहज उत्पादित करता येतात त्यामुळे लोकसंख्या हा थेट परकीय गुंतवणुकीचा महत्वाचा निकष ठरत नाही.



तक्ता क्रमांक २

| राज्ये | एकूण लोकसंख्या टक्क्यात | दर चौरस कि.मीला लोकसंख्येची घनता | साक्षरता टक्के | विद्यापीठे ( टक्के- २०११-१२) | महाविद्यालयांची संख्या | नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| जास्त थेट परकीय उत्पन्न असलेली राज्ये | | | | | | |
| महाराष्ट्र | ९.२९ | ३६५ | ८२.९१ | ४४ | ४६०३ | १९५५२२६ |
| दिल्ली | १.३८ | ११,२९७ | ८६.३४ | २५ | १८४ | २७८७७० |
| तामिळनाडू | ५.९६ | ५५५ | ८०.३३ | ५९ | २३०९ | १४८२२७७ |
| पाँडिचेरी | ०.१० | २.५९८ | ८६.५५ | ४ | ८३ | ३५१२२ |
| कर्नाटक | ५.०५ | ३१९ | ७५.६ | ४३ | ३२८१ | १००१४७३ |
| गुजरात | ४.९९ | ३०८ | ७९.३१ | ३७ | १८०५ | ८९३६४८ |
| आंध्र प्रदेश | ७.०० | ३०८ | ६७.६६ | ४७ | ४८१४ | १८४७४७९ |
| मध्यम थेट परकीय गुंतवणूक असलेली राज्ये | | | | | | |
| पश्चिम बंगाल | ७.५५ | १,०२९ | ७७.०८ | २६ | ८९९ | ९४४०७५ |
| राजस्थान | ५.६७ | २०१ | ६७.०६ | ४५ | २६५२ | ७८९४७९ |
| चंदीगढ | ०.०९ | ९,२५२ | ८६.४३ | ३ | २४ | ६४५१० |
| मध्यप्रदेश | ६.०० | २३६ | ७०.६३ | ३३ | २०६१ | ९२८९३९ |
| छत्तीसगड | २.११ | १८९ | ७१.०४ | १७ | ५३० | ३०४३८१ |
| केरळ | २.७६ | ८५९ | ९३.९१ | १७ | ९६२ | ४०४१२१ |
| लक्षद्वीप | ०.०१ | २,०१३ | ९२.२८ | ० | ३ | ४१० |
| कमी थेट परकीय गुंतवणूक असलेली राज्ये | | | | | | |
| गोवा | ०.१२ | ३९४ | ८७.४ | २ | ४९ | २७८७७० |
| ओडिशा | ३.४७ | २६९ | ७३.४५ | १९ | १०८९ | ५१०४१८ |
| उत्तर प्रदेश | १६.४९ | ८२८ | ६९.७२ | ५८ | ४८४९ | २५६४८८६ |
| अरूणाचल प्रदेश | ०.११ | १७ | ६६.९५ | ३ | २६ | १६०६८ |
| मणिपूर | ०.२२ | १२२ | ७९.८५ | ३ | ७९ | ३३७५५ |
| मेघालय | ०.२४ | १३२ | ७५.४८ | १० | ६१ | ४१६३३ |
| नागालँड | ०.१६ | ११९ | ८०.११ | ४ | ५७ | २००२६ |
| त्रिपुरा | ०.३० | ३५० | ८७.७५ | ३ | ३९ | ३२८०० |
| उत्तरांचल | ०.८४ | १८९ | ७९.६३ | २० | ३९५ | २९४४८५ |
| आसाम | २.५८ | ३९७ | ७३.१८ | ९ | ४८५ | २६८४५१ |
| बिहार | ८.५८ | १,१०२ | ६३.८२ | २० | ६४९ | ६९०७७६ |
| झारखंड | २.७२ | ४१४ | ६७.६३ | १२ | २३४ | २७४४५० |
| भारत | १०० | ३८२ | ७४.०४ | ६४२ | ३४९०८ | १५९५६४२८ |

स्त्रोत- संकलन आर्थिक सर्वेक्षण, लोकसंख्या अहवाल व मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा अहवाल

लोकसंख्येची घनता ही एक वर्ग किलोमीटर क्षेत्रात राहणाऱ्या लोकांची संख्या दाखवते व जेव्हा लोकसंख्येची घनता जास्त असते तेव्हा उद्योग व पायाभूत प्रकल्पांना जमिनी मिळण्याची शक्यता कमी असते  असे असले तरी दिल्लीत लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला ११२९७ असूनही तेथील उपनगरात इतर राज्यांपेक्षा जास्त उद्योग आहेत कारण तो भाग राष्ट्रीय राजधानीचा दर्जा असलेला आहे. नोईडा व गाझियाबाद या उत्तर प्रदेशातील ठिकाणांची उदाहरणे तशीच आहेत, हरियाणातील बहादूरगड, फरिदाबाद व गुडगाव येथे लोकसंख्येची घनता जास्त असूनही परकीय गुंतवणूक जास्त आहे. इतर राज्यातील परकीय गुंतवणुकीचा विचार करायचा तर  लोकसंख्येची घनता ही ३०८ ते ५५५ एवढी दर चौरस किलोमीटरला आहे. मध्यम परकीय गुंतवणूक असलेल्या राज्यात ही घनता १८९ ते ९२५२ आहे. जिथे लोकसंख्येची घनता १७ ते ११०२ दरम्यान आहे तिथे थेट परकीय गुंतवणूक कमी आहे. याचा असा अर्थ काढता येईल की, लोकसंख्येच्या घनतेचा थेट परकीय गुंतवणुकीशी फार नगण्य संबंध असतो

आता साक्षरतेचा विचार केला तर त्यात ज्ञान महत्वाचा घटक आहे. जिथे जास्त परकीय गुंतवणूक आहे तिथे (आंध्र -६७.६६ टक्के साक्षरता वगळून) सर्व राज्यात साक्षरता ७४.०४ टक्के आहे. जिथे मध्यम परकीय गुंतवणूक आहे त्या राज्यात मध्यप्रदेश, राजस्थान व चंदीगढ वगळता सर्व राज्ये राष्ट्रीय साक्षरता सरासरीच्या वर  आहेत. कमी परकीय गुंतवणूक असलेल्या राज्यात ओडिशा, उत्तर प्रदेश, अरूणाचल प्रदेश, आसाम, बिहार, झारखंड यांची साक्षरता राष्ट्रीय सरासरी पेक्षा कमी आहे.

जास्त परकीय गुंतवणूक असलेल्या राज्यात २५९ विद्यापीठे ( ४०.३ टक्के), महाविद्यालये १७०७९ (४८.९ टक्के), व उच्च शिक्षणातील विद्यार्थी संख्या नोंदणी ७४९३९९५ (४६.९ टक्के) आहे. मध्यम परकीय गुंतवणूक असलेल्या राज्यात १४१ विद्यापीठे ( २१.१९ टक्के). ७१३१ महाविद्यालये ( २०.४ टक्के) , ३४३५९१५ उच्चशिक्षित विद्यार्थी नोंदणी कृत (२१.५ टक्के) आहेत. कमी परकीय गुंतवणूक असलेल्या राज्यात १६३ विद्यापीठे (२५.३ टक्के), ८०१२ महाविद्यालये (२५.३ टक्के) , उच्च शिक्षित विद्यार्थी नोंदणी ५०२६५१८ म्हणजे (३१.५टक्के) आहे. याचा अर्थ कौशल्याधारित मनुष्यबळ असलेल्या राज्यात थेट परकीय गुंतवणुकीचा ओघ सकारात्मक दिसतो.

## आर्थिक वाढ व पायाभूत सुविधा व थेट परकीय गुंतवणूक

ज्या राज्यात निव्वळ उत्पन्न व दरडोई उत्पन्न जास्त आहे त्या राज्यांमध्ये थेट परकीय गुंतवणूक जास्त येते. जिथे रेल्वे, लांब रस्ते आहेत तिथे ती मध्यम गुंतवणुकीच्या राज्यांपेक्षा जास्त आहे. (तक्ता ३)

**तक्ता क्रमांक ३**

| जास्त थेट परकीय उत्पन्न असलेली राज्ये | राज्याचे निव्वळ अंतर्गत उत्पन्न कोटीत | राज्याचे निव्वळ दरडोई उत्पन्न २०१३-१४ ( रूपयात) | रेल्वे मार्ग २०११-१२ (कि. मी) | रस्त्यांची लांबी ( २०११-१२) कि.मी | विमानतळे आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय (संख्या) २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| जास्त थेट परकीय उत्पन्न असलेली राज्ये | | | | | |
| महाराष्ट्र | १२३९१०४ | १०७६७० | ५,६०२ | ४,२५७ | ३+९ |
| दिल्ली | ३३२५२१ | १९२५८७ | १८३ | ८० | १+० |
| तामिळनाडू | ६७११९२ | ९८५५० | ४,०६२ | ४,९४३ | ३+३ |
| पाँडिचेरी | १५८८७ | १२२६५४ | ११ | ५३ | NA |

| जास्त थेट परकीय उत्पन्न असलेली राज्ये | राज्याचे निव्वळ अंतर्गत उत्पन्न कोटीत | राज्याचे निव्वळ दरडोई उत्पन्न २०१३-१४ ( रूपयात) | रेल्वे मार्ग २०११-१२ (कि. मी) | रस्त्यांची लांबी ( २०११-१२) कि.मी | विमानतळे आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय (संख्या) २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|
| कर्नाटक | ४६६८१० | ७७३०९ | ३,०७३ | ४,३९६ | २+४ |
| गुजरात | ५८४३६७ | ९६९७६ | ५,२७१ | ४,०३२ | १+७ |
| आंध्र प्रदेश | ६७८५२४ | ७८९५८ | ५,२६४ | ४,५३७ | १+२ |
| मध्यम थेट परकीय गुंतवणूक असलेली राज्ये | | | | | |
| पश्चिम बंगाल | ५६७५९४ | ६२५०९ | ३,९३७ | २६८१ | १+२ |
| राजस्थान | ४१०८३४ | ५९०९७ | ५,७८४ | ७,१३० | १+० |
| चंदीगढ | २३२६१३ | ५०६९१ | १६ | २४ | १+० |
| मध्यप्रदेश | ३३३०१० | ४४९८९ | ४,९५५ | ५,०६४ | २+४ |
| छत्तीसगड | १३१७९६ | ५०६९१ | १,१८७ | २,२८९ | ०+२ |
| केरळ | ३०९३३२ | ८८५२७ | १,०५० | १,४५७ | ३+० |
| कमी थेट परकीय गुंतवणूक असलेली राज्ये | | | | | |
| गोवा | २९८८८ | १६१८२२ | ६९ | २६९ | १+० |
| ओडिशा | २१०६८३ | ४९२४१ | २,४६१ | ३,७०४ | ०+७ |
| उत्तर प्रदेश | ६८३६५१ | ३३१३७ | ८,७६३ | ७८१८ | १+० |
| अरूणाचल प्रदेश | ११२१८ | ७८१४५ | १ | २,०२७ | ०+२ |
| मणिपूर | १०४८९ | ३६४७४ | १ | १,३१७ | ०+१ |
| मेघालय | १५८८४ | ५९५१७ | NA | १,१७१ | १+० |
| नागालँड | १३६८२ | ६५९०८ | १३ | ४९४ | ०+१ |
| त्रिपुरा | २२४५३ | ६०९६३ | १५१ | ४०० | ०+३ |
| उत्तरांचल | ९११५७ | ९७५२८ | ३४५ | २०४२ | ०+२ |
| आसाम | १२६१४९ | ४०४७५ | २,४३४ | २,९४० | १+३ |
| बिहार | २८७१२९ | २८७७४ | ३,६१२ | ४,१०६ | १+२ |
| झारखंड | १४१६४४ | ४४०४५ | १,९८४ | २,१७० | ०+३ |
| भारत | **८३७२७४४** | **६७८३९** | **६४,४६०** | **७६८१८** | **२४+६४** |
| स्त्रोत- संकलन आर्थिक सर्वेक्षण, व भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे संकेतस्थळ | | | | | |

जिथे मध्यम स्वरूपाची थेट परकीय गुंतवणूक आहे त्या राज्यात पश्चिम बंगाल, केरळ, मध्यप्रदेश यांचा समावेश असून तेथे आर्थिक वाढ व पायाभूत सुविधांना गती मिळत आहे. किंबहुना त्यामुळेच तेथे गुंतवणूक वाढत आहे.

गोवा, अरूणाचल प्रदेश व उत्तरांचल ही राज्ये वगळता इतर राज्यात दरडोई उत्पन्न कमी आहे. ओडिशा. उत्तर प्रदेश, आसाम, बिहार, झारखंड या राज्यात रेल्वे मार्गांची संख्या जास्त आहे पण आकाराच्या तुलनेत त्या राज्यातील त्यांची संख्या मध्यम आहे

आर्थिक वाढ व पायाभूत सुविधा यांचा थेट परदेशी गुंतवणुकीशी संबंध आहे. त्यामुळे राज्यांची जशी वाढ होते तसेच त्यांच्यातील प्रादेशिक असमानता वाढते.

## आर्थिक स्वातंत्र्य व थेट परकीय गुंतवणूक

आर्थिक स्वातंत्र्याची क्रमवारी जशी देशांमध्ये असते तशीच ती देशातील राज्यांमध्येही असते. आर्थिक स्वातंत्र्य हे मालमत्ता निर्माण करण्यावरील सरकारी निर्बंधांवरही अवलंबून असते.

एकूणच आर्थिक स्वातंत्र्य (तक्ता क्रमांक ४) बघितले तर गुजरातमध्ये आर्थिक स्वातंत्र्य जास्त आहे. कामगार व उद्योगांचे नियंत्रण व व्यवस्थापन यातही गुजरात प्रथम क्रमांकावर आहे पण सरकारचा आकार बघितला तर गुजरात दुसऱ्या क्रमांकावर आहे. कायदेशीर व्यवस्था व सुरक्षेत चौथ्या क्रमांकावर आहे. इतर उच्च परकीय गुंतवणूक राज्ये ही आर्थिक स्वातंत्र्यात पहिल्या आकारात आहेत, त्यात तामिळनाडू दुसरा, आंध्र प्रदेश तिसरा, कर्नाटक नववा व महाराष्ट्र अकरावा आहे. सर्वात आश्चर्य म्हणजे आर्थिक स्वातंत्र्याच्या निकषावर अकराव्या क्रमांकावर असलेला महाराष्ट्र भारतातील एकूण परदेशी गुंतवणुकीतील ३० टक्के वाटा मिळवून बसला आहे

**तक्ता क्रमांक ४ आर्थिक स्वातंत्र्य निर्देशांक**

| राज्ये | एकूण आर्थिक स्वातंत्र्य क्रमवारी | | उद्योग व कामगार नियंत्रणे | | कायदा व्यवस्था व छाननी | | सरकारचा आकार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | वर्गवारी | क्षेत्र ५ | वर्गवारी | क्षेत्र २ | वर्गवारी | क्षेत्र १ | वर्गवारी |
| **जास्त थेट परकीय उत्पन्न असलेली राज्ये** | | | | | | | | |
| **महाराष्ट्र** | ०.४२ | ११ | ०.४३ | ६ | ०.१६ | १७ | ०.६८ | ३ |
| **तामिळनाडू** | ०.५४ | २ | ०.५१ | २ | ०.५५ | २ | ०.५७ | १० |
| **कर्नाटक** | ०.४३ | ९ | ०.४४ | ५ | ०.३५ | ११ | ०.४९ | १६ |
| **गुजरात** | ०.६५ | १ | ०.८७ | १ | ०.३९ | ९ | ०.६९ | २ |
| **आंध्र प्रदेश** | ०.५० | ३ | ०.४० | ८ | ०.५० | ४ | ०.५९ | ६ |
| **मध्यम थेट परकीय गुंतवणूक असलेली राज्ये** | | | | | | | | |
| **पश्चिम बंगाल** | ०.३५ | १७ | ०.२९ | १७ | ०.१४ | १८ | ०.६२ | ५ |
| **राजस्थान** | ०.४६ | ७ | ०.२९ | १६ | ०.५५ | ३ | ०.५४ | १२ |
| **चंदीगढ** | ०.४७ | ६ | ०.४० | ९ | ०.६२ | १ | ०.३८ | २० |
| **मध्यप्रदेश** | ०.४४ | ८ | ०.३९ | १० | ०.४७ | ५ | ०.४७ | १८ |
| **छत्तीसगड** | ०.४२ | १० | ०.४२ | ७ | ०.३१ | १३ | ०.५३ | १३ |
| **हिमाचल प्रदेश** | ०.४७ | ५ | ०.४६ | ३ | ०.३३ | १२ | ०.६२ | ४ |
| **पंजाब** | **०.४०** | **१३** | **०.१९** | **२०** | **०.४३** | **६** | **०.५८** | **९** |

| राज्ये | एकुण आर्थिक स्वातंत्र्य क्रमवारी | | उद्योग व कामगार नियंत्रणे | | कायदा व्यवस्था व छाननी | | सरकारचा आकार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | वर्गवारी | क्षेत्र ५ | वर्गवारी | क्षेत्र २ | वर्गवारी | क्षेत्र १ | वर्गवारी |
| **कमी थेट परकीय गुंतवणूक असलेली राज्ये** | | | | | | | | |
| **ओडिशा** | ०.३६ | १५ | ०.३३ | १२ | ०.२६ | १४ | ०.५० | १५ |
| **उत्तर प्रदेश** | ०.३६ | १६ | ०.३२ | १३ | ०.३७ | १० | ०.३८ | १९ |
| **आसाम** | ०.३२ | १९ | ०.२६ | १८ | ०.१३ | १९ | ०.५८ | ८ |
| **बिहार** | ०.३१ | २० | ०.३० | १५ | ०.१२ | २० | ०.५२ | १४ |
| **झारखंड** | ०.३३ | १८ | ०.२० | १९ | ०.२० | १६ | ०.५९ | ७ |
| **उत्तराखंड** | ०.३९ | १४ | ०.४६ | ४ | ०.२४ | १५ | ०.४८ | १७ |
| **स्त्रोत- भारतातील राज्यांचे आर्थिक स्वातंत्र्य निकष** | | | | | | | | |

मध्यम परदेशी गुंतवणूक असलेल्या राज्यात हिमाचल प्रदेश पाचवा, मध्यप्रदेश सहावा, चंदीगड आठवा तर केरळ दहावा, पंजाब तेरावा व पश्चिम बंगाल सतरावा आहे. तेथे थेट परकीय गुंतवणूक वाढत असली तरी तिथे आर्थिक स्वातंत्र्य निकषांची क्रमवारी समाधानकारक नाही त्यामुळे आर्थिक स्वातंत्र्य या निकषाचा थेट परकीय गुंतवणुकीवर मध्यम परिणाम असतो.

## वीज व थेट परकीय गुंतवणूक

थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पुरेशी व चांगल्या दर्जाची वीज आवश्यक असते. ज्या राज्यात थेट परकीय गुंतवणूक जास्त आहे तिथे विजेचा पुरवठा जास्त आहे.

महाराष्ट्रात सर्वात जास्त थेट परदेशी गुंतवणूक आहे व हेच राज्य विजेच्या क्षमतेत आघाडीवर असून तिथे २०१२-१३ मध्ये २३.७३ गिगॅवॅट वीज होती. त्यापाठोपाठ गुजरातेत २२.७९ गिगॅवॅट, तामिळनाडूत १५.६० गिगॅवॅट, आंध्रात १३.७९ गिगॅवॅट, कर्नाटकात १२.१३ गिगॅवॅट वीज उपलब्ध होती, ती सर्व राज्ये थेट परकीय गुंतवणुकीत आघाडीवर आहेत. मध्यम गुंतवणूक असलेल्या राज्यातील वीज उपलब्धता राजस्थान ९.८६ गिगॅवॅट, पश्चिम बंगाल ७.५७ गिगॅवॅट, मध्यप्रदेश ६.३२ गिगॅवॅट, छत्तीसगड ४.०३ गिगॅवॅट, केरळ २.४९ गिगॅवॅट होती, ती राज्ये त्यांची वीज क्षमता वाढवित आहेत. कमी थेट परदेशी गुंतवणूक असलेल्या राज्यातील उत्तर प्रदेश ( ९.३६ गिगॅवॅट) व ओडिशा (५.३३ गिगॅवॅट) वगळता इतर राज्यात १ गिगॅवॅट वीज क्षमता आहे. थेट परदेशी गुंतवणूक व राज्यांची वीज क्षमता यात सकारात्मक संबंध आहे.

## निष्कर्ष

सत्तर टक्के थेट परदेशी गुंतवणूक एकवटलेल्या सहा राज्यात प्रादेशिक असमानता वाढली आहे. या अभ्यासात असे दिसून येते की, लोकसंख्येच्या घनतेचा थेट परदेशी गुंतवणूकीशी नगण्य संबंध असतो. कौशल्याधारित कामगार, आर्थिक वाढ, चांगल्या पायाभूत सुविधा, वीज क्षमता यांचा थेट परकीय गुंतवणुकीवर सकारात्मक परिणाम होतो पण आर्थिक स्वातंत्र्याशी थेट परकीय गुंतवणुकीचा मध्यम संबंध असतो. राज्य सरकारांनी परदेशी गुंतवणूकदारांना सवलती देण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जर मध्यम गुंतवणूक असलेल्या व कमी गुंतवणूक असलेल्या राज्यांनी प्रशासन सुधारले त्यात पारदर्शकता आणली, भ्रष्टाचार नष्ट केला, शिवाय पायाभूत सुविधा दिल्या तसेच राज्ये अधिक गतीशील व संवेदनक्षम बनवले तर त्यांच्याकडेही थेट परकीय गुंतवणूक वाढू शकेल.

*(**डॉ. एस.आर. केशवा** - बंगलोर येथिल बंगलोर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक असुन आतापर्यंत त्यांच्या नावावर दहा पुस्तके आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधुन सादर केलेले ११६ शोध निबंध आहेत. त्यांनी ६३ विशेष लेख लिहीले असुन अनेक शैक्षणिक समित्यांच्या अधिकार पदी ते कार्यरत आहेत.*

**संपर्कासाठी इमेल:**
sr_keshva@yahoo.com)

# कालबाह्य कायदे - अनिवासी भारतीयांपुढील पेच

- अनिल मल्होत्रा



**विविध देशांमध्ये अर्थाजनासाठी, परिस्थितीनुरुप आणि उच्चशिक्षणासाठी स्थलांतरीत भारतीयांची लोकसंख्या ३०० दशलक्षाहुन जास्त आहे. काळानुरुप त्यांनी रहिवासी देशांचे निवासी नियम, कायदे आत्मसात केले. हे अनिवासी भारतीय बहुतांश व्यापारी आहेत. सरकारने प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला १००% प्रोत्साहन दिल्याने अनिवासी भारतीयांना पुन्हा भारतात परतण्यासाठी संधी प्राप्त झाली आहे.**

**पण खरचं ही त्यांच्यासाठी सुवर्णसंधी असेल का ? भारतीय कायद्यांमध्ये कालपरत्वे गतीमान पद्धतीने सुधारणा झाली का? या सर्वांचा उहापोह करण्याची गरज आज आहे अन्यथा ''कालबाह्य कायदे'' हे अनिवासी भारतीयां पुढे पेच ठरु शकतील.**

## परिचय

येत्या वर्षी, २०१४ साली महात्मा गांधींच्या भारतात परतण्याला १०० वर्षे पूर्ण होतील, आणि या स्मृत्यर्थ ही शतकपूर्ती साजरी करण्याच्या निमित्ताने अहमदाबाद मध्ये ९ जाने २०१५ रोजी सातासमुद्रापार गेलेल्या भारतीयांचे त्यांच्या मायभूमीवर स्वागत करून 'प्रवासी भारतीय दिन' साजरा करण्यात येईल। आपल्या पंतप्रधानांनी, हर्षभरित होऊन न्यू यॉर्कच्या यू. एस. मेडिसन स्टेडियमवर जमलेल्या प्रचंड जनसमुदायाला उद्देशून म्हटले होते की, भारताचे द्वार, जगभर विखुरलेल्या मुळ भारतीयांना PIO (Persons of Indian Origin) कार्डधारकांसाठी, व परदेशस्थ भारतीय नागरिकांना या योजनांचा मिलाफ करून कष्टसुलभ कायमस्वरूपी असा भारतीय व्हिसा दिल्याने मुक्त असेल. याचा परिणाम म्हणून गृहमंत्रालयाने PIO कार्ड आयुष्यभर वैध राहील व अशा कार्डधारकास परदेशी विभागीय नोंदणी कार्यालयाच्या नोंदणीकरणातून तथा पोलीस चौकशीतून वगळण्यात येईल, हे ३० सप्टेंबर रोजी जाहीर केले. जे झाले ते उत्तम मात्र जेव्हा अशा लोकांची झुंडच्या झुंड येईल तेव्हा काय होईल? या लोकांचे भारताच्या प्रवेशद्वारी उत्साहाने स्वागत करतानांच, ज्यांच्या कुटुंबाला भारतीय कायदे लागू पडत आहेत अशा अनिवासी भारतीय (NRIs) बांधवांना काय पुरवले याचे चिंतन करावयास हवे. चित्र जलद गतीने बदलत असताना हे पाहायचेच राहून जाते की, जर एखाद्या अनिवासी भारतीयाने भारतात परतून मूळस्थानी मुक्काम करण्याचा निर्णय घेतला तर भारतीय कायद्यानी या सामाजिक गरजांच्या अनुषंगाने त्यांची गती राखली आहे का, म्हणूनच त्यासाठी आपल्याला आपल्या कायद्याचे मूल्यांकन व त्यासाठी लागणाऱ्या गरजांचा एकत्रित अहवाल करावयास हवा. भारतीय परदेशस्थ भारतीय व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार जवळपास २,१९,०९,८७५ अनिवासी भारतीय भारताबाहेर स्थिरावले असून अंदाजे २०० राष्ट्रामध्ये त्यांची पाळेमुळे रूजली आहेत. खरा आकडा साधारण ३०० लक्ष असावा. निर्विवादपणे, आंतरराष्ट्रीय भारतीयांना त्यांचे राष्ट्रीयत्व आहे किंवा म्हणूनच, या वादांना शासित करणाऱ्या वैश्विक कायद्याच्या निर्मितीची तीव्र गरज भेडसावत आहे. स्थलांतरण, राष्ट्रीयत्व, विवाह, घटस्फोट, दबावग्रस्त लग्ने, वाद, जोडीदाराचा निर्वाह, वैवाहिक संपत्तीची भागीदारी, आंतरदेशीय दत्तक स्वीकृती, परंपरागत वारसाहक्क, भारतीय संपत्तीची विभागणी आणि

सरोगसी प्रबंध यांसारख्या बाबींतून 'या' भारतीयांच्या देशी आणि परदेशी पसरलेल्या परिवारातील संदर्भ आणि दुवे उठून दिसत असतात. परदेशीय कोर्टात काम करणोया कायदेतज्ज्ञांचे असुधारित आणि अद्यावत कायदे, यांमुळे होणोया अडचणींना सोडवण्याचे प्रयत्न होत आहे आणि या सारख्या विषयांधारित कायद्याची स्पष्टीकरणे कारणमीमांसा ते देत आहेत. परकीय कायद्यांचा उपयोग, त्यांचे निर्णय आणि भारतीय न्यायालयांनी दिलेले निवाडे, यांना कायद्यांच्या स्पष्टीकरणाद्वारे व तज्ज्ञांच्या मताद्वारे विशद करण्याची गरज आहे. परदेशी राष्ट्रीयत्व स्वीकारलेले व नागरिकत्व स्वीकारलेल्या भारतीय अनिवासी नागरिकांसहित सर्व वैश्विक भारतीयांना ५० वर्षे जुने वैयक्तिक कायदे शासित करत आहेत. असे कायदे जे काळाच्या चाचणीत ज्यांची उत्तरे मिळत नाही आहेत. जे सुधारित नाहीत, त्यांची उपयुक्ततादेखील हरवली आहे. शिवाय चालू काळातील कौटुंबिक प्रश्नांची आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून उत्तरेही मिळत नाहीत. न्यायक्षेत्रांतील वाद नव्याने अडचणींना व प्रश्नांना जन्म देतात, ज्यांची उत्तरे न गवसल्याचा परिणाम घरे आणि कुटुंबांचे विभाजन इतकाच होतो. हे असे विभाजन सर्वांगाने होतच आहे.

## पार्श्वभूमी

Passport वा पारपत्र हे एक असे कागदपत्र आहे जे त्यांच्या स्वरूपाने आणि हेतूने मनुष्यास अगर व्यक्तीस ती व्यक्ती सदर देशाची नागरिक आहे, अशी ओळख पुरवतो आणि त्यास इतर देशांमध्ये मुक्त प्रवेश देण्याची विनंती करते. परवानाधारकांनी मागणी केल्यानंतर या सदर इसमास या देशाच्या अधिकृत राष्ट्रीय संस्थेकडून राष्ट्रीयत्व बहाल करून परवाना देण्यात येत असतो तसेचं प्रतिनिधींचीही अधिकृत ओळख देण्यात येत असते. म्हणूनच नागरिकांच्या नागरिकत्वाची ओळख पटल्यानंतर त्यास पारपत्र देण्यात येते. असे असले तरीही, हा परवाना अधिनियम, १९६७ आधारे लिहिलेल्या अटी व आवश्यक विधानान्वये विशद करता येतो तथा रद्द ही करता येतो. सतवंत सिंग स्वाहनी विरूद्ध एपीओ, नवी दिल्ली, AIR १९६७, सर्वोच्च न्यायालय, १८३६, मध्ये सातत्याने असे म्हटले की, परवानापत्र हिरावून घेणे म्हणजेच (कलम २१ नुसार) व्यक्तिचे व्यक्तिगत स्वातंत्र हिरावून घेणे होय हेच विधान मनेका गांधी विरूद्ध केंद्र सरकार अखिल भारतीय वार्ताहर १९७८, सर्वोच्च न्यायालय ५९७ मध्ये पुन्हा अधोरेखित केले गेले व परवाना हा मुलभूत हक्कांशी निगडीत असल्याने त्याचा अव्हेर मुलभूत हक्कांचा अव्हेर मानला जातो.

## वादविवाद

भारतामध्ये, असे वाद सुरू होण्यास कारण हेच की, अजूनही इथे ब्रिटिशांच्या काळातील कायद्यांचा वापर होत आहे. स्वत: ग्रेट ब्रिटनही त्यांच्या राज्यकाळात भारतीय रेल्वेजालाच्या निर्मिती व देखभालीसंदर्भात १८४९ ते १९४२ च्या काळात पारीत केलेले ३८ कायदे सुधारित करण्यात गुंतले आहे. असे असून सुद्धा आपण मात्र अजूनही सरकारी दप्तरांच्या (विभागांच्या) कपाटांमध्ये कोळाष्टकांनी सजलेल्या आणि अपवादानेच ऊन वारा खाणाऱ्या त्या पुरातन कायद्यांना दूर लोटण्यासाठी मुळीच प्रयत्न करताना दिसत नाही. इतकेच काय तर खुद्द संसदेने १९३७ साली पारीत केलेला पासपोर्ट ॲक्ट, १९५५ साली पारीत केलेला सिटिझनशिप ॲक्ट आणि २००५ सालचा भारतीय परदेशस्थ नागरिक कायदा असूनही आपण विविध कारणांसाठी पासपोर्ट ॲक्ट १९२०, विदेशी नोंदणी कायदा १९३९, १९४६ या कायद्यांवर आपण आजही अवलंबून आहोत. बहुतेक पुरातन कायदे हे वसाहत काळात निर्मिलेले असल्याने बरेचसे अनावश्यक आहेत. नैसर्गिक न्यायांची तत्त्वे पाळत नाहीत. जाचक व कठोर कायद्याचा भडिमार करतात. खरोखरच ज्यांचा विधी पुस्तिकेमधून त्याग करावयास हवा त्यां कायद्यांना मात्र आजही आपण धन्यतेने वापरत आहोत.

## हितकारी कायदा (फायदेशीर कायदा)

पासपोर्ट कायदा १९६७ हा अत्यंत सर्वसमावेशक व संपूर्ण कायदा असून तो परवाना व इतर प्रवास विषयक कागदपत्राविषयी भाष्य करतो. इतकेच नव्हे तर परवाना पत्रातील बदल, निरसन, बंधने, रद्द मान्यता आदि विषयीच्या वैधानिक प्रक्रियासहित या कायद्याची शिक्षा व गुन्हा दोहोंविरोधात अपराध्यास आवाहन करण्याच्या हक्काबद्दलही सांगतो. तर (अजूनही?) अस्तित्वात असलेले पासपोर्ट ऍक्ट

१९२० व विदेशी कायदा १९४६ हे कायद्याची कोणतीही उचीत प्रक्रिया पार न पाडता एखाद्यास भारताबाहेर हद्दपार करण्याचा सर्वाधिकार देतात. जो भारतासाख्या लोकशाही राष्ट्राच्या विधीव्यवस्थेसाठी शाप असून येथे न्यायिक पुर्नविलोकनासाठी पुष्कळ वाव आहे. या १९२० व १९४६ द्वारे मिळणारे अटक, स्थानबद्धता, एकांतवास, भारताबाहेर हद्दपार करण्याविषयीचे अधिकार भारतीय राज्यघटनेने दिलेल्या जिवित तथा व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या मुलभूत हक्कांचे खंडण करतात. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व कायदे हे दिशाहिन भासतात व मुलभूत हक्क स्वातंत्र्य नाकारण्यामागची हीच कारणे होत.

**संहिताबद्ध नागरिकत्व कायदा**

१९५५ चा नागरिकत्व कायदा भारतीय नागरिकत्वाच्या संपादन व समाप्तीवर भाष्य करतो. शिवाय कलम ९ व्या द्वारे जर एखाद्या नागरिकाने स्वेच्छेने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्विकारल्यास त्याचे भारतीय नागरिकत्वही रद्द होते हे ही स्पष्ट करतो. याचे कलम ९ हे परकीय नागरिकत्वाच्या संपादनानिशी भारतीय नागरिकत्व रद्द होण्याबद्दल संपूर्ण माहिती पुरवते. या अधिकारांचा वापर करून केंद्र सरकारने नागरी नियम २००९ या कायद्याच्या हेतुपृष्टयर्थ निर्मिती केली आहे. याच्या ४० व्या नियमाअंतर्गत केंद्र सरकार कसे, केव्हा, कधी एखाद्या भारतीय परकीय देशाचे नागरिकत्व स्विकारू शकतो हे ठरवते. हे करताना आपणांस तिसऱ्या सुचीतील विधानांचे सहाय्य घ्यावेच लागते.

**नागरी नियम २००९ च्या तिसऱ्या सुचीतील ठळक अटी खालीलप्रमाणे:**

१) जेव्हा जेव्हा भारताच्या कुणाही नागरिकाने कुण्या दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने स्विकारले असल्याची बाब केंद्र सरकारपर्यंत येते तेव्हा तेव्हा निश्चित केलेल्या काळात त्यांने या देशाचे नागरिकत्व स्वेच्छेने स्विकारलेले नाही हे सिद्ध करावे लागते. तसेच या सदर देशाचे नागरिकत्व स्विकारले नसल्याचे सिद्ध करण्याची पूर्ण जबाबदारी त्या व्यक्तिवरच असते.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________________ date ____________

Name (in block letters) : ____________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.
P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**DD किंवा MO Business Manager, Publications Division या नावे काढावा.**

२) भारतीय नागरिकाने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्विकारले या विषयी वा या मागील कारणांसाठी थेट प्रश्नांसंदर्भात अगर इतर संबंधीत बाबींसाठी केंद्र सरकार थेट त्या त्या देशाच्या दुतावास वा थेट सरकारकडे विचारणा करते व त्यांनी पुरविलेल्या माहिती वा अहवालावर कार्य करते.

३) त्या नागरिकाने त्या (दुसऱ्या) देशाकडे कधी परिपत्र संपादन केले आहे का हे तपासून पाहिले असल्यास त्या तारखेच्या पूर्वी संबंधित इसमाने स्वेच्छेने नागरिकत्व मिळविल्याचा पुरावा मिळतो.

**सर्वोच्च न्यायालयाने ठरविलेले कायदे**

कलम ९(२) सोबत नागरिकत्व नियम १९५६ च्या नियम ३० नुसार केंद्र सरकार परराष्ट्राचे नागरिकत्व स्वेच्छेने स्विकारलेल्या भारतीयाकडे भारताचे नागरिकत्व आहे का हे ठरविण्याचा पूर्णाधिकार आहे. पुढे कलम ९(२) व नियम क्र.३० हे असेही सांगतात की, परराष्ट्राचे नागरिकत्व हे हद्दपार करण्यासाठी वा व्यक्तीस भारताबाहेर काढण्यासाठी पुरेसा नाही. त्याचा संपूर्ण अधिकार केंद्र सरकारपाशी आहे. त्यासाठी सरकारने केलेली चौकशी देखील अर्धन्यायिक मानली जाते. खाली दिलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडयांमध्ये या कायद्याचे पूर्ण विश्लेषण सापडते.

१) आंध्रप्रदेश राज्य विरूद्ध अब्दूल कादर AIR १९६१ आणि १९६७

२) आंध्रप्रदेश सरकार वि.सय्यद मोहम्मद AIR १९६२ SC १७७८

३) उत्तरप्रदेश राज्य वि. रेहमतुल्ला AIR १९७१ SC १३८२

तर अशी ही राष्ट्रीयत्व निश्चितीची न्यायालयीन प्रक्रिया आहे.

**नवीन श्रेणी**

एकूण १०२ अब्ज भारतीयांपैकी ३० दशलक्ष अनिवासी भारतीय जगभरातील एकूण १८० देशामध्ये वास्तव्य करीत असून भारतीय संविधानाच्या ९ व्या कलमाद्वारे तथा नागरिकत्व कायद्याच्या ९ व्या कलमान्वये बंदी असलेले दुहेरी राष्ट्रीयत्व भूषवत आहेत. पी.आय.ओ. (PIO) आणि ओ.सी.आय. (OCI) या


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level-VII, R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 011-2610 0207, 011-2610 5590; Fax : 011-2617 5516**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

वर्गांना वगळून भारतीय वंश या निकषान्वये त्यांना मर्यादित फायदे देऊ केले गेले आहेत. ज्यायोगे, (दोन्ही वर्गवारी सध्या काही मर्यादित हक्क भारतात बजावू शकतात शिवाय व्हिसा, नोंदणी, संमती आणि इतर परवानग्यांखेरीज भारतातील वास्तव्य उपभोगू शकतात. भारतीय संविधान कलम ५ च्या आधारे, भारतात कायमस्वरूपी वास्तव्यास असलेला आणि ज्याचे पालक भारतात जन्मले आहेत असा प्रत्येक मनुष्य किंवा संविधाना अगोदर ५ वर्षांपासून भारतात वास्तव्यास असलेला प्रत्येक व्यक्ती भारताचा नागरिक गणला जातो. म्हणूनच, भारतीय कायद्याच्या निकष व निश्चितीद्वारेच भारतीय नागरिक असणाऱ्या प्रत्येकास मूळ हक्क प्राप्त होतो.

## राष्ट्रीयत्वाची निश्चिती

१९४६ च्या कायद्यान्वये एकाहून अधिक राष्ट्रांचे राष्ट्रीयत्व असलेल्या व्यक्तीच्या राष्ट्रीयत्व निश्चिती संबंधात वाद उपस्थित झाल्यास ती व्यक्ती ज्या राष्ट्राशी अधिक संबंधांनी जोडली गेली आहे, ते तिचे नागरिकत्व समजावे. १९२० व १९४६ चे कायदे परकीय व्यक्तीच्या राष्ट्रीयत्व निश्चिती संदर्भात कुठलाही मंच अगर प्रक्रिया न पाळता, वा या प्रक्रियेचे कोणतेही वैधानिक हक्क न प्रदान करता त्यास हद्दपार करण्यास सुचवितात. हे प्रश्न विचारण्यासाठी न्यायाधिकरण अस्तित्वातच नाहीत मात्र प्रश्न आजही कायम आहे. आता नागरिकत्व कायदा १९५५ आणि नागरी नियम २००९ हे सांगतात की, कुणाच्या नागरिकत्वासंदर्भात प्रश्न असल्यास वा कोणी व्यक्ती ते कधी व कसे संपादन करू शकेल असा सवाल असल्यास ते निश्चित करण्याचा प्रथमाधिकार केंद्र शासनास आहे. यावर सर्वोच्च न्यायालय असे भाष्य करते की, जोवर केंद्र सरकार अर्धन्यायीक चौकशी करून अशा व्यक्तीस भारतात राहण्याचा अधिकार नाही असा विवेकी निर्णय घेत नाही तो पर्यंत या तरतूदी कोणाही व्यक्तीला भारतातून काढून टाकण्याचा किंवा हद्दपार करण्याचा आदेश देऊ शकत नाहीत. परदेशी पारपत्र सुसूत्रीकरण (Foreign Passport Simpliciter) कोणाही व्यक्तीवर परदेशी असा शिक्का बसू देणार नाही तथा त्याचे राष्ट्रीयत्व निश्चित करणे हा त्याचा मूलभूत हक्क आहे. राष्ट्रीयत्व निश्चिती बरोबरच स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि नैसर्गिक न्याय यांची आपल्या संसदेने गुंफण करण्याची वेळ आता आली आहे.

## विवाद्य प्रश्न

आजच्या सामाजिक परिस्थितीत, आंतरराष्ट्रीय भारतीयांना त्यांच्या मायभूमीच्या संपर्कात रहायचे असेल तर त्यांनी १९२० आणि १९४६ च्या कायद्याने मुलभूत हक्कांबाबत पारीतकेलेले नियम अंगीकारणे आवश्यक आहे. नागरिकत्वाचा कायदा १९५५ हा सुसंवाद करण्यास सक्षम आहे. आता परदेशी पासपोर्ट (परवाना) ताब्यात असल्याने व्यक्तीस भारताबाहेर काढून टाकणे वा हद्दपार करणे या गोष्टी होऊ शकत नाही. मग सांगा बरे आपल्याला काय गरज आहे १९२०, १९४६ च्या कायद्यान्वये १९४६ च्या परिस्थितीनुसार भारतात येणाऱ्या परदेशीयांच्या प्रवेशाचे नियमन करण्याची? या प्रश्नाकडे संसदेचे लक्ष वेधण्याची गरज आहे.

## काळाची गरज

आजच्या युगात, भारतीय वंशाच्या बऱ्याच लोकांमध्ये जगभरातील विविध वंशाचे व विविध राष्ट्रीय लोकांची सरमिसळ असल्यामुळे त्यांच्या परदेशी कायमस्वरूपी वास्तव्यातून वैवाहिक वाद उत्पन्न होत आहेत. त्यासाठी असे प्रश्न सहज सोडवू शकतील, पक्षांची मते ऐकून घेऊन त्यांना दुरूस्तीची संधी देतील असे मंच व अधिकारी कायदा व्यवस्थेत तयार व्हावेत हा योग्य मार्ग व आजचा आशेचा किरण दाखवितो. ज्यामुळे परदेशात हाकलून देणे वा हद्दपार करणे या गोष्टी परमुलुखी अत्यंत लज्जास्पद व निंद्य असतील. अशा सर्व प्रश्नांनी युक्त असे सार्वभौम, समाजशील, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक अशा भारताचे आपण नागरिक आहोत. भारत वंशीयांना कायदे दुरूस्तीची तरतूद देऊन राष्ट्रीय नागरिकत्वाचे प्रश्न निकाली लावण्यास सक्षम व पात्र आहोत. स्वातंत्रोत्तर काळात आलेले कायदे आपल्या जागरूक न्याय व्यवस्थेनुसार संविधानाने बहाल केलेल्या मूलभूत स्वातंत्र्याचे जतन करणे विषयक विविध उपाय सुचवितात. म्हणूनच, वादातीत असे स्वातंत्र्यपूर्व काळातील

कायदे आज विधीपुस्तिकांमधील समुळ नाहीसे होण्याची गरज आहे.

केवळ विधी पुस्तिकांमधूनच हे कालबाह्य कायदे काढून टाकण्याबरोबरच कायदेतज्ञांना गंभीरपणे आंतरराष्ट्रीय भारतीयांसाठी नवे कायदे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. दाखल्याखातर आपण पालकांच्या वादात फरफटणाऱ्या मुलांचे उदाहरण घेऊ. हा वाद दोघांनंतर मुलांपर्यंत पोहोचतो आणि ही अपत्ये या जोडप्याच्या भांडणाऱ्या भोवऱ्यात अडकतात आणि वाद निकाली लागल्यावर एखाद्या पक्षाला विजय चिन्ह म्हणून सूपुर्द केली जातात. त्याप्रमाणे, सध्या देशात व्यावसायिक सरोगसीने जोम धरलाय, जेथे अत्यंत गांभिर्याने परिणामकारक विधी यंत्रणेद्वारे कायदा राबविण्याची गरज आहे. एजंट्सच्या काळया व्यापारांनी त्रस्त झालेल्या भारतीयांच्या मौल्यवान प्राणांच्या रक्षणासाठी 'मानवी तस्करीचा व्यापार आणि स्थलांतर' यावर केंद्रीय कायदा येण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय कुटुंब कायद्याच्या नियमावलीच्या गतीनुरूप कुटुंब देखभालीचा हक्क आणि वैवाहिक कायद्यांची गती असण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय स्तरांवर दत्तक कायद्याचे एखाद्या नव्या कोऱ्या कायद्याद्वारे नियमन होण्याची गरज आहे. आज सर्व शक्ती ही व्यावसायिक कायद्यांवर केंद्रीत आहे आणि भारतातील आपला परिवार व समाज ज्या कायद्यांद्वारे जोखला जातो त्या कायद्यांस मात्र सापत्न भाव मिळत आहे. परिणाम इतकाच की, ५० वर्षे परिस्थिती जशी होती तशीच आहे. जर आपण परदेशी भारतीयांजवळ जाऊ पाहतो तर सर्वप्रथम आपण त्यांस स्थिरनिवास, आनंदी कुटुंबमान आणि स्वस्थ समाज पुरवला पाहिजे. भारतीय कायदे आता एकाकी राहूच शकत नाही आता त्यांचा जागतिक स्तरावर समेट झालाच पाहिजे.

## नागरिकत्व आणि परकीय कायद्यांवर एक नजर

- **द रजिस्टेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट १९३९** हा कायदा भारतात येणाऱ्या परदेशीयांची नोंदणी करण्यासाठी आहे.
- **द रजिस्टेशन ऑफ फॉरेनर्स रूल्स १९९२** हे नियम १९३९ च्या कायदयांवर आधारित आहेत.
- **द फॉरेनर्स ऍक्ट १९४६** हा कायदा परदेशीयांविषयी केंद्र सरकारला काही अधिकार बहाल करतो.
- **द फॉरेनर्स ऑर्डर १९४८ या द्वारे,** १९४६ च्या कायदयाच्या कलम ३ नुसार भारतातून हद्दपार करण्याचा अधिकार मिळतो.
- **द फॉरेनर्स (ट्रिब्युनल्स) ऑर्डर्स्, १९६४** यानुसार परदेशी व्यक्तींकरता न्यायाधिकरण स्थापता येतो.
- **द पासपोर्ट (एन्ट्री इन टू इंडिया) कायदा, १९२०** अर्थात याद्वारे व्यक्तीस भारतात प्रवेश करतांना पासपोर्ट बाळगावा लागतो.
- **द पासपोर्ट (एन्ट्री इन टू इंडिया) रूल्स १९५०** हे नियम १९२० च्या कायदयांतर्गत तयार केले आहेत.
- **द पासपोर्ट ॲक्ट, १९६७** हा कायदा पासपोर्ट व इतर प्रवासविषयक कागदपत्रे जी भारताबाहेर गमन करण्यासाठी आवश्यक आहेत त्यांच्याविषयी भाष्य करतो.
- **सिटीझनशिप ॲक्ट १९५५** यानुसार भारतीय नागरिकत्वाचे संपादन आणि निश्चिती यांचे कथन होते.
- **द सिटीझनशिप रूल्स २००९ ॲक्ट १९५५** हे नियम नागरिकत्व कायद्यावर आधारित आहेत.

*(**अनिल मल्होत्रा** :- हे सप्टेंबर १९८३ पासुन वकिली क्षेत्रात कार्यरत. भारतात चंदीगढ येथून पंजाब विद्यापीठातुन विज्ञान आणि कायदेविषयक पदवी प्राप्त केल्यानंतर १९८५ मध्ये लंडन येथुन एल.एल.एम. केले. २८ वर्षांच्या या क्षेत्रातील त्यांच्या वाटयात त्यांनी लिहीलेल्या अनेक कायदेविषयक पुस्तकांचा समावेश आहे.*

**संपर्कासाठी इमेल:**
anilmalhotra1960@gmail.com,
malhotraanjitindia@rediffmail.com)

# भारतीय बांधकाम उद्योग - विदेशी गुंतवणुकदारांसाठी आकर्षण केंद्र

**- भावना गोखले**



**थेट प्रत्यक्ष गुंतवणुकी संदर्भातील दैनंदिन प्रकाशित होणाऱ्या बातम्यांमुळे एफडीआय चे महत्व वाढत असुन विरोधाची धार बऱ्याच अंशी कमी झाली आहे भारताचे एकुण जमिनीचे क्षेत्रफळ इतर देशांच्या तुलनेत जरी कमी असले तरी मुबलक नैसर्गीक संसाधन स्त्रोत आणि मनुष्यबळ या जमेच्या बाजु विदेशी उद्योजकांचे महत्वाचे आकर्षण आहे. विविध क्षेत्रातील थेट प्रत्यक्ष गुंतवणुकीचा वाढता सहभाग आंतरराष्ट्रीय सहसंबंध वृद्धींगत होण्यावर जोर देतो. बांधकाम क्षेत्रातही बऱ्यांच अंशी कायद्यातील सुधारणा आणि केंद्रसरकारने विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकिला प्रोत्साहनात्मक केलेल्या घोषणा यांचा अभ्यास केल्यास तसेच देशविदेशातील बांधकाम मुल्य, जीडीपी, गुंतवणुकीतील टक्केवारी लक्षात घेतल्यास, भारताला भौगोलिक क्षेत्रानुसार बरीचं बाजी मारता येण्यासारखी आहे. यासाठी संबंधित घटकांच्या समस्यांचे निराकरण केल्यास जसे विस्थापितांच्या समस्या त्यांना देण्यात येणारा कमाल मोबदला, जागेची किंमत इत्यादी तर बांधकाम क्षेत्रात विदेशी तंत्रज्ञान कौशल्याधारित बांधकाम प्रणालीला विकसीत करता येईल.**

'भारत' ही आज जागतील सर्वात जलद गतीने विकसीत होणारी अर्थव्यवस्था असुन यामुळे देशतील मोठी शहरे ही 'वित्तीय केंद्रे' म्हणुन विकसीत होत आहेत. ज्या भागात आर्थिक क्षेत्रे महत्वाची भूमिका बजावतात तिथे नागरीकरण झपाटयाने होत असते. शहरांमध्ये आर्थिक केंद्रीकरण होण्यामागे हे महत्वाचे कारण आहे. आर्थिक केंद्रीकरण प्रक्रियेत कौशल्याधारित मानवी बळची आवश्यकता असते. नागरीकरण किंवा शहरीकरण हे या मागची कारणे आहेत. नागरिकांच्या अन्न, वस्त्र, निवाराच्या मुलभूत गरजांमधिल 'निवारा' आता फक्त मुलभूत न राहता तो 'प्रेस्टीज पांईट' बनला आहे. कमी किंमतीत अनेक सुविधांयुक्त नैसर्गिक वातावरणीय स्त्रोतांचा मुबलक पुरवठा कसा देता येईल ही बांधकाम क्षेत्राची जबाबदारी आहे.

अशा जलद गतीने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेत आणि सध्याच्या आर्थिक स्थितीत देशी तसेच परदेशी गुंतवणुकदारासाठी बांधकाम उद्योग हे विशेष आकर्षणाचे केंद्र बनले आहे. बांधकाम उद्योगाच्या प्रगतीचा चढता आलेख देशाच्या आर्थिक विकासात मोठे योगदान देत आहे. तसेच उदारीकरणाच्या अर्थ धोरणात थेट परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याचे श्रेय काही प्रमाणात बांधकाम क्षेत्रांना द्यावे लागेल.

या क्षेत्रातील कायद्यांमध्ये एकसुत्रता आणि सुधार आवश्यक आहे. कारण विशेष आर्थिक क्षेत्राचा विकास, बांधकाम क्षेत्रांना पुरक ठरु शकतो. सरकारने टाऊनशीन साठी स्वंयचलीत मार्ग पत्करल्याने हे सोपे झाले आहे. मागील वर्षभरात रिझर्व बँक ऑफ इंडियाने जरी प्रामुख्याने व्याज दारत खुपच वाढ केली असली तरी त्यात निरंतरता आणणे या क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असुन यासाठी सरकारी धोरणांना मुख्य धारेत आणणे आवश्यक आहे.

विमा, किरकोळ व्यापार आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांप्रमाणेचं बांधकाम क्षेत्रातही १०० टक्के परदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यासाठी भारत सरकारने २००५ साली कायद्यात दुरुस्ती केली या उदारीकरणाच्या कृतीमुळे देशातील निवासी आणि व्यावसायिक बांधकाम क्षेत्रातील मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी परदेशी गुंतवणुकाचा मार्ग मोकळा झाला. यामुळे भारतातील बांधकाम उद्योग क्षेत्रात अनेक वित्तीय संस्था तसेचं खाजगी निधींचे समभाग अशी गुंतवणूक होण्यास प्रोत्साहन मिळाले तरीही आधिच्या जाचक कायद्यांचा पगडा येथील अधिकारी व जनसामान्यांवर असल्याने आणि कायदेशीर धोरणांबाबत सुसष्टता नसल्याने विदेशी कंपन्या भारतात येण्यासाठी व भारतीय कंपन्या कायद्याच्या जाचकतेमुळे विदेशात जाण्यास अनुत्साही होत्या. हा कायदा होईपर्यंत भारतात गृहनिर्माण आणि इतर बांधकाम क्षेत्रात केवळ अनिवासी भारतीय आणि भारतीय वंशाचे नागरिकचं गुंतवणूक करु शकत होते याव्यतिरीक्त इतर परदेशी गुंतवणुकदारांना केवळ एकात्मिक वसाहतीच्या बांधकामात तसेचं स्वत:च्या

मालकीची उपकंपनी किंवा भारतातील कंपनी सोबत भागीदारीत करार करुन स्थापन केलेल्या कंपनी मार्फतच गुंतवणुक करण्याची परवानगी होती.


वर्ष २०१३-१४ चे अंदाजपत्रक सादर करतांना वित्तमंत्रांनी असे एफडीआय ज्यांना निधी पुरविण्यात येतो त्या रिअल इस्टेट प्रकल्पांना २०,००० स्क्वेअर मीटरवरुन ५०,००० स्क्वेअर मीटर पर्यंत क्षेत्रफळ वाढविण्यात येणार असल्याचे सांगितले. याव्यतिरीक्त पुर्ण देय पुरक विदेशी भागीदारांसाठीची कमाल देय भागभांडवलाची आवश्यकता १० लक्ष अमेरिकन डॉलरवरुन ५ लक्ष अमे. डॉलरपर्यंत खाली आणण्यात आली. हा निर्णय मदत निधी उभारण्यासाठी 'सेवा मागणी' म्हणुन करता येईल.

वर्तमान सरकारची, ''रिअल इस्टेट सेक्टरमध्ये १०० टक्के एफडीआय ची घोषणा'' या क्षेत्राला मिळालेले संपूर्ण यश आहे. यामुळे विदेशी भांडवलाचा स्त्रोत पुर्णपणे भारतात येणार असुन गृहखरेदीदारांना कदाचित घरे खरेदि करतांना जास्त त्रास सहन करावा लागेल. याचे कारण म्हणजे या क्षेत्रात येणारा मुबलक विदेशी निधी स्त्रोत जो घरांच्या किंमती वाढविण्यास मदत करतो (मागणी पुरवठा नियम) ही भिती बहुतांश कंत्रटदार, बिल्डर्स खरेदीदारांच्या मनात येणे स्वाभाविक आहे पण १९९८-१९९९ च्या सांख्यिकीचे निरीक्षण केल्यास सामुग्री मुल्य, कामगार, बांधणी, जमीन या सर्वांच्या मुल्याचा विचार केल्यास अमेरिकेच्या तुलनेत भारतात या सर्वांचे मुल्य अधिक आहे.(पहा आकृती -१)

परंतु जर १९९४ ते १९९८ दरम्यान एफडीआय मधिल राष्ट्र निहाय वाटयाचे निरीक्षण केल्यास असे दिसुन

**आकृती -१**


**बांधकाम क्षेत्रातील अमेरिका विरुद्ध भारताचे विच्छेदित मुल्य (१९९९)**




येते की, इतर देशांच्या तुलनेत भारताचा या क्षेत्रातील वाटा ४.२ टक्के म्हणजे खुप कमी आहे. तर इतर देश जसे चीन १५.५, ब्राझील १५.१, तैवान २५, कोरिया १०.६, थायलंड ९.२ टक्के यांचा वाटा अशा प्रकारे एफडीआय रिअल इस्टेट मध्ये आहे.

सध्या भारतात बांधकाम क्षेत्रात ली किम ताह होल्डिंग्स, सेस्मा इंटरनॅशनल प्रायव्हेट लि., ए वन लिमिटेड, केपॅटल लँड ही सिंगापूर येथिल, तास सलिम ग्रुप ही

**बांधकाम क्षेत्रातली तुलनात्मक वृद्धी (९४-९८) (आकृती-२)**





इंडोनेशिया, अमेरिकेची इडॉ लिमीटेड, दुबईची एमार ग्रुप, मलेशियातील काही कंपन्या काही मोठया विदेशी कंपन्यांनी या आधिचं भारतातील बांधकाम व्यवसाय कंपन्यांशी करार करुन गुंतवणूक केली आहे.

**भारतातील बांधकाम उद्योग प्रगतीपथावर** -

वर्ष २००३-०४ साठी भारतात एकुण २ अब्ज डॉलरची थेट गुंतवणुक बांधकाम क्षेत्राशी संबंधित होती. वर्ष २००४-०५ साठी ही गुंतवणुक ३ अब्ज डॉलर्स पर्यंत वाढली या गुंतवणुकीत बांधकाम उद्योगाचा वाटा १०.६ टक्के इतका होता. (पहा आकृती ३ पान क्र. ३५)


मात्र २००५-०६ साठी भारतात आलेल्या एकुण ५.४५ अब्ज थेट परदेशी गुंतवणुकी पैकी बांधकाम क्षेत्रात १६ टक्के गुंतवणुक झाली तर २००६-०७ मध्ये

आकृती - ३
भारतातील रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक




Source: ASSOCHAM report

आकृती - ४
भारतातील रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा वाटा (% मध्ये)



एकुण परदेशी गुंतवणुक ८ अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचली. बांधकाम क्षेत्राचा त्यातील वाटा २६ टक्के एवढा होता. (पहा आकृती ४ पान क्र. ३५)

फक्त बांधकाम क्षेत्रात वर्ष २००९ ते २०१३ या काळात १७०२७ कोटी रुपयांची गुंतवणुक ४९७९७ कोटी रुपयांवर पोहोचली म्हणजे या सात वर्षात या क्षेत्राने ७ टक्के वृद्धी दरापर्यंत मजल मारली.

बांधकाम क्षेत्रला बळकटी देण्यासाठी भारत सरकारने गुंतवणुकदारासाठी काही मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. यामध्ये बांधकामाची जागा, गुंतवणुकीचे पर्याय, प्रकल्प पुर्ण होण्याची कालमर्यादा अशा अटी आणि शर्ती घालण्यात आल्या आहेत.

१. किमान बांधकाम क्षेत्र - सेवा गृहनिर्माण प्रकल्प असल्यास किमान बांधकाम क्षेत्र १० हेक्टर (२५ एकर) एवढे आहे. विकास प्रकल्पांमध्ये बांधकाम करावयाचे असल्यास बांधकामाचे क्षेत्र किमान ५०,००० चौ मिटर असणे आवश्यक आहे. सेवा आणि विकास प्रकल्पाचा संयुक्त प्रकल्प असल्यास दोन पैकी एक अट लागु राहील.

२. गुंतवणुक - किमान भंडवल - उपकंपनीची संपूर्ण मालकी असल्यास १ कोटी डॉलर्स ही रक्कम उद्योग सुरु झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत बाजारात आणावी लागेल. एकदा भांडवल बाजारात आणल्यानंतर तीन वर्षांपर्यंत मुळ गुंतवणुकीची रक्कम बाजारातुन काढता येणार नाही. परदेशी गुंतवणूक प्रोत्साहन मंडळाच्या (FIPB) पुर्व परवानगीनेच गुंतवणुकदार प्रकल्प पुर्णत्वाचा आधि बाहेर काढु शकतील.

**कालमर्यादेचे नियम :** प्रकल्पासाठीच्या सर्व वैधानिक परवानग्या मिळाल्यानंतर पुढच्या पाच वर्षात किमान प्रकल्पाच्या ५०% बांधकाम पुर्ण व्हायला हवे, गुंतवणुकदार संपूर्ण विकसीत न झालेला भूखंड म्हणजेचं जिथे रस्ते, पाणी, वीज व्यवस्था आणि इतर सुविधा नाहीत असे भुखंड विकू शकणार नाही.

केंद्र सरकारने २००२ साली भारतात वसाहती निर्माण करण्याकरीता १०० टक्के थेट परदेशी गुंतवणूकीला परवानगी दिली होती. मात्र त्या साठी १०० एकर जागेवर ही वसाहत असावी अशी अट सरकारने घातल्यामुळे या क्षेत्रात मोठया शहरांमध्ये, राजधानी किंवा महानगरांमध्ये इतकी मोठी जमीन अधिग्रहित करणे अशक्य कोटीतली गोष्ट होती.

थेट परदेशी गुंतवणुकीच्या धोरणात सरकारने शिथिलता आणल्यामुळे बांधकामाची गुणवत्ता तसेच बांधकामाचा वेग यात सुधारणा होण्यास मदत झाली आहे. बांधकाम उद्योग क्षेत्रात थेट परदेशी गुंतवणूक आल्यामुळे हे क्षेत्र अधिक नियोजनबद्ध होण्यासही मदत होईल. या क्षेत्रात व्यावसायिकता तर वाढेलच त्या शिवाय स्पर्धात्मक वातावरण असल्यामुळे या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि व्यावसायिक सुधारणा होतील. एन ए आर ई डी सी ओ च्या मते थेट परदेशी गुंतवणुकीचे नियम शिथिल झाल्यामुळे येत्या वर्षभरात बांधकाम क्षेत्रात दुपटी पेक्षा जास्त गुंतवणूक होईल. सध्या या क्षेत्रात भंडवलाची मोठी कमतरता आहे त्यामुळे गेल्या दोन तीन वर्षात मंदीची परिस्थिती आहे. मात्र थेट परदेशी गुंतवणूक आल्याने या क्षेत्राला नवी उभारी मिळेल असा विश्वास विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे. केपीएमजी आणि राष्ट्रीय रिअल स्टेट विकास परिषद (एनएआरइडीसीओ) यांच्या अभ्यास पुर्व पहाणी सुधार, जागतिक स्तरावरील गुतंवणुकदारांसाठी भारताने अलीकडेच घेतलेले मंत्रीमंडळ निर्णय, केंद्रीय मंत्री मंडळाने गेल्या काही दिवसांपूर्वी थेट परदेशी गुंतवणुकीचे नियम अधिक शिथिल करत किमान बिल्ट अप क्षेत्रफळ, भांडवलाची आवश्यकता या सर्वांच्या अटी शिथिल केल्या.

**निष्कर्ष :**

थेट प्रत्यक्ष गुंतवणुकी संदर्भातील दैनंदिन प्रकाशित होणाऱ्या बातम्यांमुळे एफडीआय चे महत्व वाढत असुन विरोधाची धार बऱ्याच अंशी कमी झाली आहे भारताचे एकुण जमिनीचे क्षेत्रफळ इतर देशांच्या तुलनेत जरी कमी असले तरी मुबलक नैसर्गीक संसाधन स्त्रोत आणि मनुष्यबळ या जमेच्या बाजु विदेशी उद्योजकांचे महत्वाचे आकर्षण आहे. बांधकाम क्षेत्रातही बऱ्यांच अंशी कायद्यातील सुधारणा आणि केंद्रसरकारने विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकिला प्रोत्साहनात्मक केलेल्या घोषणा यांचा अभ्यास केल्यास तसेच देशविदेशातील बांधकाम मुल्य, जीडीपी, गुंतवणुकीतील टक्केवारी लक्षात घेतल्यास, भारताला भौगोलिक क्षेत्रानुसार बरीचं बाजी मारता येण्यासारखी आहे. यासाठी संबंधित घटकांच्या समस्यांचे निराकरण केल्यास जसे विस्थापितांच्या समस्या त्यांना देण्यात येणारा कमाल मोबदला, जागेची किंमत इत्यादी तर बांधकाम क्षेत्रात विदेशी तंत्रज्ञान कौशल्याधारित बांधकाम प्रणालीला विकसीत करता येईल.

**संदर्भः**


१. ॲसोचाम वेबसाईट

२.इंडिया प्रॉपटी.कॉम

३. फर्स्टबीझ.कॉम

४. गुंतवणक आणि तंत्रज्ञान संवर्धन विभाग, विदेशी व्यवहार मंत्रलय भारत सरकार

५. एन ए आर डी सी ओ


***निवासी संपादक***

# भारताचे राज्यांच्या वाढत्या सहभागासह जागतिक पातळीवरील आर्थिक संबंध

- त्रिदेव सिंग मैनी



**बाहेरील जगताशी अर्थव्यवस्थापकिय राज्यस्तरीय संबंध प्रस्थापित करतांना बरीचशी सकारात्मक पावले उचलली गेली आहेत. तरीसुद्धा अजुनही संस्थात्मक बदल, कायदेशीर बदल आणि सामाजिक पाठिंबा यांची गरज आर्थिक वृद्धि प्रक्रिया परिणामकारकतेने होण्यासाठी आवश्यक आहे.**

**परिचय :**

भारताच्या बाकीच्या जगाशी असलेल्या संबंधात राज्यांचे नेमके काय स्थान आहे याबाबत स्पष्टता नसुन, आर्थिक संबंधांमध्ये राज्यांच्या वाढत्या भूमिकेला असणारी स्विकृती, अडखळत का असेना, दिवसेंदिवस वाढत आहे. खासकरुन अशा राज्यांना गुंतवणूकीची केंद्रे आणि विक्री केंद्रे म्हणुन विकसीत करने परराष्ट्र धोरणात राज्यांची त्यांच्या आर्थिक घटकांसहित कितपत भूमिका असावी याबबत निश्चितच चर्चा चालू आहे.

भारताच्या संविधानात राज्य सरकारांचे बाकीच्या जगा बरोबरील आर्थिक संबंधांमधील भूमिके बाबत काही संदर्भ नाही, पण केंद्रीय सुचीनुसार (सातवा भाग, कलम २४६), परराष्ट्र धोरणा संदर्भातील इतर बाबींचा उल्लेख त्यात आढळतो:

१. परराष्ट्र संबंध: केंद्र सरकारला परराष्ट्र संबंधामध्ये आणणाऱ्या सर्व बाबी.
२. राजनैतीक, राजदुत आणि व्यापार प्रतिनिधीत्व.
३. संयुक्त राष्ट्र संघटना.
४. आंतरराष्ट्रीय परिषदा, संघटना आणि इतर संघटनामध्ये सहभाग आणि त्यात झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी.
५. परराष्टांसोबत करार करणे आणि करारांची अमलबजावणी करणे आणि परराष्टांशी संवाद साधणे. (http://www.constitution.org/cons/india/shed07.htm)

देशाची राजकीय आणि आर्थिक परिस्थिती आजच्या पेक्षा खूप वेगळी होती सध्या भारतीय राज्यांचे संबंध केवळ दिल्ली पुरते मर्यादित न राहता बाहेरच्या जगाशी वृद्धिंगत होत आहे.

**विदेशी आर्थिक संबंध आणी राज्यांचा विकासातील वाटा:**

'भारताच्या आर्थिक वाटचालीत राज्य जी महत्वाची भूमिका' बजावत आहेत ते पहाता 'बाहेरच्या जगांबरोबरच्या आर्थिक संबंधांमध्ये राज्य सरकारांची भूमिका' हा खूप महत्वाचा मुद्दा ठरणार आहे. हे येथे सांगणे प्रासंगिक होईल की, राज्यांमध्ये परकीय गुंतवणुक आणण्यासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यापलिकडे, सध्याच्या सरकारचा भर राज्यांना बाहेरच्या जगाबरोबरच्या आर्थिक व्यवहारांमध्ये, जास्त स्वातांत्र्य देण्यावर आहे.

इंदौर (मध्य प्रदेश) गुंतवणुकदार शिखर परिषदेला ऑक्टोबर २०१४ मध्ये संबोधीत करतांना पंतप्रधान मोदी यांनी १०० दशलक्ष डॉलर पेक्षा जास्त परकीय गुंतवणुक देशात येणे अपेक्षित असुन राज्यांनी या संधीचा कसा फायदा घ्यायचा हे ठरवायचे असल्याचे

सांगितले.

सप्टेंबर २०१४ मध्ये 'मेक ईन इंडीया' कार्यक्रमाचे नवी दिल्लीत उद्घाटन करतांना भारताच्या पंतप्रधानांनी केंद्र आणि राज्य सरकारांनी एकत्र काम करण्याच्या गरजेवर भर दिला.''राज्यांचा विकास महत्वाचा आहे. गुतंवणुकीला आकर्षित करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारांनी एकत्र काम करण्याची गरज आहे.'' ''राज्यांचा विकास हाच देशाचा विकास आहे.'' असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

गुजरातचे मुख्यमंत्री असतांना, परराष्ट्रां बरोबर व्यावसायीक आणि व्यापर संबंधांमध्ये राज्य सरकारे हे महत्वाचे भागदारक असण्याबाबत ते कट्टर पुरस्कर्ते होते. २००३ साली त्यांनी ''व्हायब्रंट गुजरात शिखर परिषद'' सुरू केली. शिखर परिषदेत उद्योगपतींचाच नव्हे, तर आशिया, आफ्रीका आणि युरोप या विवीध देशांचे मुत्सद्दीही सहभागी झाले होते. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री असतांना त्यांनी राष्ट्रांमध्ये शिष्टमंडळांचे नेतृत्व केले, त्यात सिंगापूर, चीन आणि जपान या राष्ट्रांचा समावेश होता.

गेल्या काही वर्षांमध्ये, गुजरात विविध राष्ट्रांबरोबर संबंध दृढ करण्यात आघाडीवर आहे. राज्यांचे मुख्यमंत्री त्यांच्या राज्यांचे व्यापारदूत होण्याची लक्षणे १९९० मध्ये दिसून आली. आर्थिक सुधारणा, माहिती तंत्रज्ञानात भारताने केलली प्रगती, आणि प्रवासी भारतीयांच्या काही गटांनी भारताच्या आर्थिक पराक्रमाचा मोठ्या कष्टाने केलेला प्रचार ही यामागची सुविधात्मक कारणे आहेत. यामागे संघराज्य पद्धती आणि जागतिकीकरण ही दोन महत्वाची कारणे आहेत व या दोन्हीही गतिमान संज्ञा आहेत. जेटकिन्स हे 'द एशियन सर्व्हे' साठी लिहीलेल्या ''हाऊ फेडरॅलिझम इनफ्लुएंसेस ईंडीयाज डोमेस्टीक पॉलिटीक्स ऑफ डब्ल्युटीओ एंगेजमेंट''? नामक लेखात (२००३: ६००) दावा करतात की,

''असे अनेक मुद्दे आहेत जेथे जागतिकीकरण आणि संघराज्य या दोन्ही तात्त्विकदृष्ट्या, भारतीय लोकशाहीच्या संस्था छेदतात. 'संघराज्य पद्धती' आणि 'जागतिकीकरण' या संज्ञा सातत्याने विकसित होणाऱ्या प्रक्रीया आहेत. जागतिकीकरण जास्त स्वाभाविक पणे होऊ शकेल परंतू, संघराज्य पद्धतीही, दोन भागांमध्ये विभागता येईल. संघराज्य संस्था या सतत बदलांच्या प्रकीयेमध्ये असतात आणि दुसरे असे की यामध्ये राजकीय संबंध जे केंद्र-राज्य वाटाघाटीत (बरेचवेळा पक्षपाती पणाच्या) मुळाशी असतात, ते स्थिरते ऐवजी बदलासाठी सराकारांतर्गत संस्थांमध्ये पद्धतशीर कल तयार करतात.''

मुख्यमंत्र्यांनी राज्याला पुढे आणण्याचे पहिले उल्लेखनीय उदाहरण म्हणजे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबु नायडु यांचे. नायडु प्रथम मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष बिल गेट्स यांना १९९७ मध्ये भेटले आणि त्यांना आपल्या दूरदृष्टीने प्रभावित केले. याची परिणीती, मायक्रोसॉफ्टच्या अध्यक्षांनी कंपनीचे पहिले भारतीय विकास केंद्र हैद्रबादमध्ये (आत्ताची तेलंगणा आणि आंध्र प्रदेशची राजधानी) स्थापन केले. यामुळे शहराची प्रतिमा माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र म्हणून प्रस्थापित झाले व बऱ्याच वेळा या शहराच्या उल्लेख 'सायबराबाद' असा होऊ लागला. 'द इकॉनॉमिकल अँड पॉलिटिकल वीक्ली' या मासिकासाठी २००१ मध्ये रुडॉल्फ अँड रुडॉल्फ यांनी लिहिलेल्या ''द आयकॉनायझेशन ऑफ चंद्राबाबु:शेअरींग ऑफ सोव्हरंटी इन इंडीयाज फेडरल मार्केट इकॉनॉमी' या लेखात, म्हटले आहे की, गेल्या दोन दशकांमध्ये झालेल्या बदलांमुळे अनेक राज्ये एकामेकांमध्ये स्पर्धा करु लागलीत. नायडु आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री एसएम कृष्णा यांनी त्यांच्या शहरांना संभाव्य केंद्रे म्हणुन केलेल्या प्रचाराचे उदाहरण दिले आहे. या दोन्ही नेत्यांच्या आक्रमक प्रचारामुळे नुसती माहिती तंत्रज्ञानातच प्रगती झाली नाही तर, इतर देशांच्या नेतृत्वाने त्यांच्या सामर्थ्याची दखल घेण्यात आली. अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन आणि त्यांचे उत्तराधिकारी जॉर्ज.डब्ल्यु. बुश यांनी हैद्राबादला २००० आणि २००६ साली अनुक्रमे भेट दिली, तर चीनचे माजी पंतप्रधान ली पिंग पेंग यांनी २००१ मध्ये बँगलोरला भेट दिली.

**राज्य गुतंवणुक शिखर परिषदा:**

राज्य गुतंवणुक शिखर परिषदांवर एखाद्याने नजर टाकल्यास, असे आढळते की, 'व्हायब्रंट गुजरात शिखर परिषद' २००३ साली सुरु झाली तर याचे अनुकरण करण्यास ज्या इतर राज्यांनी सुरवात केली त्यात बिहार, मध्य प्रदेश, पंजाब आणि त्रिपुरा यांचा समावेश होतो. या शिखर परिषदांचा

स्वभाव आणि लक्ष्य मात्र अत्यंत वेगळे आहेत. खासकरुन २०१२ मधिल बिहार शिखर परिषद खूप रंजक होती कारण तत्कालीन मुख्यमंत्री नितिश कुमार यांनी नेपाळचे तत्कालीन पंतप्रधान बाबुराम भट्टाराय यांना निमंत्रीत केले होते. (http://businesstoday.intoday.in/story/bihar-global-summit-nitish-kumar/1/22544.html). बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी यावेळी असे प्रतिपादीत केले होते की, सर्व समावेशक विकास देशाच्या सर्व भागांचा विकास दर्शवतो फक्त मुलत: भौगोलिक फायद्यांनी समृद्ध आहेत अशा काही भागांचाच नव्हे. तर (http://businesstoday.intoday.in/story/global-bihar-summit-2012-nitish-kumar-on-bihar-development/1/22561.html)

विकसनशील पंजाब गुंतवणुकदार शिखर परिषद, २०१३ मध्ये मुख्य भर स्वदेशी खासगी गुंतवणुकदाराकडून गुंतवणुक आकर्षित करण्याकडे होता. त्यापाठोपाठ प्रवासी (अनिवासी भारतीय) पंजाबी संमेलन आयोजीत केले होते ज्यात पंजाबी वंशाच्या अनेक उद्योगपतींनी त्याचबरोबर मूळचे पंजाबचे असलेल्या कॅनडातील अनेक राजकारण्यांनी यात सहभाग घेतला होता.

या शिखर परिषदां व्यतिरीक्त, अनेक मुख्यमंत्री देशांमध्ये शिष्टमंडळांचे नेतृत्व करत आहेत. अगदी अलिकडे, अनेक मुख्यमंत्र्यांनी आग्नेय आशियामध्ये शिष्टमंडळांचे नेतृत्व केले. यामध्ये तेलंगणाचे मुख्यमंत्री (केसीआर राव), पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री (ममता बॅनर्जी) आणि राजस्थानच्या(वसुंधरा राजे) यांनी सिंगापुरला दिलेल्या भेटीचा समावेश होतो. २०१३ मध्ये कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्दारामय्या यांनी चीनला भेट दिली होती.

परकीय गुंतवणुक आकर्षित करण्या व्यतिरिक्त, राज्यांचे नेते बहुपक्षीय संस्थांशीही संबंध वाढवायचा प्रयत्न करत आहेत, ज्यात जागतिक बँके कडून घेण्यात आलेल्या कर्जाचाही समावेश होतो. केंद्र सरकारनेही जागतिक व्यापर परिषदेच्या बरोबरच्या वाटाघाटींमध्येही त्यांना पटलावर घेतले आहे, खासकरुन शेती बाबतच्या मुद्यांबाबत.

जरी बाहेरील जगाबरोबरच्या भारताच्या आर्थिक दुव्यामध्ये राज्यांच्या भूमिकेत वाढ दिसली असली तरी, त्यात आणखी भर अपेक्षीत आहे.

## आर्थिक मुत्सद्देगिरी जास्त प्रभावी करणे

जरी सध्याच्या सरकारचे लक्ष्य भारताला उत्पादनाचे केंद्र करण्यावर आणि असले त्यांचे राज्यां बरोबर असलेले सहकार्याचे नाते इष्ट असले तरी, त्यात अनेक कमतरता आहेत. यांना संबोधित करणे अपेक्षित आहे या कमतरता फक्त धोरणात्मकच नसून मानसिकते बाबतही आहेत.

पहिला मुद्दा हा अर्थातच सरकार कडून आवश्यक असलेल्या मंजुरी आणि निर्यात परिषदे संदर्भात आहे. पंतप्रधानांनी सुरळीत करण्याबरोबरच आणि राज्यांकडे निर्यात प्रोत्साहन परिषदांना जादा अधिकारासहीत असण्याबाबत भाष्य केले आहे. हे नुसतेच धोरणातील क्रांतिकारी बदल नसून मानसिकते बाबतचेही आहेत.

दुसऱ्या मुद्द्यात असमानतेचा स्पष्टपने उल्लेख केला आहे. काही राज्यांना परकीय गुंतवणुकीचा मोठा हिस्सा मिळत असल्याने राज्यांच्या अधिकारावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. राज्य याची अनिष्ट परिणाम होते. महाराष्ट्र, नवी दिल्ली, गुजरात आणि तमिळनाडु नेहमी परकीय गुंतवणुकीतील सिंहाचा वाटा मिळवतात, ज्यात भौगोलीक स्थानाचाही समावेश होतो. मुखर्जी रिजनल इनईक्वॅलीटी इन फॉरेन डायरेक्ट इंव्सेस्टमेंट फ्लोव्ज टु इंडीया:द प्रॉब्लेम्स अँड प्रॉस्पेक्ट्स' मध्ये ते असा मुद्दा मांडतात की,

''२००० ते जुन २०१२ या काळात अव्वल सहा राज्ये अनुक्रमे महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक, तमिळनाडु, गुजरात आणि आंध्र प्रदेश देशात येणाऱ्या ७०% थेट परकीय गुंतवणुकीसाठी एकत्रीतपणे कारणीभूत ठरतात जे थेट परकीय गुंतवणुकीचे राज्य पातळीवर होणाऱ्या केंद्रीकरणाची सुस्पष्ट लक्षणे आहेत.'' (२०११:१००).

याबाबत कुठलाही आडमार्ग नसुन जी राज्ये मागे पडली आहेत त्यांना इतर राज्यांच्या मदतीची गरज आहे. चीनचा आर्थिक विकास बघता, भारताच्या राज्यनिहाय इथे मागासलेल्या राज्यांना प्रोत्साहनात्मक मार्ग अवलंबिण्यासाठी प्रेरित करतांना राज्यांना महत्वाची आर्थिक केंद्रे बनविण्यात अपयश आले आहे. बिहार आणि मध्यप्रदेशचा सर्वांगीण विकास जरी झाला असला तरी त्यांना प्रत्यंक्ष आर्थिक गुंतवणूक केंद्रे बनविण्यात सरकार अपयशी ठरले आहे.

पूर्व भारतातील इतर प्रदेश आणि ईशान्येकडे अजुन अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. व्यापार सुलभीकरण केंद्राचे वाराणसीत भूमीपूजन केल्यावर विणकरांना संबोधित करतांना, पंतप्रधानांनी पश्चिम भारताचा विकासच भारताच्या विकासासाठी पुरेसा नसून, या दोन्ही भागांचा विकास करण्याची आणि वाढ जास्त न्याय्य असण्याची गरज व्यक्त केली आहे.

चॅटर्जी, एस, मिश्रा,पी आणि चॅटर्जी, बी यांच्या थेट परकीय गुंतवणुकीच्या निर्णायक घटकांबाबत 'डिटर्मीनंट्स ऑफ इंटर स्टेट व्हेरिएशन्स इन एफडीआय इनफ्लोझ इन इंडिया'(२०१३) नामक अभ्यासात उर्वरित मत मांडले आहे. घरगुती गुंतवणुक, परिवहन आणि संभाषणाच्या पायाभूत सुविधा असे काही घटक आकर्षित करण्यासाठी महत्वाचे आहेत.

केंद्र सरकार आपल्या अखत्यारीत, भारतातील असे मोठे प्रकल्प ज्यांचे सामुदायिक महत्व आहे, ''खासकरुन भारताचे म्यानमार बरोबरचे संबंध,'' अशा ईशान्य राज्यांना स्वदेशी गुंतवणुकीतील वाढी बरोबर पायाभुत सुविधांच्या प्रकल्पांसाठी प्राधान्य देऊ शकतात. त्यामुळे प्रत्यक्ष गुंतवणुकीतील वाढ अपेक्षित आहे.

''मागासलेल्या राज्यांसाठी, स्वदेशी गुंतवणुक कदाचित पायाभूत सुविधा आणि बाजारातील संधी निर्माण करतील, ज्या थेट परकीय गुंतवणुकदारांना गुंतवणुकीसाठी पोषक ठरतील. राज्यातील जास्तीत जास्त स्वदेशी गुंतवणुक, व्यापारासाठीचे पोषक वातावरण दर्शवेल आणि याद्वारे जास्त थेट परकीय गुंतवणुक करता येऊ शकेल असा अंदाज आहे.

येथे हे समर्पक ठरेल की, ईशान्य भागाचा विकास फक्त सात राज्यांपुरता मर्यादीत न राहता इतर राज्ये खासकरुन पश्चिम बंगाललाही मदतपुर्ण ठरेल. कोलकत्ताचा भौगोलिक विचार करता हे शहर कदाचीत पूर्व भारतातील केंद्र म्हणून उदयाला येईल उशिराने का होईना, राज्य, गुंतवणुक दारांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करीत आहे, युन्नान राज्याची राजधानी क्युन मिंगरडी स्वत: विदेशी प्रत्यक्ष गुंणतवकीचा जोरदार प्रचार करत असुन वार्षिक पातळीवर चायना--दक्षिण आशियायी देशांच्या सहभागाने प्रदर्शन आयोजीत करीत आहे, हे चीनला म्यानमारशी जोडणारे महत्वाचे संपर्क केंद्र ठरेल आणि म्यानमारशी बांग्लादेश मार्गे संपर्क केंद्र म्हणुन प्रस्थापित होत आहे.

तिसरे, ज्या राज्य सरकारांना गुंतवणुक आकर्षित करावयाची आहे, त्यांना विदेशात व्यापार कार्यालयांसाठी परवानगी देण्याची हीच वेळ आहे. असा प्रघात अमेरीका, चीन, जपान मध्ये असून तेथे राज्यांना विदेशात व्यापार कार्यालयांची परवानगी देण्यात आली आहे. जरी, पंतप्रधानांनी हा मुद्दा बरेचवेळा मांडला असला तरी त्यावर चांगल्या प्रकारे विचार होणे गरजेचे आहे, ज्यामुळे ते जास्त प्रभावी होईल व त्याचे अपेक्षित निकाल मिळू शकतील. वैयक्तिकरीत्या राज्यांनी कार्यालये स्थापन करणे गरजेचे नाही. अँड्र्यु जे. कॅस्से हे आपल्या 'द लोकेशन ऑफ युएस स्टेट्स' ओव्हरसीज ट्रेड ऑफिसेस' या आपल्या विदेशातील व्यापार कार्यालयांच्या संशोधनात म्हणतात की

''ग्रेट लेक राज्यांची परिषद ऑस्ट्रेलीया, ब्राझिल, कॅनडा, चिली, चीन आणि दक्षिण अफ्रिकेतील विदेश कार्यालयांची व्यवस्था पहाते. परिषदेची सदस्य राज्य इलिनॉय, इंडियाना, मिशिगन, मिन्नेसोटा, न्यु यॉर्क, ओहीयो, पॅनसिल्व्हेनीया, आणि विस्कॉन्सिन-यातील कोणत्याही कार्यालयाची निवड करु शकतात.

काही बाबतीत, भारत अशा संयुक्त व्यापार कार्यालयाचा विचार करु शकतो. हे खासकरुन ज्या देशांमध्ये वाणिज्य आणि व्यापार त्याचबरोबर प्रवासी भारतीयांमुळे संबंध दृढ आहेत, अशा देशांमध्ये महत्वाचे आहे. उदाहरणार्थ, गुजरात आणि तमिळनाडू, सिंगापुर मध्ये संयुक्त कार्यालय स्थापित करु शकतात. सर्वप्रथम तेथे दृढ आर्थिक संबंध आहेत तर दुसऱ्याचे ऐतिहासीक संबंध आहेत. त्याचप्रमाणे, अनेक अमेरीकेतही काही राज्यांमध्ये संयुक्त कार्यालये स्थापित करु शकतात, कारण अनेक भारतीय कॅलिफोर्नीया, न्युयॉर्क, न्युजर्सी आणि टेक्सास या राज्यांमध्ये निवास करतात. यापलिकडे, शेजारील राष्ट्रांमध्ये व्यापार कार्यालये स्थापित करण्याचा विचार करणे गरजेचे आहे. जसे ईशान्येतील राज्यांनी म्यानमार आणि बांग्लादेश मध्ये कार्यालयांचा विचार करावा.

अंतिमत:, जर राष्ट्रीय नेत्यांनी गुंतवणुकीची केंद्रे न झालेल्या राज्यांच्या गुंतवणुकदारांच्या शिखर परिषदांमध्ये

सहभागी होण्यास सुरवात केल्यास, त्या राज्यांच्या प्रतिमेत सुधारणा होईल आणि त्यामुळे या राज्यांमध्ये लक्ष देण्यास गुंतवणुकरदारांना भाग पाडेल. जर पंतप्रधानां च्या अनुपस्थितील, वाणिज्य मंत्र्यांनी राज्यांनी आयोजीत केलेल्या गुंतवणुकदारांच्या शिखर परिषदांमध्ये खास करुन ईशान्येकडील राज्यांनी आयोजित केलेल्या परिषदांमध्ये खास करुन ईशान्येकडील राज्यांनी आयोजित केलेल्या परिषदांमध्ये सहभागी व्हावे.

**निष्कर्ष:**

जरी आर्थिक अंतरराष्ट्रीय संबंधात राज्यांच्या सहभागात काही प्रमाणात सकारात्मक प्रगती झाली असली, तरी हे संस्थात्मक होणे गरजेचे आहे. ह्या प्रक्रीयेला जास्त प्रभावी करण्यासाठी त्यातील अडथळे दूर करणे गरजेचे आहे. ही प्रक्रीया जास्त फलदायी होण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारांपलिकडे, चेंबर ऑफ कॉमर्स, तज्ञ मंडळ आणि प्रवासी भारतीयांचे सदस्य अशा इतर घटकांना बरोबर घेण्याची नितांत गरज आहे. आपल्या राज्यांचे विपणन सुधारण्यासाठी राज्य सरकारांनी नविन मार्ग शोधणे आणि प्रयत्न करण्याची गरज आहे.

**संदर्भ:**


अँड्र्यु ए, कॅस्से 'द लोकेशन ऑफ युएस स्टेट्स' ओव्हरसीज ट्रेड ऑफिसेस' स्कुल ऑफ इकॉनॉमिक सायंसेस, वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सीटी, ऑक्टोबर २०१२ वेब लिंक: http://www.cgu.edu/PDFFiles/SPE/Behavior%20Econ%20Seminars/2012/overseas_offices.pdf

चॅटर्जी, एस, मिश्रा,पी आणि चॅटर्जी, बी 'डिटर्मीनंट्स ऑफ इंटर-स्टेट वेरिएशन्स इन एफडीआय इनफ्लोझ इन इंडिया', युरेशियन जर्नल ऑफ बिझनेस अँड इकॉनॉमिक्स,२०१३,६(११), ९३-१२०

जेटकीन्स (२००३) 'हाऊ फेडरॅलिझम इनफ्लुएंसेस ईंडीयाज डोमेस्टीक पॉलिटीक्स ऑफ डब्ल्युटीओ एंगेजमेंट (अँड इज इटसेल्फ ॲफॅक्टेड इन धीस प्रोसेस)'. एशियन सर्व्हे, व्हॉल.४३, नं.४ (जुलै/ऑगस्ट २००३),पीपी.५९८-६२१

मुखर्जी, ए., रिजनल इनईक्वॅलीटी इन फॉरेन डायरेक्ट इंव्हेसमेंट फ्लोव्ज टु इंडीया:द प्रॉब्लेम्स अँड प्रॉस्पेक्ट्स'.रिझर्व बँक ऑफ इंडिया ऑकेजनल पेपर्स, व्हॉल्युम ३२ नं.२. मान्सुन २०११.

रुडॉल्फ, एल आणि रुडॉल्फ, एस, 'द आयकॉनायझेशन ऑफ चंद्राबाबु:शेअरींग ऑफ सोव्हरंटी इन इंडीयाज फेडरल मार्केट इकॉनॉमी', द इकॉनॉमिकल अँड पॉलिटिकल विकली, वॉल्युम XXXVI, नं १८ , मे ५-११



(***त्रिदेव सिंग मैनी*** *:- सोनेपट येथिल जिंदल जागतिक विद्यापीठात वरिष्ठ सहाय्यक संशोधक असुन त्यांनी या आधि 'ऑबर्झव्हर रिसर्च फउन्डेशन, नवी दिल्ली आणि सिंगापूर येथिल दक्षिण आशियन अभ्यास संस्था सिंगापूर येथे ते कार्यरत होते.*

**संपर्कासाठी इमेल:**
tsinghmaini2012@gmail.com)



## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके (हिंदी)

१. भारतीय दुर्ग- ₹ ४८५.००

२. जाने अपने जिगर की ₹ २०५/-

३. माऊंट एव्हरेस्ट की गाथा ₹ ११५/-

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-


## अन्य काही पुस्तके

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# भारतातील परदेशी गुंतवणूक - विचारा तर खरं ?






**प्र.१** भारतात एखादी परदेशी कंपनी कोणत्या स्वरूपाचे उद्योग सुरू करू शकते ?

**उत्तर-** भारतात उद्योग सुरू करण्याचे नियोजन असलेली कंपनी खालील उद्योग करू शकते.

**अ.** कंपनी कायदा १९५६ अन्वये कंपनी स्थापन करू शकते. ती संयुक्त किंवा विदेशी मालकीची कंपनी असू शकते.

**आ.** एखादी परदेशी कंपनी तिचे संपर्क कार्यालय- प्रातिनिधिक कार्यालय किंवा प्रकल्प कार्यालय किंवा शाखा कार्यालय सुरू करू शकते. ती कंपनी परकीय विनिमय व्यवस्थापन नियम २००० अंतर्गत असलेल्या कृती करू शकते (त्यात शाखा कार्यालय किंवा इतर उद्योग सुरू करू शकते)

**प्र.२** एखाद्या भारतीय कंपनीत थेट परकीय गुंतवणूक मिळवण्याची प्रक्रिया कोणती ?

**उत्तर-** भारतीय कंपनीत परकीय गुंतवणुकीचे दोन मार्ग आहेत.

**अ. स्वाभाविक किंवा आपोआप मार्ग-** भारत सरकार किंवा रिझर्व बँक ऑफ इंडियाची पूर्व परवानगी न घेताही ही गुंतवणूक थेट परदेशी गुंतवणूक धोरणात निर्देशीत केलेल्या विशिष्ट क्षेत्रात मिळवता येते.

**आ. सरकारी मार्ग-** भारत सरकारच्या परवानगीने स्वाभाविक मार्गात समाविष्ट नसलेल्या क्षेत्रातील थेट परदेशी गुंतवणूक मिळवता येते त्यासाठी प्रस्ताव परदेशी गुंतवणूक उत्तेजन मंडळाकडे प्रस्ताव पाठवावा लागतो जो विभाग भारतीय अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत काम करतो. अर्ज http://www.dipp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सर्व तपशील असलेला साध्या कागदावरील अर्जही स्वीकारला जातो त्यासाठी कुठलेही शुल्क आकारले जात नाही. ज्या भारतीय कंपनीला थेट परदेशी गुंतवणूक स्वाभाविक किंवा सरकारी मार्गाने मिळते त्यांना थेट परदेशी गुंतवणूक धोरणातील तरतुदींचे पालन करताना भारतीय रिझर्व बँकेला माहिती द्यावी लागते.

**प्र.३.** एखाद्या भारतीय कंपनीला थेट परदेशी गुंतवणूक मिळवण्याची साधने कोणती ?

**उत्तर-** समभागातील गुंतवणुकीना थेट परदेशी गुंतवणूक असे म्हटले जाते. हे समभाग अग्रक्रमाच्या शेअर्समध्ये अति कर्ज संस्थांमध्ये परिवर्तनीय असणे आवश्यक आहे. त्या किंमतीवर त्याचे सूत्र ठरवले

जाते. अंशत समभाग व वॉरंट जर भारतीय कंपनीने कंपनी कायदा २०१३ नुसार जारी केली असेल तर ते आवश्यक आहे. शिवाय सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात सेबीची मार्गदर्शक तत्वे पाळणे गरजेचे आहे, तरच ती थेट परकीय गुंतवणूक योग्य साधनाने मिळवलेली आहे असे म्हटले जाते.

भारत सरकारने निर्धारित केलेल्या खालील साधनांनी भारतीय कंपनीत केलेली गुंतवणूक ही थेट परदेशी गुंतवणूक गणली जाते. थेट परदेशी गुंतवणूक ही परिवर्तनीय भांडवली साधनांच्या किंमत किंवा परिवर्तनाचे मूल्य सांगत असते ते वेळोवेळी बदलत असते. परिर्वतनीयतेच्यावेळी असलेली मूल्ये ही कुठल्याही परिस्थीतीत साधने जारी केल्याच्या वेळेच्या वास्तव किंमतीपेक्षा कमी असत नाही. फेमा कायद्यातील नियमानुसार आंतरराष्ट्रीय स्विकृती असलेल्या पद्धतीने अनिर्देशित कंपन्यांसाठी किंमत निर्धारण केले जाते तसेच निर्देशित कंपन्यांसाठी सेबीच्या नियमानुसार किंमत निर्धारण (आयसीडीआर) केले जाते, त्यात नफ्याची शाश्वत हमी नसते.

**प्र.४** थेट परदेशी गुंतवणूक भारतीय कंपनीमध्ये कुठल्या स्वरूपात स्विकारली जाऊ शकते ?

**उत्तर-** एखादी भारतीय कंपनी ही समभाग किंवा परिवर्तनीय रोख्यांच्या रूपात थेट परदेशी गुंतवणूक योजनेत गुंतवणूक स्विकारू शकते. एखादी अनिवासी भारतीय व्यक्ती शेअर व रोख्यांसाठी खालील स्वरूपात पैसे देऊ शकते

१. नेहमीच्या बँकिंग पद्धतीत इनवर्ड रेमिटन्स पद्धत
२. अनिवासी भारतीयाच्या खात्यात डेबिट किंवा एफसीएनआर खात्यात डेबिट दाखवून ती बँकेच्या एडी प्रवर्गात समाविष्ट केली जाते
३. स्वामित्वधन किंवा सरसकट रक्कम किंवा तांत्रिक माहिती बदल्यात शुल्क दिले जाऊ शकते शिवाय इसीबीचे परिवर्तन केले जाऊ शकते व ते शेअर देण्यासाठी गृहित धरले जाते.
४. बिनव्याजी एस्क्रो खात्यात भारतीय रूपयात डेबिट दाखवता येते हे खाते एडी प्रवर्गातील बँकेत असले पाहिजे व ते निवासी किंवा अनिवासी भारतीयाचे खाते असू शकते त्याच्या मार्गाने शेअर खरेदी करता येईल. जर शेअर्स किंवा परिवर्तनीय रोखे हे रक्कम दिल्यानंतर १८० दिवसात किंवा अनिवासी भारतीयांच्या खात्यात किंवा एफसीएनआर बी किंवा एस्क्रो खात्यात डेबिट पडल्यानंतर १८० दिवसात दिले नाहीत तर रक्कम परत करावी लागते. रिझर्व बँक त्यांच्याकडे आलेल्या अर्जानुसार भारतीय कंपनीला पैसे परत देण्यास किंवा जर पैसे १८० दिवासांपेक्षा जास्त काळ बाकी असतील तर ते पैसे दिल्याच्या तारखेपासूनच्या हिशेबाने त्या किंमतीचे शेअर्स ताबडतोब देण्यास सांगू शकते.

**प्र.५** भारतात कुठल्या क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीला स्वाभाविक व सरकारी अशा दोन्ही ही मार्गानी मान्यता नाही. ?

उत्तर- अणुउर्जा, लॉटरी व्यवसाय, जुगार व बेटिंग, चिट फंड व्यवसाय निधी कंपनी कृषी ( फुलशेती, फलोद्यान, बियाणे विकास, पशुसंवर्धन, भाजीपाला लागवड, मशरूम उद्योगात काही अटींच्या अधीन राहून गुंतवणूक शक्य आहे. लागवड सेवा ( चहा लागवड वगळता) (c.f. Notification No. FEMA 94/2003-RB dated June 18, 2003).

गृह निर्माण व स्थावर मालमत्ता व्यवसाय (वसाहती, निवासी बांधकाम, व्यावसायिक संकुलांचे बांधकाम, रस्ते व पूल वगळता पण पुढील नियमात निर्देशित केल्याप्रमाणे अधिसुचना क्रमांक फेमा १३६/२००५ - आरबी दि. जुलै १९/२००५.

टीडीआरमधील उलाढाली (विकास हस्तांतर अधिकार उलाढाली) सिगार, चिरूट, सिगॅरिलो व सिगारेट तसेत तंबाखू व त्याच्या सारखे पदार्थ यापासून बनलेल्या वस्तू.

**प्र.६** स्वाभाविक मार्गाने थेट परदेशी गुंतवणूक करण्याचा प्रक्रियेचा नंतर पाठपुरावा कसा केला जातो ?

**उत्तर-** यात दोन प्रकारे पाठपुरावा करावा लागतो

### शेअरचे पैंसे मिळाल्यानंतर अर्ज

अनिवासी गुंतवणूकदाराकडून शेअरचे पैसे मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत भारतीय कंपनीने परदेशी गुंतवणूक विभागाकडे जायचे असते व

नंतर रिझर्व बँकेच्या संबंधित शाखेकडे संपर्क साधायचा असतो कारण परदेशी गुंतवणूक विभागाच्या अंतर्गतच ते काम करीत असते. तिथे तुम्हाला विस्तृत फॉर्म दिला जातो त्यात खालील तपशील भरून द्यायचा आहे.

परदेशी गुंतवणूरदाराचे नाव व पत्ता

निधी स्वीकारल्याची तारीख व रक्कम

ज्या अधिकृत डीलरच्या मार्फत ते पैसे पाठवले त्याचे नाव व पत्ता

'नो युवर कस्टमर' अहवालात परदेशातील अनिवासी गुंतवणूदाराने ज्या परदेशी बँकेतून रक्कम दिली आहे तेथील माहिती देणे आवश्यक आहे.

**सरकारी मान्यतेचा तपशील**

जर गुंतवणूकदाराच्या खात्यातून रक्कम रेमिट झाली असेल तर १८० दिवसात इनवर्ड रेमिटन्स दाखवणे आवश्यक आहे अन्यथा ते फेमा नियमांचे उल्लंघन होईल

**अनिवासी गुंतवणूकदारांचे शेअर्स**

शेअर जारी केल्याच्या तीस दिवसात त्याचा अहवाल एफसी-जीपीआर-पार्ट ए च्या रूपात दिला पाहिजे त्याला खालील कागदपत्रे जोडली पाहिजेत व ते सर्व परदेशी विनिमय विभागाच्या संबंधित रिझर्व बँक ऑफ इंडिया कार्यालयाकडे सादर केले पाहिजे.

**त्यासाठी खालील कागदपत्रे जोडावी लागतात.**

कंपनीच्या कंपनी सचिवाचे संबंधित अनिवासी गुंतवणूकदारांकडून गुंतवणूक स्वीकारत असलेले प्रमाणपत्र.

कंपनीने शेअर अदा करताना एफडीआय योजनेत निर्देशित केल्याप्रमाणे अधिसुचना क्र. फेमा २०/२०००-आर बी दिनांक ३ मे २००० त्यात वेळोवेळी बदल केले जातात.

विशिष्ट क्षेत्रात विशिष्ट मर्यादेत गुंतवणूक स्वाभाविक मार्गाने रिझर्व बँकेच्या माध्यमातून करताना स्वाभाविक मार्गासाठी असलेले नियम व अटी पाळणे आवश्यक आहे.

किंवा

शेअर हे एसआयए व एफआयपीबी मंजुरी क्रमांक---------- दिनांक----------- यापद्धतीने एफआयपीबीला प्रत द्यावी लागते)

वैधानिक लेखापालांचे प्रमाणपत्र व सेबीचे नोंदणीकृत मर्चंट बँकर- सनदी लेखापाल यांची प्रमाणपत्रे देणे आवश्यक आहे त्या प्रमाणपत्रात भारताबाहेर असलेल्या व्यक्तीला दिलेल्या शेअरची किंमत कुठून आली कशा पद्धतीने आली हे दाखवून द्यावे लागेल.

**प्र.७.** अनिवासी व्यक्तींकडील सध्याचे शेअर्स निवासी के निवासी किंवा अनिवासी भारतीयांना हस्तांतरित केले केले जाऊ शकतात. का?

**उत्तर-** फेमानुसार हस्तांतरण याचा अर्थ शेअर विक्री करणे, अधिग्रहित करणे किंवा गहाण ठेवणे, देणगी म्हणून , कर्ज म्हणून देणे. फेमा कायदा कलम ३ (झेडइ) अन्वये त्याचा ताबा घेणे शक्य आहे. परंतु त्यासाठी सेबीने ठरविलेल्या नियमानुसार आणि हा रिझर्व बैंक ऑफ इंडियाच्या परवानगी शिवाय हंस्तातरीत करणे शक्य आहे.

**प्र.८.** भारतीय नागरिक अनिवासी भारतीयाला देणगी म्हणून देऊ शकतो का ?

**उत्तर-** जर एखाद्या भारतीय व्यक्तीला त्याच्याकडील रोखे अनिवासी भारतीयाला द्यायचे असतील तर (तत्कालीन ओसीबीशिवाय) करता येते त्या व्यक्तीने असे करण्यासाठी परकीय विनियम विभागाच्या मुख्य कार्यालयाकडे अर्ज करावा व रिझर्व बँक ऑफ इंडियाला खालील गोष्टी सादर कराव्यात.

शेअर ज्याला द्यायचे त्याचे नाव व पत्ता

जो हस्तांतरित करणार व ज्याला हस्तांतर करणार त्यांच्यातील नाते देणगी देण्याची कारणे

रोखे, राजकोष पत्रे, बंधपत्र, सनदी लेखापालाचे रोख्यांच्या किंमतीबाबतचे प्रमाणपत्र.

डोमेस्टिक म्युच्युअल फंड व युनिसेफ मनी मार्केट म्युच्युअल फंडसच्या याबाबत अशा रोख्यांच्या निव्वळ मालमत्ता किंमत ठरवणारे प्रमाणपत्र आवश्यक असते.

शेअर्स व पूर्णपणे परिवर्तनीय रोखे यांच्या किंमतीबाबत सनदी लेखापालाचे मूल्यप्रमाणपत्र घेणे आवश्यक असते शिवाय ती किंमत सेबीच्या मार्गदर्शक तत्वानुसार व आंतरराष्ट्रीय किंमत

निर्धारणानुसार असणे आवश्यक असते. त्यात नोंदणीकृत व अनोंदणीकृत कंपन्यांचे किंमत निर्धारण वेगळे असते.

रोख्यांचे हस्तांतर करण्यास रिझर्व बँकेकडून खालील अटींवर परवानगी देण्यात येते.

१. देणगीदार हा अनुशेष १ ,४ व ५ अन्वये अधिसुचना क्र. फेमा २०/२०००-आर बी दिनांक ३ मे २०००, अनुसार वेळोवेळी बदललेल्या नियमानुसार पात्र असावा लागतो

२. देणगीदार हा हे रोखे धारण करण्यास अनुशेष क्रमांक १ ४ व ५ अन्वये अधिसुचना क्र. फेमा २०/२०००-आर बी दिनांक ३ मे २००० वेळोवेळी केल्या जाणाऱ्या बदलांनुसार पात्र असावा.

३. देणगी शेअर हे भारतीय कंपनीच्या पेड अप कॅपिटलच्या ५ टक्के नसावे, रोख्यांची मालिका व म्युच्युअल फंड योजनेला हे लागू आहे.

४. कुठल्याही क्षेत्रातील गुंतवणूक मर्यादा परदेशी गुंतवणूक मर्यादा तोडली जाता कामा नये.

५. देणगीदार व देणगी स्वीकारणारा हे जर कंपनी कायदा कलम १९५६ अन्वये नातेवाईक असतील तर त्याचा विचार करावा लागतो.

६. रोख्याची जी किंमत देणगीदार एखाद्या भारतीय निवासी व्यक्तीकडे आर्थिक वर्षात हस्तांतर करतो ती रक्कम ५ हजार डॉलरपेक्षा जास्त असता कामा नये.

रिझर्व बँकेनुसार या अटीचे पालन करावे लागते.

**प्र.९** निवासी व्यक्तीने अनिवासी व्यक्तीकडे केलेले शेअर हस्तांतर वरील प्रवर्गात बसत नसेल तर काय करावे ?

**उत्तर-** निवासी भारतीयांनी शेअर हस्तांतरण करतांना सरकारची परवानगी घ्यावी लागते.

खालील प्रकरणात शेअर हस्तांतर हे अनिवासी भारतीयांना विक्री किंवा इतर मार्गांनी करायचे असेल तर शासकीय परवानगी घ्यावी लागते.

अधिग्रहण किंवा रोखे हस्तांतरासाठी काही प्रकरणात रिझर्व बँकेची पूर्व परवानगी घ्यावी लागते.

१. शेअर किंवा परिवर्तनीय रोखे निवासी व्यक्तीकडून अनिवासी व्यक्तीकडे विकले जाणार असतील तर काही प्रकरणात रिझर्व बँकेची परवानगी घ्यावी लागते, त्यात जर पैसे अदा करण्यास विलंब होणार असेल तर ही परवानगी लागते. नंतर हा व्यवहार एफसी-टीआरएस कडून एडी प्रवर्ग बँक १ कडे पैसे जमा झाल्यापासून ६० दिवसात देण्यात येतो.

२. भारतीय निवासी असलेली व्यक्ती अनिवासी भारतीयाला रोखणे देणगी म्हणून देऊ शकतो तेव्हा रिझर्व बँकेची परवानगी घ्यावी लागते. इतर दुसरे कुठलेही प्रकरण करण्यासाठी परवानगी घ्यावी लागत नाही .

**प्र.१०** निवासी व अनिवासी भारतीय यांच्यात शेअर आदान-प्रदानाच्यावेळी कुठले सोपस्कार आवश्यक असतात?

**उत्तर-** यातील व्यवहार हा एफसी-टीआरएस फॉर्मच्या मदतीने एडी १ प्रवर्गातील बँकेला रक्कम दिल्या-घेतल्यानंतर साठ दिवसात कळवावा लागतो. ती कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी ही निवासी भारतीयाची म्हणजे हस्तांतर करणाऱ्याची आहे.

**योजना मराठी**

**डिसेंबर २०१४**

**'विदेशी प्रत्यक्ष गुणंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार'**

**२०१४-२०१५ या**

**अंकातील लेखांचा अनुवादाचे काम पाहणाऱ्या**

**भाषांतरकारांची नावे पुढीलप्रमाणे -**

| | |
|---|---|
| १. ग्रिष्मा जोग | २. राजेंद्र येवलेकर |
| ३. जुई देशपांडे | ४. राधिका अघोर |
| ५. सुवर्णा बेडेकर | ६. अमेय फडके |

# भारताच्या परकीय व्यापारातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे विवेचन

- डॉ. नितिन ज्ञानदेव चौधरी




**भारताच्या विदेशी व्यापारचे अस्तित्व स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही बघायला मिळते. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक आणि विदेशी अप्रत्यक्ष गुंणतवणुक या दोन प्रकारां द्वारे भारतात विदेशी व्यापाराने टप्याटप्याने आपले स्थान ग्रहण केले आहे. एफडीआयचा विचार करता भारताच्या एकुण गुंणतवणुकीत वर्ष २००३-०४ च्या २७.५३% प्रत्यक्ष गुंणतवणुकीच्या तुलनेत २०१२-२०१३ मध्ये या गुंणतवणुकीचा दर ५३.०३% नी वाढला. विदेशी प्रत्यक्ष गुंणतवणुकीच्या फायदा तोटयाचा विचार केला तर तोटे कमी करणे हे देशाच्या आर्थिक धोरणावर निर्भर आहे. यासाठी देशाची अर्थव्यवस्था सुदृढ राहणे हे जसे आवश्यक आहे तसेच त्यासाठी लागणारे उपघटक जसे रोजगाराच्या संधी उत्पादीत वस्तुच्या दर्जा सुधारणा, कौशल्या आधारित नविन उद्योग व्यवसाय यावर लक्ष्य देणे गरजेचे आहे.**

राष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात समानता असतांना सुध्दा राष्ट्रीय व्यापारानेच भागणार नाही. कारण मानवाच्या गरजा निरंतर वाढत असतात. आणि त्या पूर्ण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराची आवश्यकता आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार आधुनिक युगात 'काळाची गरज' बनला आहे. विषेशीकरणाच्या विविध लाभांच्या प्राप्तीकरिता आंतरराष्ट्रीय व्यापार आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेणाऱ्या प्रत्येक घटकाचा कोणत्यातरी प्रकारे लाभच होतो. यात आयात करणाऱ्या देशाला तेवढाच लाभ होतो जेवढा की, निर्यात करणाऱ्या देशाला होतो.

भारत हा विकासनशील देश असून भारतातील बाजारपेठा जागतिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून एक मोठी बाजारपेठच आहे. भारतात विदेशी व्यापाराचे अस्तित्व स्वातंत्र्य पूर्व काळातही होते आणि स्वातंत्र्योत्तर काळातही आहे. फरक एवढाच आहे की, आज भारताचा विदेशी व्यापाराचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे. १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणाने भारताच्या परकीय व्यापाराला एक नवीन दिशा प्राप्त करून दिली. जुलै १९९१ नंतर भारताने खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाची सुरवात केली. याचा परिणाम भारतातील विविध क्षेत्रातील उद्योजक उत्पादकांना विविध देशात गुंतवणुकीच्या संधी प्राप्त झाल्या. तसेच विविध क्षेत्रातील, विविध देशातील उत्पादक व उद्योजकांना भारतासारखा मोठा उपभोक्तावर्ग असणारी बाजारपेठ प्राप्त झाली. यामुळे देशात विदेशी गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

परकीय व्यापारामध्ये परकीय गुंतवणुकीचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. १. परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक २. परकीय अप्रत्यक्ष गुंतवणुक.

परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक म्हणजे परकीय गुंतवणुकदार त्याची एखादी संलग्न संस्थाच देशात उघडू शकतो किंवा देशातील एखाद्या कंपनी बरोबर भागीदारी करून थेट गुंतवणुक करू शकतो.

परकीय अप्रत्यक्ष गुंतवणुकीमध्ये परकीय गुंतवणुकदार देशातील एखाद्या कंपनीचे शेअर विकत घेवू शकतो. त्यामध्ये गुंतवणुकदाराचा कंपनीवर कोणताही ताबा न राहता गुंतविलेल्या शेअर्सवरच ताबा राहतो. यालाच परकीय संस्थात्मक गुंतवणुक असेही म्हणतात.

### भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक :

भारताला आपले विकासाचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच भारतातील भांडवलाचा प्रश्न सोडविण्यासाठी तंत्रज्ञान

व कौशल्य विकासासाठी तसेच आर्थिक वाढ करण्यासाठी भारतीय प्रशासनाने उदारीकरणानंतर परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीला मान्यता दिली. भारतात होणारी प्रत्यक्ष गुंतवणुक ही प्रामुख्याने विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा अर्थात FEMA कायदा २००० च्या नियमावलीतील अनुसूची १ अनुसार भारतीय कंपनीत होणारी भांडवली गुंतवणुक होय.

अंक टाडच्या २०१२ च्या पाहणीनुसार चीन नंतर भारत हा जगातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीचा सर्वाधिक पसंतीचा देश होता. वर्ष २०१० मध्ये भारताने चीनमध्ये १०,५७४ कोटी डॉलर विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक कमी होती, तर भारतात चीनची २,४६४ कोटी डॉलर विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक होती. विकसनशील देशात चीनचा वाटा १८.४ टक्के होता तर भारताचा वाटा हा ४.३ टक्के होता. १९९१ च्या औद्योगिक धोरणाच्या घोषणेनंतर भारतात विदेशी गुंतवणुकीत सातत्याने वाढ होत गेली. हे पुढील सारणीवरून दिसून येते.

**तालिका क्र. १**

**भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे वर्गीकरण**

(कोटी अमेरिकी डॉलर मध्ये)

| वर्ष | प्रत्यक्ष गुंतवणुक | पोर्टफोलियो गुंतवणुक | एकुण गुंतवणुक | एकुण गुंतवणुकीत प्रत्यक्ष गुंतवणुकीचा वाटा |
|---|---|---|---|---|
| २००३-०४ | ४३२-२ | ११३७-७ | १५६९-९ | २७-५३% |
| २००४-०५ | ६०५-१ | ९३१-५ | १५३६-६ | ३९-३८% |
| २००५-६ | ८९६-१ | १२४९-२ | २१४५-३ | ४१-७७% |
| २००६-०७ | २२८२-६ | ७००-३ | २९८२-९ | ७६-५२% |
| २००७-०८ | ३४८३-५ | २७२७-१ | ६२१०-६ | ५६-०९% |
| २००८-०९ | ३७८३-८ | -१३८५-५ | २३९८-३ | १५७-७७% |
| २००९-१० | ३७६३-३ | ३२३७-६ | ७०००-९ | ५३-७५% |
| २०१०-११ | २७०२-४ | ३१४७-१ | ५८४९-५ | ४६-२०% |
| २०११-१२ | ४६५५-९ | १७१७-१ | ६३७३ | ७३-०६% |
| २०१२-१३ | ३६८६-० | २७७७-० | ६४६३ | ५७-०३% |
| **एकूण** | २६२९०-९ | १६२३९-१ | ४२५३० | ६१-८२% |

**स्रोत** : दत्त एवं सुंदरम्-'२०१४ : भारतीय अर्थव्यवस्था : एस चांद पब्लिकेशन दिल्ली पआ. ३६८

वरील सारणी वरून असे लक्षात येते की, २००३-०४ ते २०१२-१३ या दहा वर्षात भारतात एकूण गुंतवणुकीबरोबरच प्रत्यक्ष गुंतवणुकीत सातत्याने वाढच होत आहे. दहा वर्षात सरासरी एकूण गुंतवणुकीच्या ६१.८२ टक्के प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुक झाली आहे.

भारताची विकासाची गती बघता देशात विविध देशातून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुक केली जात आहे. एप्रिल २००० ते मार्च २०१३ या कालावधीत मॉरिशिअस या देशाने भारतात सर्वात जास्त विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक केली आहे. भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा विविध देशांचा प्रवाह खालील सारणी वरून दिसून येतो.

**तालिका क्र. २**

**भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा प्रवाह**

कोटी रुपये

| क्रमांक | देशाचे नाव | संचयी अंर्तप्रवाह | एकूण अंर्तप्रवाहशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मॉरिशिअस | ३४११२५ | ३८% |
| २ | सिंगापुर | ९०१८२ | १०% |
| ३ | यु.के. | ८०४५६ | ९% |
| ४ | जपान | ७००९४ | ८% |
| ५ | अमेरिका | ५०९२३ | ६% |
| ६ | नेदरलँड | ४२३७८ | ५% |
| ७ | साईप्रस | ४२३२८ | ४% |
| ८ | जर्मनी | २५५१२ | ३% |
| ९ | फ्रान्स | १६८६५ | २% |
| १० | यु.ए.ई. | ११३०७ | १% |
| एकूण प्रत्यक्ष गुंतवणुकीचा अंर्तप्रवाह | | ८९६९१३ | १००% |

**स्त्रोत** : दत्त एवं सुंदरम् -'२०१४ : भारतीय अर्थव्यवस्था : एस चांद पब्लिकेशन दिल्ली पआ. ३७०

उपरोक्त सारणी वरून असे निदर्शनास येते की, मॉरिशिसचे भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीत सर्वोच्च स्थान आहे. देशातील एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या स्त्रेतांपैकी ३८ स्त्रोत हे या देशाचे आहे. तसेच २०१३-१४ या कालावधीत मॉरिशिस या देशाने ४.९ बिलीयन डॉलर तर सिंगापुर ने ६.० बिलीयन डॉलर, यु. के. ने ३.२ बिलीयन डॉलर, जपान ने १.७ बिलीयन डॉलर आणि अमेरिकेने ०.८ बिलीयन डॉलर भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक केली आहे.

भारतात होणाऱ्या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचा विचार करता विविध क्षेत्रात ही गुंतवणुक झाली आहे. याचे क्षेत्रावार वर्गीकरण पुढील सारणी नुसार खालील प्रमाणे.

**तालिका क्र. ३**

**क्षेत्रगणिक परकीय थेट गुंतवणुक**

| क्षेत्र | २००० ते २०१४ मधील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक बिलीयन डॉलर मध्ये | २०१३-१४ मधील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक बिलीयन डॉलरमध्ये |
|---|---|---|
| सेवा क्षेत्र | ३९-८ | २-२ |
| बांधकाम क्षेत्र | २३-४ | १-२ |
| दुरसंचार | १४-२ | १-३ |
| संगणक | १२-९ | १-१ |
| औषधी | ११-६ | १-३ |

स्त्रोत : देसले किरण -'२०१४ : स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग १ : दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव पआ. २३९

यावरून असे लक्षात येते की, भारतासारख्या कृषीप्रधान देशात सेवा क्षेत्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक ही सर्वाधिक असलेली दिसून येते. त्यापाठोपाठ बांधकाम क्षेत्र, दुरसंचार क्षेत्र, संगणक क्षेत्रात ही गुंतवणुक झाली आहे. म्हणजेच भारतात विविध उद्योग क्षेत्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे अस्तित्व असल्याचे दिसून येते.

**विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला प्रोत्साहन :**

भारतात जुलै २०१४ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या सरकारने, ''सबका साथ सबका विकास'' या तत्त्वावर विदेशी गुंतवणुकीला काही निवडक क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी आराखडा तयार केला आहे. तसेच भारताच्या परकीय व्यापारात भागीदारी वाढविण्यासाठी प्रशासनाने योग्य ती पावले अवलंबविण्यास सुरवात केली आहे. अंदाजपत्रक २०१३-१४ मध्ये अर्थमंत्र्यांनी सुरक्षा क्षेत्रात सुध्दा २६ टक्के विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला खुले केले आहे. तसेच विमा क्षेत्राच्या द्वारे २६ टक्क्यांवरून ४९ टक्क्यांपर्यंत खुले केले आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात परकीय व्यापारात वाढता सहभाग बघता तसेच परकीय व्यापाराच्या विस्तारामुळे देशात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीत झालेली वाढ बघता देशात विकासासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. या परकीय व्यापारात देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी मोठ्याप्रमाणावर उपयोग होणे गरजेचे आहे. तसेच परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक ही शेती क्षेत्रात वळवीणे गरजेचे आहे. जेणे करून शेती क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा वापर होऊन प्रत्येक व्यक्ती यासोबत जोडला जावू शकतो.

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे काही फायदे तर काही तोटेही संभावतात. मात्र हे तोटे कमी करणे देशाच्या आर्थिक धोरणावर निर्भर आहे. आर्थिक विकासाच्या कोणत्याही टप्प्यावर एकूण विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण हे देशी गुंतवणुकीपेक्षा नेहमी कमीच असणार. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या व विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे देशाची अर्थव्यवस्था कुचकामी न होता देशात नवीन रोजगाराच्या संधी, नवीन उद्योग व्यवसाय, तसेच उत्पादित वस्तूंचा दर्जा सुधारण्यास मदतच होईल. ज्यामुळे एकंदरीत देशाच्या विकासाला गती प्रदान करण्यासाठी याचा फायदाही होवू शकतो.

**संदर्भ सूची :**


१- दत्त गौरव आणि अश्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था-दत्त आणि सुन्दरम, एस.चन्द एण्ड कंपनी प्रा. लि. नई दिल्ली, ५२ वी आवृत्ती, २०१४

२- देसले डॉ. किरण, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग १ व २, दिपस्तंभ प्रकाशन, जळगांव, २०१३

३- देसाई डॉ. आणि . भालेराव डॉ., भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, २०१३

४- आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४, भारत सरकार



*(**डॉ नितीन ज्ञानदेव चौधरी** हे आकोला येथील सीताबाई महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणुन कार्यरत असुन अर्थशास्त्र या विषयावर त्यांचे विविध मासिकांमधुन संशोधनपुर्ण लेखन चालु आहे. संपर्कासाठी इमेल -* ndchudhari1981@gmail.com*)*


## आगामी अंक

**जानेवारी, २०१५**

**'स्वच्छता, विकास आणि सामाजिक बदल'**

**या विषयावर असेल.**

**फेब्रुवारी, २०१५**

**'सत्तेचे विकेंद्रिकरण आणि भारतीय राजकारण'**

**या विषयावर असेल.**

# भारतातील एफडीआयचे स्वरुप

- डॉ.उमेश भाऊराव घोडेस्वार




**भारतातील थेट परकिय गुंतवणुकीने आता, टप्याटप्याने एक एक क्षेत्र काबीज करुन आंतरराष्ट्रीय व्यापारास पोषक वातावरण निर्माण केले आहे. या लेखात एफडीआय ची व्याख्या ते महत्व, विविध क्षेत्रांमधिल एफडीआय, एफडीआयच्या मर्यादा, जागतिक व्यापार कल इत्यादी सर्व मुद्दे समाविष्ट आहेत. देशांतर्गत आर्थिक विकास साधतांना, स्पर्धात्मक जागतिक बाजारपेठेची आव्हाने वेगळी आणि जाचक ठरु शकतात. 'एफडीआय' हा सर्वात सोपा आणि सरळ मार्ग असुन विदेशी व्यापारास अनुकुल कर प्रणाली, कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यास एफडीआय हा सहकार तत्वावरील 'रामबाण' उपाय आहे.**

'एकमेका साह्य करु अवघे धरु सुपंथ' याप्रमाणे जगातील गुंतवणूकदारांना देशामध्ये गुंतवणूकीसाठी परवानगी देणे आर्थिक दृष्टीने हितावह आहे. परंतु त्यामुळे देशाच्या आर्थिक अस्मितेला व सुरक्षिततेला इजा पोहचणार नाही याची काळजी घेणे देखील आवश्यक आहे. देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा, मानव - संसाधनांचा कुशलतेने उपयोग होईल, आर्थिक वृध्दीदर सोबतच रोजगार वाढेल अशा ध्येय धोरणांतर्गत परदेशी गुंतवणूकीला परवानगी देणे क्रम प्राप्त आहे. तरी देखील भारतातील एफडीआय साठी नव-नवी क्षेत्रे खुली करतांना त्यांच्या परिणाम व कारकतेबद्दल प्रश्न निर्माण होत आहे, त्यामुळे एफडीआय देशासाठी फायदेशीर ठरेल की आर्थिक गुलामीकडे नेईल हे तर काळच ठरवेल.

प्रस्तुत लेखामध्ये एफडीआय म्हणजे काय? एफडीआय कोणत्या मार्गाने करतात, भारतातील प्रमुख क्षेत्रातील एफडीआय, एफडीआयचे फायदे व मर्यादा, नव्या सरकारचा एफडीआय बाबत कल या विविध बाबींवर दृष्टीक्षेप टाकला आहे.

## एफडीआय म्हणजे काय ?

एफडीआय (Foreign Direct Investment) म्हणजेच परकीय (विदेशी) थेट गुंतवणूक. जेव्हा परदेशी गुंतवणूकदार देशातील भौतिक संपत्ती जसे की, कारखाने, जमीन, स्थावर मालमत्ता, प्रकल्प किंवा मशिनरी यामध्ये गुंतवणूक करतात त्याला 'एफडीआय' असे म्हणतात. म्हणजेच परकीय गुंतवणूकदार किंवा त्याची एखादी संलग्न संस्थाच (subsidiary) भारतात उघडणे किंवा एखाद्या भारतीय कंपनीबरोबर भागीदारी (collaboration) करुन थेट गुंतवणूक करीत असेल तर त्याच एफडीआय असे म्हटले जाते. एफडीआय हे प्रत्यक्ष गुंतवूणकीत येते, तर एखाद्या कंपनीचे शेअर विकत घेणे याला अप्रत्यक्ष किंवा Portfolio गुंतवणूक असे म्हणतात. अप्रत्यक्ष गुंतवणूकीने फक्त शेअर विकत घेता येतात, त्या उद्योगाचा ताबा किंवा भागीदारी नव्हे. उद्योगात 'थेट कर्जरोखे घेऊन गुंतवणूक करणे' याला परकीय संस्थात्मक गुंतवणूक (Foreign Institutional Investment-FII) असे म्हणतात. तसेच शेअर फंड्स म्हणजे परकीय म्युच्युअल फंड्सव्दारे भारतीय शेअर बाजारात अप्रत्यक्ष गुंतवणूक करता येते.

भारत सरकारने विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला आकर्षित करणे आणि त्याला वाढविण्याचे लक्ष्य ठेवले आहे. याचा उद्देश देशांतर्गत भांडवल आणि तांत्रिक कौशल्याची पूरक व्यवस्था करुन आर्थिक प्रगतीला गती देणे हा

आहे. भारत सरकारने यासाठी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीवर एक रुपरेषा तयार केली आहे जी पारदर्शी, अनुमानकारक, सोपी आणि विस्तारित आहे. ही रुपरेषा एफडीआय धोरणाच्या परिपत्रामध्ये समाविष्ट आहे. जी प्रत्येक वर्षी अपडेट केली जाते. भारतात एफडीआचे धोरण वाणिज्य व उद्योग मंत्रालयाचा 'औद्योगिक धोरण आणि संवर्धन विभाग' तयार करतो.

## एफडीआय कोणत्या मार्गाने करतात ?

एफडीआयचे प्रमुख दोन मार्ग आहेत. एकतर शासकीय मार्ग जो की विदेशी गुंतवणुक संवर्धन मंडळ अर्थात एक अक्ष्यपीकी म्हणुन ओळखला जातो Board आणि GAR-Government Approval Route तर दुसरा मार्ग हा स्वयंचलित आहे जो AR- स्वयंचलीत मार्ग म्हणून ओळखला जातो. समजा एखाद्या परकीय गुंतवणूकदाराला भारतातील एखाद्या उद्योगात थेट गुंतवणूक करायची आहे आणि जर त्या उद्योगासाठी शासनाने हा मार्ग निश्चित केला असेल तर गुंतवणूकदाराला आधी FIPB बोर्डाची मान्यता घ्यावी लागते. त्यानंतर केंद्र शासनाकडून संमती मिळाल्यानंतर उद्योगात गुंतवणूक करता येते. तसेच जर त्या उद्योगासाठी स्वयंचलित मार्ग निश्चित केलेला असेल तर गुंतवणूकदार कुठलीही पूर्वमान्यता न घेता त्या उद्योगात गुंतवूणक करु शकतो. फक्त गुंतवणूकीनंतर १ महिन्याच्या आत तशी माहिती शासनाला/रिझर्व्ह बँकेला द्यावी लागते. विशेष म्हणजे पाकिस्तान व बांगलादेशातून होणाऱ्या परकीय थेट गुंतवणूकीसाठी शासकीय मार्गाचा म्हणजे FIPBचा अवलंब केला जातो.

## प्रमुख क्षेत्रातील एफडीआय

१ **कृषी आणि पशुधन क्षेत्रातील एफडीआय:** एफडीआयच्या धोरणानुसार कृषी, पशुधन विकास, हॉर्टिकल्चर, बियाणे विकास आणि पुष्पसंवर्धन, पालेभाजी लागवड, मशरुम, मत्स्यसंवर्धन इत्यादी क्षेत्रांमध्ये एफडीआयचे प्रमाण १०० टक्के करण्याला परवानगी आहे. पशुधन क्षेत्रामध्ये पशूंना व्यवस्था, त्यांच्या राहण्याची सुयोग्य व्यवस्था, हवामाननिहाय त्यांची राहण्याची सोय, त्यांचे आरोग्य व पोषण, मशिनरीचा त्यासाठी योग्य उपयोग, वाया गेलेल्या मलमूत्राचे व्यवस्थापन इत्यादी प्रमुख अटी एफडीआय अंतर्गत आणल्या आहेत.

२ **खाणी क्षेत्रातील एफडीआय:** खाणकाम व धातू-अधातू खनिज उत्खनन, कोळसा आणि लिग्नाइट, टिटॅनियमयुक्त खाणी व खनिजे या क्षेत्रांमध्ये एफडीआयचे प्रमाण १०० टक्के आहे. स्वयंचलित मार्गाने या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करता येते. परंतु टिटॅनियमयुक्त खाणी व खनिजे या क्षेत्रातील गुंतवणूक ही शासकीय मार्गाने करण्याचे बंधन आहे.

३ **पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातील एफडीआय:** तेल, नैसर्गिक वायू शोध, विपणन, संबंधित पायाभूत सुविधा, तेलशुध्दीकरण या क्षेत्रातील परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक ही स्वयंचलित मार्गाने १०० टक्के करण्याची परवानगी आहे तर सार्वजनिक क्षेत्रातील तेलशुध्दीकरण प्रकल्पातील एफडीआयचे प्रमाण ४९ टक्के असून ही गुंतवणूक शासकीय मार्गाने करण्याचे बंधन आहे.

४ **बँकिंग क्षेत्रातील एफडीआय:** सेवाक्षेत्रांतर्गत बँकिंग क्षेत्र येते, ज्यामध्ये सार्वजनिक व खाजगी बँकिंग क्षेत्र आहे. खासगी बँकिंग क्षेत्रामध्ये एफडीआयचे प्रमाण ७४ टक्के आहे. यामध्ये ४९ टक्के स्वयंचलित व त्यापुढे शासकीय मार्गाने गुंतवणूक करण्याचे बंधन आहे. तसेच सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एफडीआयचे प्रमाण २० टक्के इतके आहे. जे शासकीय गुंतवणूक मार्गाने केले जाऊ शकते.

५ **डीटीएच व केबल नेटवर्क क्षेत्रातील एफडीआय:** टेलिपोर्ट, डीटीएच सेवा, आधुनिक केबल नेटवर्क, मोबाईल टी.व्ही. या क्षेत्रातील एफडीआयचे प्रमाण ७४ टक्के इतके आहे. यामध्ये ४९ टक्के स्वयंचलित मार्गाने व त्यापुढे शासकीय मार्गाने(इघ्ॅ) गुंतवणूक करण्याचे बंधन आहे. नव्या निर्णयाने हे प्रमाण ७४ टक्क्यांवरुन १०० टक्के ऑटोमॅटीक रुटने करण्याला सरकारने मंजुरी दिली आहे.

६ **विमा क्षेत्रातील एफडीआय:** सध्याच्या वित्त मंत्रालयाकडून विमा क्षेत्रातील एफडीआय २६ टक्क्यांवरुन ४९ टक्के करण्याचे सूतोवाच केंद्रीय वित्त मंत्री अरुण जेटली यांनी केले. काही महत्वपूर्ण

प्रतिबंधाच्याअधीन राहून ही वाढ केल्याचे वर्तविण्यात आले. विदेशी गुंतवणूकदारांना भारतात आकर्षित करणे हा त्यामागील हेतू आहे. परंतु विमा क्षेत्र पूर्णतः विदेशी गुंतवणूकदारांच्या हाती जाणार नाही अशी बंधने त्यावर घातली आहेत. काही वैधानिक अधिकाराच्या नियंत्रणाखाली हे प्रमाण येणाऱ्या ५ ते १० वर्षांपर्यंत २६ टक्क्यावरुन ४९ टक्क्यांपर्यंत नेण्याची वित्तमंत्रालयाची योजना आहे.

७ **सुरक्षा क्षेत्रातील एफडीआय:** भारतीय सुरक्षा क्षेत्र परकीय गुंतवणूकीसाठी २००१ ला खुले केले, त्यावेळी त्याचे प्रमाण २६ टक्के इतके होते. औद्योगिक धोरण व संबंधित विभाग (डीआयपीपी) DIPP ने २२ ऑगस्ट २०१३ ला आपल्या निवेदनामध्ये सुरक्षा क्षेत्रातील एफडीआयचे हे प्रमाण २६ टक्के कायम ठेवले. FIP- विदेशी संवर्धन गुंतवणूक (एफआयपी) सुरक्षा क्षेत्रामध्ये पोर्टफोलिओ योजनेअंतर्गत गुंतवणूक करण्याचे बंधन टाकण्यात आले. २६ टक्क्यापासून ७४ टक्क्यांपर्यंत एफडीआय सुरक्षा क्षेत्र उद्योगाला खुले करावे असा उहापोह सुरु आहे परंतु भारतीय गुंतवणूकदार हे सुरक्षा क्षेत्रामध्ये आधीपासूनच गुंतलेले आहेत त्यांनी FPI/FII यांच्यावर एकप्रकारे प्रतिबंधच घातला आहे.

८ **औषध निर्माण विषयक क्षेत्रातील एफडीआय:** सध्याच्या औषध निर्माण विषयक क्षेत्रामध्ये विदेशी गुंतवणूकीसाठी सरकारची म्हणजे FIPB बोर्डाची परवानगी घ्यावी लागते.फायदेशीर बंधने किंवा प्रतिबंध कलम ह्या बोर्डामार्फत निश्चित केलें जाते. बोर्डाच्या परवानगीने गुंतवणूकदारांना तशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. सध्या ह्या क्षेत्रातील एफडीआयचे प्रमाण १०० इतके आहे जे स्वयंचलीत मार्गाने करता येते.

९ **दूरसंचार क्षेत्रातील एफडीआय:** DIPP- विभागीय औद्योगिक धोरण व संबधित ने विभागाने भारतीय दूरसंचार क्षेत्रातील एफडीआयची व्याप्ती वाढविलेली आहे. या क्षेत्रामध्ये एफडीआयचे प्रमाण ७४ टक्के असून ४९ टक्के ऑटोमॅटिक रुटने तर उर्वरित FIPB म्हणजे सरकारच्या मंजुरीने करण्याची परवानगी दिली आहे. यामध्ये सरासरी परवाने आणि सुरक्षा अटींच्या अधीन राहून हे क्षेत्र परकीय गुंतवणूकीसाठी खुले करण्यात आले आहे. यावर भारतीय दूरसंचार विभागाचे नियंत्रण आहे. नव्या सरकारने दूरसंचार क्षेत्रातील एफडीआय ४९ टक्क्यांवरुन १०० टक्के ऑटोमॅटिक रुटने करण्यास मंजुरी दिली आहे.

१० **रिटेल (किरकोळ) क्षेत्रातील एफडीआय:** शासनाने मल्टी ब्रँड रिटेलसाठी ५१ टक्के आणि सिंगल ब्रँड रिटेलसाठी १०० टक्के एफडीआय ची मान्यता दिली आहे. सिंगल ब्रँड रिटेलमध्ये ४९ टक्के ऑटोमॅटिक रुटने व उर्वरित ५१ टक्के सरकारच्या मंजुरीने गुंतवणूकीची परवानगी दिली आहे. ही गुंतवणूक १० लाख लोकसंख्येच्या शहरांतच करण्याचे बंधन आहे. कमीतकमी १० कोटी अमेरिकन डॉलर एवढी गुंतवणूक करणे अनिवार्य आहे. तसेच किमान ३० टक्के माल स्थानिक व्यापा-यांकडून खरेदी करण्याची अट असून शेतक-यांकडून मालखरेदीचा अधिकार सर्वप्रथम शासनाकडे असावा अशी तरतूद करण्यात आली आहे.

११ **कुरिअर सेवा क्षेत्रातील एफडीआय:** शासनाने कुरिअर सेवा क्षेत्रातील एफडीआयचे प्रमाण सुरुवातीला १०० टक्के FIPB च्या मंजुरीने करण्याची परवानगी दिली परंतु नंतर हे १०० टक्के प्रमाण ऑटोमॅटिक रुटने करण्याला सरकारने मंजुरी दिली आहे.

**एफडीआयचे फायदे**

१ **रोजगारात वाढ:** एफडीआयमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारात वाढ होईल यात शंका नाही. युवकांना वेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण मिळेल. त्यादृष्टीने भारतातील मनुष्यबळाचा योग्य उपयोग करुन घेता येईल. जवळपास ८० लाख रोजगाराच्या नव्या संधी एफडीआय प्राप्त करुन देईल अशी अपेक्षा आहे.

२. **रुपयाची घसरण थांबेल:** एफडीआयमुळे देशी मालाला मागणी निर्माण होऊ शकते तसेच परदेशी गुंतवणूक देशात आल्यामुळे चलनस्तर सुधारेल. त्यामुळे परदेशी गुंतवणूक आल्यामुळे रुपयाची स्थिती

सुधारेल अशी अपेक्षा आहे.

३. **शेतकऱ्यांना फायदा**: एफडीआयमध्ये विदेशी कंपन्यांना कमीत कमी ३० टक्के कच्चा माल हा भारतीय शेतकऱ्यांकडून खरेदी करावा लागेल त्यामुळे शेतकऱ्यांच्या कच्च्या मालाला मोठी मागणी निर्माण होईल आणि त्यांची स्थिती पूर्वीपेक्षा सुधारेल.

४. **मध्यस्थांचे उच्चाटन**: शेतकरी आणि उपभोक्ता यांमध्ये मध्यस्थ, दलाल हे कमिशन खातात. परंतु एफडीआयमुळे मधस्त न राहता सरळ 'विदेशी कंपनी आणि शेतकरी' असा संबंध येईल. त्यामुळे उपभोक्त्यांना कमी किंमतीवर वस्तू मिळतील. कच्चा माल शेतकऱ्यांजवळून सरळ कंपन्या खरेदी करतील. यामुळे शेतकरी आणि कंपनी दोघांना योग्य लाभ मिळेल. जर सीमांत कृषकांना याचा लाभ मिळाला तर एफडीआय शेतकऱ्यांच्या विकासातील कळीचा मुद्दा साबीत होईल. मागणी वाढली तर शेतीच्या क्षेत्रामध्येदेखील सुधारणा होण्यास मदत होईल.

५. **रिटेल क्षेत्रावर चांगले परिणाम**: रिटेल क्षेत्रात जगभरातील मोठ्या कंपन्या भारतात गुंतवणूकीसाठी आकर्षित होतील. देशाचा विकास होईल व साधारणपणे ८० लाख व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध होतील. वस्तुंच्या किंमती कमी होतील. देशाच्या अर्थव्यवस्थेवरील महागाईचा ताण कमी होण्यास मदत होईल.

६. **दूरसंचार क्षेत्रासाठी चांगली संधी**: दूरसंचार क्षेत्रातील देशाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी व देशाच्या सर्व भागांपर्यंत ही सेवा पुरवण्यासाठी अधिक गुंतवणूक प्राप्त होईल. नवीन ''३ जी'' व ''४ जी'' आणि ब्रॉडब्रँड वायरलेस अ‍ॅक्सेस सेवा पुरवणे शक्य होईल. यामुळे देशातील जनतेला सेवांचा आणि शासनाला यातून मिळणाऱ्या लायसन्स फीचा लाभ देखील होईल. दूरसंचार कंपन्यांचा व्यवहार अधिक पारदर्शक होईल. तसेच दूरसंचार कंपन्यांना आता भारतात गुंतवणूकीसाठी भारतीय कंपनीशी भागीदारी करण्याची गरज राहणार नाही.

७. **संरक्षण क्षेत्रातील परिणाम**: संरक्षण क्षेत्रातील एफडीआयमुळे सरकारी भांडवली खर्चात बचत होईल व उत्पादन वेळेत घेणे शक्य होईल. नवीन तंत्रज्ञान, मोठ्या यंत्रणेचे सुटे भाग आपल्याला परदेशातून आयात करावे लागतात त्यामुळे यात आवश्यकतेपेक्षा अधिक पैसे मोजावे लागतात परंतु ते देशात उत्पादन केल्यास अनावश्यक खर्च आणि त्यातील होणारा भ्रष्टाचार थांबण्याची शक्यता आहे.

## भारतातील एफडीआयला मर्यादा

१ **पायाभूत क्षेत्राचा अपूर्ण विकास**: भारतामध्ये आधारभूत संरचनेचा परिपूर्ण विकास झाला नसल्यामुळे एफडीआयला मर्यादा येऊ शकते. यामध्ये आजही रस्ते, वाहतूक, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांचा विकास ज्या प्रमाणात पाहिजे त्या प्रमाणात झालेला दिसून येत नाही.

२ **किमान स्त्रोतांची आवश्यकता**: एफडीआयच्या धोरणांमध्ये आणखी एक महत्वाची मर्यादा म्हणजे किमान आवश्यक स्त्रोतांचा अभाव दिसून येतो. यामध्ये प्रस्कंरण, विनिर्माण उद्योग, लघू व मध्यम उद्योगांचा अपूर्ण विकास इत्यादींचा समावेश आहे. कारखाने, मशिनरी इत्यादींचा पाहिजे त्या प्रमाणात विकास आजही झालेला दिसून येत नाही जी एफडीआयला अडचण ठरु शकते.

३ **भौगोलिक मर्यादा**: एफडीआयच्या धोरणामध्ये भौगोलिक मर्यादा स्पष्ट केली आहे. ज्या ठिकाणी १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या आहे त्या ठिकाणी विदेशी उद्योग स्थापन केला जाऊ शकतो. त्याचठिकाणी दुकाने, मॉल्स, शॉप्स स्थापन केलें जाऊ शकतात. परंतु भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. याठिकाणी आज छोटी-छोटी खेडी मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे या खेड्यांना एफडीआयचा लाभ मिळेल की नाही यात शंका आहे.

## नव्या सरकारचाएफडीआय विषयी कल

नव्या भाजप-मोदी सरकारमध्ये ई-कॉमर्स आणि संरक्षण क्षेत्रातील एफडीआय बाबत अनुकूल विचारधारा आहे. पुढील महिन्यात ई-कॉमर्स मध्ये एफडीआयला परवानगी देण्याची घोषणा नव्यासरकारने अलीकडेच केली. मोदी सरकारच्या नव्या बजेटमध्ये त्याचे पडसाद दिसून आले. आर्थिक

सुधारणेमधील हा महत्वाचा टप्पा मानला जात आहे. ५०० बिलियन डॉलरचे रिटेल सेक्टरमधील गुंतवणूकीला भाजप सरकार परवानगी देऊ शकते. यामध्ये वॉलमार्ट स्टोअर सारखे आहेत. २०२० मध्ये e-commerce चे योगदान उद्योगक्षेत्रामध्ये ४ टक्के असू शकते. e-commerce मधील Amazon, Google, eBay Inc., Wal-mart आणि India e-tailer, Flipkart इ. कंपन्यांमधील गुंतवणूक महत्वपूर्ण ठरु शकते. उपभोगपुरक वृध्दीसाठी हे महत्वपूर्ण पाऊल आहे. भाजप याआधी अशा परकीय गुंतवणूकीसाठी विरोधी भूमिकेत होती परंतु उद्योगविस्तारामध्ये e-commerce मधील एफडीआयचे महत्व दिवसेंदिवस वाढत असल्याने त्याला नाकारता येणार नाही. भारत आशियातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था आहे त्यामुळे देशी आणि विदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास वाढवून त्यांना परवानग्या देणे बदलानुरुप आहे. मोदी सरकार रेल्वेतील आधारसंरचनेच्या विकासासाठी तसेच सुरक्षा क्षेत्रामध्ये सुरक्षा उत्पादनासाठी १०० टक्के एफडीआयला परवानगी देण्याच्या भूमिकेत आहे. भाजप सरकार सुरक्षा उत्पादनामधील एफडीआचे प्रमाण २६ टक्क्यंावरुन १०० टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या तयारीत आहे, त्यामुळे नव्या सरकारच्या कारकिर्दीत सुरक्षा आणि रेल्वेसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये एफडीआय विस्तारेल. परंतु देशाच्या आर्थिक सुरक्षिततेला इजा पोहोचणार नाही असे निर्णय नव्या सरकारने घेतले तर एफडीआय नवउदारमतवादाचा नवा चेहरा म्हणून पुढे येऊ शकते.

**संदर्भः**


1. **Dutta, D(2011):** `FDI in Retail: More Heat Than Light', Financial Express, FE Reflect, 26 November 2011.
   EPW, Vol-XLIX No.3, January 18, 2014.

**Singh Sukhpal (2011):** FDI in Retail: Misplaced Expectations and Half-truths, EPW December 17, 2011.
Seethapathi K.(2006): FDI Issues in Emerging Economies, Hyderabad, ICFAI.
The Economic Times, 13th January, 2012 Mumbai Edition.
D/o IPP.F.No. 5(14)/2009 FC dated 31/3/2010 issued by Ministry of Commerce & Industry, GOI.

www.rbi.org.in
www.economywatch.com
www.ijars.in/iJARS20634.pdf



*(**डॉ. उमेश भाऊराव घोडेस्वार** हे सध्या अकोला येथील शिवाजी महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक आणि रिसर्च फेलो म्हणुन कार्यरत आहेत. संपर्कासाठी इमेल* -ghodeswar123@gmail.com)


## लेखक / वाचकांसाठी नम्र सूचना

प्रकाशन विभागाच्या 'इंडिया' (इंग्रजी) व 'भारत' (हिंदी) या वार्षिक संदर्भ ग्रंथांच्या प्रती केन्द्रीय सदन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, पिन ४००६१४ येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. या प्रती संग्रही ठेवू इच्छिणाऱ्या लेखक वाचकांनी आपली मागणी myojanadpd@gmail.com या संकेतस्थळावर कृपया नोंदवावी.

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी खाली नमूद केलेल्या फॉन्ट पैकी कोणत्याही एका फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत.

KRUTI DEV or APS or Mangal or DVTT or SHIVAJI or SHREE LIPI, हे नम्र आवाहन.

# फेसबूक जाहिरात

योजना मासिकाने नुकतेच आपले फेसबूक पान सुरु केले आहे. या ऑनलाईन माध्यमाद्वारे वाचकांना आमच्याकडून तात्काळ सूचना, आमचे कार्यक्रम व आगामी अंकांबद्दल माहिती प्राप्त करता येईल आणि त्यावर प्रतिसादही देता येईल.

दोन महिन्यांच्या कालावधीत आमच्या वाचकांकडून प्राप्त झालेल्या १५,५०० पेक्षा अधिक पसंती दिल्या असून त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आपला पाठिंबा असाच कायम राहील, अशी अपेक्षा बाळगतो.

आमच्या फेसबूक पानावर पोहोचण्यासाठी फेसबूकच्या सर्चवर योजना जर्नल टाईप करा किंवा तुमच्या इंटरनेट ॲड्रेस बार वर खालील लींक टाका:

https://www.facebook.com/pages/Yojana-journal/181785378644304?ref=hl




कृपया आमच्या फेसबूक पानाला भेट द्या आणि आपल्या मौल्यवान सूचना आमच्यापर्यंत पोहोचवा.

Yojana Marathi (Monthly) December 2014
RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2013-15
Published Date : 12th Dec., 2014
Date of Posting : 16th Dec., 2014

शिवतेज बुक डेपो

# शिवतेज बुक डेपो आयोजित
# स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे
# सातवे भव्य प्रदर्शन
# व सवलतीच्या दरात विक्री

## या प्रदर्शनात भरपूर सवलत मिळवण्यासाठी स्मार्टकार्ड आवश्यक

शिवतेज बुकडेपोतर्फे विद्यार्थ्यांना स्मार्टकार्ड केवळ ५० रु. या नाममात्र रकमेवर वर्षभरासाठी दिले जाणार आहे.

**शिवतेज स्मार्टकार्डचे फायदे :**

- कार्डधारक ग्राहकांना शासकीय नोकऱ्यांच्या माहितीचे फ्रि SMS
- शिवतेज बुक डेपोमार्फत वेळोवेळी होणाऱ्या मार्गदर्शन शिबिरात मोफत प्रवेश
- नाममात्र शुल्कावर अर्ज ऑनलाईन भरण्याची सुविधा

**शिवतेजशी मैत्री हमखास यशाची खात्री**

आम्ही यापूर्वी भरवलेल्या सर्व प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद व मन भारावून टाकणाऱ्या प्रतिक्रीया मिळाल्यामुळे हे सातवे भव्य प्रदर्शन भरवत आहोत. हे फक्त स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे प्रदर्शन नसून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचे खुले व्यासपीठ आहे हे प्रदर्शन बघुन आपण नक्की आपले ध्येय ठरवाल. या प्रदर्शनात सर्व प्रकारच्या स्पर्धापरीक्षांची पुस्तके उपलब्ध

MPSC, UPSC, स्टाफ सिलेक्शन, सेट–नेट, शिक्षणाधिकारी, कृषिधिकारी, व्यक्तिमत्व विकास, चालू घडामोडी, पोलीस भरती, जनरल नॉलेज, प्र.दर्पण हिंदी/इंग्रजी, योजना मराठी/हिंदी/इंग्रजी, कुरुक्षेत्र हिंदी/इंग्रजी, लोकराज्य, बँकिंग सर्व्हिस, सर्वप्रकारची मासिके, एनसीईआरटी क्रमिक शालेय पुस्तके व मुलाखतीसाठी आवश्यक अशा अनेक स्पर्धापरीक्षांकरिता लागणारी हजारो पुस्तके तसेच निवडक कथा व कादंबऱ्या उपलब्ध

**या प्रदर्शनात एका छताखाली हजारो पुस्तके पहाण्याची व भरपूर सवलतीत खरेदी करण्याची अनोखी संधी.**

## २३ नोव्हेंबर २०१४ पासून सर्वांसाठी खुले राहिल.

वेळ : सकाळी १० ते सायं. ७.० पर्यंत

प्रदर्शन ठिकाण : **मुद्रण साहित्य भांडार,**
शनिपार मंदीराजवळ, बसस्टॉप समोर, पुणे ३०
प्रदर्शन संपर्कप्रमुख मो. **9850619762 / 9763303856**

Chief Editior **Rajeshkumar Jha**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.